


**डॉ. विभा छ. घोडखांदे**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव.

(गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख)

M.A., SET, Ph.D.(Home economics )





**डॉ. नीता आर. गिरी**

यादव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा

(गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख)

M.A.(Home-Economics),

M.A.(Marathi), M.A.(English), B.Ed., Ph.D.





Dayadhan Publishers Group

**Dayadhan Publishers Group**

263, Anudaya, Akola Road, Near Gram Panchayat Office,

Balsond, Hingoli Maharashtra State (India)

7276193979

www.dayadhanpublication.com

ISBN : 978-93-91097-11-0


कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन आणि गृहसजावट | डॉ. विभा छ. घोडखांदे | डॉ. नीता आर. गिरी

E-Book



# कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन आणि गृहसजावट


डॉ. विभा छ. घोडखांदे

डॉ. नीता आर. गिरी

# कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन आणि गृहसजावट


**डॉ. विभा छ. घोडखांदे**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव.

(गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख)

M.A., SET, Ph.D. (Home economics)

**डॉ. निता आर. गिरी**

यादव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा

(गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख)

M.A.(Home-Economics), M.A.(Marathi),
M.A.(English), B.Ed., Ph.D.

दयाधन पब्लिशर्स ग्रुप,
भारत सरकारच्या MSME मंत्रालया अंतर्गत मान्यताप्राप्त.
नोंदणी क्रमांक MH-12-0001884

# कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन आणि गृहसजावट

©डॉ. विभा छ. घोडखांदे, डॉ. निता आर. गिरी

आवृत्ती :- पहिली

**प्रकाशिका**
सौ. मस्के अनिता दयाराम
दयाधन पब्लिशर्स ग्रुप, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.
Mob. No. 7276193979 / 9604872233
**Email Id**: - dayadhanpublishersgroup@gmail.com
**Website:** - http://www.dayadhanpublication.com

**मुद्रक**
श्रेया प्रिंटर्स, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, (भारत) 431513.

**प्रकाशन दिनांक ०५ सप्टेंबर २०२१ (शिक्षक दिना निमित्ताने प्रकाशित)**

**ISBN No. 978-93-91097-11-0 (e-book)**

**किंमत 75/-**

**टीप:-**
प्रस्तुत ग्रंथातील लेखन व पुनर्मुद्रण यांचे सर्व हक्क डॉ. विभा छ. घोडखांदे, डॉ. निता आर. गिरी यांच्याकडे राखीव आहेत. लेखन संभ्रमित अथवा सदोष झाल्यास / आढळल्यास यासाठी केवळ लेखकच जबाबदार असतील. ग्रंथातील भाषा, लेखन आणि आशय याविषयी प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

**न्यायाधिकरण:- जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली.**

# मनोगत

कौटुंबीक संसाधनाचे व्यवस्थापन आणि गृहसजावट हा विषय गृहअर्थशास्त्र विषयामधील बी. ए. भाग 1 साठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात शिकविला जातो. त्या विषयातील प्रथम सत्राच्या नविन अभ्यासक्रमानुसार या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे.

सर्व विदयार्थीना सोप्या भाषेत आपल्या विषयाची उकल व्हावी व त्यांना अभ्यासक्रमाबरोबरच रोजच्या आयुष्यात घर चालवण्यासाठी व स्वयमरोजगार व निर्मीतीसाठी मदत होईल अशा प्रेरणेने हे पुस्तक आपल्या समोर सादर करित आहे .

पुस्तकाचे लेखन करित असतांना वापरण्यात आलेल्या संदर्भसूचीतील सर्व मान्यवर लेखकांच्या आम्ही आभारी आहोत.

ज्यांच्या प्रोत्साहनामुळे आम्ही लेखनकार्य पूर्ण करू शकलो त्यांच्या आम्ही आभारी आहेत त्या डॉ. शुभांगी डांगे, डॉ. विभा काटे व डॉ. संगीता जवंजाळ यांच्या सहकार्याशिवाय हे कार्य पूर्णत्वासजावू शकले नसते.

**डॉ. विभा घोडखांदे**
**डॉ. नीता गीरी**

# अनुक्रमणिका


| प्र.क्रं. | प्रकरणाचे शीर्षक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|
| १ | गृहअर्थशास्त्र विषयाचा परिचय | १-७ |
| २ | गृहव्यवस्थापन आणि कौटुंबिक साधन संपत्ती | ८- ३१ |
| ३ | निर्णय घेणे | ३२-४० |
| ४ | कलेचे मूलघटक आणि कलेची तत्त्वे, रंगयोजना | ४१- ८० |
| ५ | पुष्परचना | ८१-१०३ |

# प्रकरण १ ले
# गृह अर्थशास्त्र विषयाचा परिचय
# Introduction Of Home Economic

आजच्या २१ व्या शतकामध्ये स्त्रीने सर्वच क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे आणि हे सर्व करित असतांना तिला बाहेरील जबाबदारी तेवढ्याच कौशल्याने पार पाडावी लागते. या दोन्ही जबाबदारीचे योग्य संतुलन राखण्यासाठी गृहअर्थशास्त्र हा विषय अतिशय उपयुक्त आहे.


बरेच लोकांचा असा गैरसमज आहे की, गृहअर्थशास्त्र म्हणजे स्वयंपाकाचा विषय पण तसे नसून ह्या शास्त्रात विविध शाखाचा समावेश आहे तसे गृहव्यवस्थापन, आहारशास्त्र, वस्त्रशास्त्र, विवाह आणि कौटुंबिक संबंध बाल विकास, गृहसजावट उपभोक्ता ग्राहक अर्थशास्त्र स्वयंरोजगार इत्यादी.

गृहअर्थशास्त्र या विषयाला वेगवेगळ्या देशामध्ये वेगवेगळी नावे आहे. परंतु १९५२ मध्ये **Home Science Association of India** ने ह्या विषयाला भारतात गृहविज्ञान हे नाव निश्चीत केले हा विषय प्रथम विज्ञान शाखेत शिकविणे सुरु झाले कला शाखेत हा विषय शिकवण्यात सर्वात प्रथम नागपुर विद्यापीठात १९६२ सालापासुन सुरवात झाली. आता हा विषय अनेक विद्यापिठात **B.A.** ला ऐच्छिक विषय म्हणून शिकविला जातो.

## गृह अर्थशास्त्राच्या परिभाषा –

एखादा विषय जर समजुन घ्यायचा असेल तर त्यासाठी त्याची परिभाषा करणे खुप गरजेचे आहे. पण ते कार्य फार सोपे नाही. त्यासाठी त्याचे क्षेत्र महत्व, घटक, स्वरुप या सर्वाची ज्ञान असणे आवश्यक आहे. कारण परिभाषेतुन आपणास त्याच विषयाची माहिती मिळते. परंतु सर्वाची मत एकसारखे असणार

नाही. थोड्या अधिक प्रमाणात त्यात तफावत असणारच त्यामुळे आपण विविध गृहविज्ञान किंवा गृहअर्थशास्त्र ह्याच्या अनेक गृहशास्त्राच्या परिभाषा अभ्यासू.




### १) आहार आणि पोषण शास्त्र :-

अन्न, वस्त्र व निवारा ह्या मानवाच्या मुलभुत गरजानं पैकी अन्न हि मानवाची प्राथमिक गरज आहे. कारण अन्न हीच आपल्या समृध्द जिवनाचा पाया आहे. अन्न तारी अन्न मारी असे यासाठीच म्हणतात कारण अन्न जर योग्य प्रमाणात घेतले तर त्याने आपले चांगले पोषणा होते पण तेच अन्न जर आपण चुकीचा पध्दतीने किंवा विरुध्द अन्न घेतले तर त्याचा आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम होवु शकतो.

पण हे अन्न योग्य घेणे म्हणजे काय तर याचे पुरेसे ज्ञान आपणास या विषयातून मिळू शकते जसे जर आपणास मधुमेह असेल तर कोणता आहार योग्य कोणता आहार वर्ज या सर्वाचे ज्ञान या विषयात आहे. आजच्या या धकाधकीच्या जिवनात व वाढत्या प्रदुषणामुळे अनेक आजार फोफावत आहे त्यातुन आपणास

कोणते अन्न घ्यायचे याचे जर योग्य ज्ञान असेल तर आपण आपले आरोग्य योग्य ठेवू शकतो.

उदा. आता कोविड–१९ मुळे सर्व जग त्रस्त आहे आणि त्यापासून सुरक्षीत राहायचे असेल तर आपली प्रतिकारक शक्ती चांगली पाहिजे असे सर्व तज्ञांचे मत होते आणि आपली प्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी कोणता आहार घ्यावे ह्याचे ज्ञान आपणास या विषयातून प्राप्त होते.

## २) वस्त्रशास्त्र :–

वस्त्र ही मानवाची मुलभुत गरज असली तरी व्यक्तीचे व्यक्तीमत्व हे कपड्याने अधिक उजळून दिसते त्यामुळे ती आता फक्त मुलभुत गरज राहीली नसून त्याची व्याप्ती आता बरीच वाढलेली आहे.

वस्त्रशास्त्र शाखेतून आपणास कापडाचा, धागा, पोत, रंग, बनावट विन, तंतू व कापड्यावर करण्यात येणाऱ्या प्रक्रीया या सर्वाचे सखोल ज्ञान प्राप्त होते तसेच कपड्यांची निगा कशी राखायची कोणत्या कपड्यास धुण्याचा कोणता प्रकार वापरावा की, ज्यामुळे कपडे चांगले राहील व जास्त काळ टिकेल आधुनिक काळामध्ये अनेक पध्दतीचे कापड आले आहे. त्यामुळे कापडाची निवड करतांना साधारण व्यक्तीला अडचणी येतात तर या सर्व अडचणी या शाखेमुळे आपणास दूर करण्यास मदत होते.

## ३) मानव विकास :–

जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उधारी ही म्हण आपण नेहमी ऐकतो पण असे का तर स्त्री ही घराचा कणा आहे स्त्री ही माता आहे. माता ही आपल्या मुलांना घडविण्याचे त्यांचे संगोपण करण्याचे काम करते आणि एक सुजान नागरीक तयार होतो आणि सुजाण नागरीक देशाचे भविष्य उंचावू शकतो पण हे सुजान नागरीक घडविण्यास मातेने काय करावे तर ह्याचे ज्ञान मानव विकास या शाखेत देण्यात आले आहे. यामध्ये जन्मपुर्ण काळापासून बालकाच्या विकासाचे अध्ययने दिलेले आहे. तसेच जन्मानंतर घेण्याची काळजी त्याच्या विकासाच्या पायऱ्या लसीकरण, बौध्दीक विकास, विकास, भाषाच विकास, शारीरीक विकास, मानसिक विकास, नैतीक विकास तसेच त्यावर परिणाम करणारे घटक अडथळे आणि उपाययोजना या सर्वांची माहिती आपणास या

शाखेतून प्राप्त होते. आणि आजची विद्यार्थीनी ही भविष्यातील जननी आहे. त्यामुळे तीला याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

### ४) कौटुंबिक साधनसंपत्ती :-

कौटुंबिक साधन संपत्ती मध्ये मानवीय साधनसंपत्ती व अमानवीय साधनसंपत्ती प्रत्येक कुटुंबाकडे कमी अधिक प्रमाणात असते. उदा. मानवी साधनसंपत्ती प्रत्येक कुटुंबाकडे कमी अधिक प्रमाणात असते. उदा. मानवी साधनसंपत्ती, ज्ञान, कौशल्य, वेळ, शक्ती, प्रवृत्ती, योग्यता, आवड इ.
अमानविय साधनसंपत्ती : भौतिक वस्तु, पैसा, सामुदायीक सोई येतात.

प्रत्येकाकडे सारखी कौटुंबिक साधन संपत्ती नसते पण आपल्या जवळ असणाऱ्या साधनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन करुन कुटुंबातील व्यक्तीच्या गरजा कश्या पूर्ण कराव्या. कुटुंबातील सर्व सदस्य सुख, व आनंदी कसे राहतील. कोणत्या साधनसंपत्तीचा किती व कसा वापर करावा याचे ज्ञान आपल्याला या शाखेतून प्राप्त होते.

### ५) विस्तार शिक्षण आणि संवाद :-

आपल्या देशातील जास्तीत जास्त लोक कृषीप्रधान असल्यामुळे खेड्यात वास्तव्य करतात आणि खेड्यात शिक्षणाच्या पुरेशा सोई उपलब्ध होत नाही आणि ज्ञानाच्या अभावामुळे लोकानमध्ये अज्ञान जास्त दिसून येते आणि हे अज्ञान दूर करण्याचे काम गृहअर्थशास्त्राच्या विस्तार शिक्षण या शाखेतून मिळते जसे समजावून सांगणे किशोरवयीन मुलींना लसीकरण इ.विषयाची माहिती आयोजन पोहचविण्यासाठी विविध शिबीराचे आयोजन करणे आणि सर्वामधून तेथील लोकांचे जीवनमान सुधारणे हे कार्य विस्तार शिक्षणातून केले जाते.

### ६) उपभोक्त ग्राहक अर्थशास्त्र :-

प्रत्येक व्यक्ती ही कधी ना कधी कोणती ना कोणती वस्तू खरेदी करीत असते. म्हणजेच प्रत्येक व्यक्ती ही ग्राहक असते व आता बाजारपेठेचे स्वरुप बलाढ्य होत चाललेले आहे. कोणती वस्तू घ्यावी कोणती घेवु नये याचे ज्ञान प्रत्येक ग्राहकास असणे आवश्यक आहे. त्यासाठी आपणास उपभोक्ता ग्राहक अर्थशास्त्र या शाखेची मदत होते.

आपणास कोणती वस्तू घेतांना कुणी फसवणार तर नाही ना आणि फसवले गेले तर काय करावे कोणती काळजी घ्यावी याचे ज्ञान आपल्या या शाखेतून मिळते.

### ७) मानवी संबंध :-

कुटुंब हा समाज व्यवस्थेचा पाया आहे. कुटुंबात जर मानवी संबंध चांगले राहीले तर समाज सुदृढ होईल कुटुंबात सर्वाच्या मुल्यांचा विचार करुन जर आनंदी, उत्साही वातावरण जर असेल तर कुटुंबाबरोबर समाजाची सुध्दा प्रगती होईल व हे सर्व मुल्य जोपासुन सर्वांचे हक्क व जबाबदाऱ्या जर योग्य प्रकारे पार पाडल्या गेल्या तर मानवी संबंध चांगले राहतील व ह्याचे ज्ञान आपणास या शाखेतून मिळते.

### * गृह अर्थशास्त्राची दैनंदिन जीवनात उपयुक्तता :-


प्रत्येक विषयामध्ये त्या विषयाचे ज्ञान दिले जाते. आणि गृहअर्थशास्त्र सुखी व आनंदी जीवन जगण्याचे शास्त्र आहे असे म्हणने चूकीचे ठरणार नाही. कारण कुटुंब निरोगी आत्मनिर्भर व आनंदी असेल तर समाजात आपोआपच त्यांचे स्थान मानाचे होते व कुटुंबाला सुखी समाधानी, निरोगी आत्मनिर्भर व आनंदी करण्यासाठी गृहअर्थशास्त्राच्या विविध शाखाची मदत घेता येते.

जसे साधनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन करुन कमी साधनसंपत्तीत चांगले जीवन जगता येते तसेच योग्य आहाराचे नियोजन करुण पुरेषे पोषण मुल्य याचे नियोजन केल्यास निरोगी आयुष्य कुटुंबातील सदस्यांचे राहू शकते. श्रमबचतीच्या साधनामुळे गृहीनीला फावला वेळ मिळतो व त्यातुन ति एखादा गृहउद्योग सुरु करुन आत्मनिर्भर होवू शकते.

गृहअर्थशास्त्राच्या प्रत्येक शाखेमध्ये असे विषय अभ्यासले जातात की, त्यातून शाखेमध्ये दैनंदीन जीवनमान उंचवण्यास ते अतीशय उपयोगी आहेत. उदा. १) वस्त्रशास्त्र या शाखेतून आपण योग्य वस्त्राची निवड करु शकतो. २) आहारशास्त्र मधून आपण योग्य आहार आयोजन करुन निरोगी राहू शकतो. ३) मानवी संबंध शाखेतून आपण आपल्या घरातील वातावरण आनंदी ठेवून आपले जीवनमान उंचावू शकतो.

### गृहअर्थशास्त्राचे देशाच्या भौतिक व नैतीक विकासात योगदान :-

कुटुंब विकसित होणे म्हणजे देश विकसित होणे कारण कुटुंबाचा विकास झाला तर समाजाचा होईल समाजाचा झाला तर जिल्ह्याचा आणि जिल्ह्याचा विकास झाला तर राष्ट्राचा व राष्ट्राचा विकास झाला तर देशाचा विकास होय. आणि गृहअर्थशास्त्र या विषयाच्या विविध शाखांमध्ये सुखी समृध्द कुटुंबासाठीच माहीती आहे. त्यामुळे गृहअर्थशास्त्र अभ्यासाचा मुख्य पाया कुटुंबाचा सर्वांगीन विकास करणे हाच आहे ते पुढील प्रमाणे.




सुखी व समृध्द कौटुंबीक जीवन प्रदान करणे हाच गृहअर्थशास्त्र विषयाचा मुख्य उद्देश आहे. आणि गृहअर्थशास्त्र या विविध शाखांच्या अभ्यासाने सर्वाचे जीवनमान उंचावण्यास मदत होते आणि कौटुंबीक साधनसंपत्ती योग्य व्यवस्थापनातुन सुखी व समृध्द कुटुंब निर्माण होते, योग्य आहार आयोजनामुळे

स्वास्थपूर्ण निरोगी समाज निर्मीतीत मदत होते व वेळेचे व साधनांचे योग्य नियोजनामुळे गृहीणी आपल्या फावल्या वेळेचा सदुउपयोग स्वयंरोजगार करण्यासाठी होवून कुटुंबाला आर्थीक साह्य प्राप्त होते.

कापड उद्योगात सुध्दा गृहअर्थशास्त्राच्या विद्यार्थीनींचे महत्वाचे योगदान आहे कारण भारतातील कापड इतर देशात सुध्दा निर्यात केले जातात. टेक्सटाईल, गारमेंट मॅन्युफॅक्चरींग, फॅशन डिझाइनींग, प्रांतीय भरतकला हे सर्व प्रकार गृहअर्थशास्त्र या विषयात शिकविले जातात. आणि हा विषय शिकलेल्या विद्यार्थ्यांनी कापड उद्योगात महत्वाचे काम करीत आहे. त्यामुळे बाहेर देशातील चलन भारतात आणण्यास मदत होवून देशाचा भौतीक विकास साधल्या जाते.

तसेच गृहअर्थशास्त्रात मानवी विकास ह्या विषयामुळे मुलांचे योग्य संगोपण करुन योग्य नागरीक घडवुन देशाच्या नैतीक विकासात मदत होते व विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून खेड्याचा विकास होतो व त्यातून पर्यायाने देशाचा सुध्दा विकास होतो.

# प्रकरण २ रे

# गृहव्यवस्थापन आणि कौटुंबिक साधनसंपत्ती

## Family Resource Management

गृहव्यवस्थापन म्हणजे घर चालवण्याचे योग्य नियोजन किंवा व्यवस्था होय. पण त्याआधी व्यवस्थापन म्हणजे काय हे बघने गरजेचे आहे घर चालवत असतांना प्रत्येक गृहीणीला व्यवस्थापन हे करावेच लागते कारण प्रत्येक कुटुंबाजवळ साधनसंपत्ती ही कमी–अधीक प्रमाणात असते आणि या साधनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन केले तरच कुटुंबातील व्यक्ती इच्छीत ध्येय प्राप्त करु शकते.

कुटुंबसंस्था अस्तित्वात आल्याबरोबरच व्यवस्थापन अस्तित्वात आले आणि आपोआप ही जबाबदारी गृहिणीकडे आली. गृहिणीला गृहस्वामिनी म्हणण्यात येऊ लागले. पूर्वीच्या काळीही व्यवस्थापन हे अस्तित्वात होते पण ते तेवढे विचारपूर्वक किंवा शास्त्रीय आधाराने केले जात नव्हते एवढाच फरक. प्रत्येक कुटुंबाची धडपड सुख, समाधान व शांती यांच्या प्राप्तीसाठी असते व त्याकरीता घरातील सर्व सदस्य प्रयत्नशील असतात. या सर्व कृतींना सुख, शांती व समृध्दीची फळे येण्यासाठी काही पूर्वयोजना आवश्यक असतात. विचारपूर्वक व पध्दतशीर मार्गाने केलेल्या कृती नेहमी अपेक्षित फळ देतात. गृह जीवनाचा वरील उद्देश साध्य करुन घेण्यासाठी व्यवस्थापनाची माहिती गृहिणीप्रमाणेच घरातील इतर सदस्यांनाही उपयुक्त ठरते.

प्रत्येक कुटुंबातील बहुतांशी कार्ये समान असली तरी, कुटुंबातील सदस्य संख्या, त्यांचे उत्पन्न, खर्च व्यक्तीची जीवनमूल्ये, ध्येये, भिन्न असतात आणि

ह्या सर्व घटकांचा व्यवस्थापनाशी संबंध असतो. ह्या भिन्नतेमुळे व्यवस्थापनात फरक आढळतो. म्हणून या घटकांचा व्यवस्थापनात विचार करावा लागतो. काही कुटुंबातील व्यवस्थापन अतिशय काटेकोर असते. तर काही कुटुंबात अयोग्य प्रकारचे आढळते. एखाद्या कुटुंबात साधन संपत्ती भरपुर प्रमाणात उपलब्ध असून देखील व्यवस्थापन योग्यप्रकारे केले जात नाही. तर काही कुटुंबात अपुऱ्या साधन संपत्तीव्दारे उच्च प्रतीचे व्यवस्थापन केले जाते. म्हणजेच व्यवस्थापन प्रत्येक कुटुंबात केले जाते. परंतु ते योग्य की अयोग्य हे व्यक्तीच्या कार्य कुशलतेवर निर्भर असते.

गृहव्यवस्थापनाची सर्वात जास्त गरज गृहीणी घराबाहेर काम करण्यासाठी पडली आणि मग तीला घर आणि काम असे दोन्ही क्षेत्र सांभाळणे कठीण व्हायला लागते. पूर्वी लोकांच्या गरजा कमी होत्या. भौतीक सुखाचा अभाव होता आता सर्वांच्या जीवनाचा स्तर उंचावण्याच्या दृष्टीने आपल्या चूल आणि मूल या वर्तुळातुन गृहीणी बाहेर पडली आणि तरीही तिला घर सांभाळण्याची जबाबदारी होती ती जबाबदारी ती साधन संपत्तीचे योग्य व्यवस्थापन करुन सांभाळु लागली.

त्यामुळे सुरवातीला जे कामाचे व्यवस्थापन फक्त औद्योगिक क्षेत्रात होत होते. त्याची गृहिणीला घरात सुध्दा गरज भासली योग्य गृहव्यवस्थापन म्हणजे सुखी कुटुंबाची गुरुकिल्ली समजली जाते. कारण प्रत्ये कार्य करीत असतांना त्यांचे योग्य व्यवस्थापन केले असता ते कार्य चांगले होते व आपणास इच्छीत ध्येयप्राप्त होते.

## गृहव्यवस्थापनाच्या व्याख्या :–

योग्य गृहव्यवस्थापन म्हणजे उपलब्ध कौटुंबिक साधनसंपत्ती मध्ये इच्छीत ध्येयप्राप्ती करणे होय. कुटुंबसंस्था अस्तित्वात आल्याबरोबरच व्यवस्थापन अस्तित्वात आले आणि आपोआप ही जबाबदारी गृहिणीकडे आली.

गृहिणीला गृहस्वामिनी म्हणण्यात येऊ लागले. पूर्वीच्या काळीही व्यवस्थापन हे अस्तित्वात होते पण ते तेवढे विचारपूर्वक किंवा शास्त्रीय आधारे केले जात नव्हते. एवढाच फरक. प्रत्येक कुटुंबाची धडपड सुख, समाधान व शांती यांच्या प्राप्तीसाठी असते व त्याकरीता घरातील सर्व सदस्य प्रयत्नशील असतात. या सर्व कृतींना सुख, शांती व समृध्दीची फळे येण्यासाठी काही पूर्वयोजना आवश्यक असतात. विचारपूर्वक व पध्दतशीर मार्गाने केलेल्या कृती नेहमी अपेक्षीत फळ देतात. गृह–जीवनाचा वरील उद्देश साध्य करुन घेण्यासाठी व्यवस्थापनाची माहिती गृहिणीप्रमाणेच घरातील इतर सदस्यांनाही उपयुक्त ठरते.

**गृहव्यवस्थापनाच्या व्याख्या :–**

**१) निकेल आणि डॉसी** :– "गृहव्यवस्थापन म्हणजे कौटुंबिक लक्ष्य प्राप्तीसाठी उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचे नियोजन, नियंत्रण आणि मूल्यांकन करणे होय." **"Home management is planning, controlling and evaluating the use of the resourceof the family for the purpose of attaining family goals." Ref. Management in family living P.P.36-39)**

**२) डॉ.देविदास** :– "कौटुंबिक उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी कौटुंबि साधनसंपत्तीचा उपयोग कशाप्रकारे करावयाचा याबद्दल घेण्यात येणारे निर्णय म्हणजे गृहव्यवस्थापन होय." **"Home management consist of making decision about using family resource to achieve family goals.")**

**३) ग्रॉस, क्रॅण्डाल आणि वलबर्ट इना**:– "गृहव्यवस्थापन एक मानसिक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये नियोजन, नियंत्रण, मूल्यांकनाव्दारे कौटुंबिक साधनसंपत्तीचा वापर करुन कौटुंबिक ध्येय, उद्दिष्टे प्राप्त केली जातात." **"Home management is a mental process through which are plans controls and evaluates the use of family resources in order to**

**achieve the family goals." Ref. Elizabeth Walberts, Ina H. Gross and Crandoll, Home management for modern families challanges of management 1967, Page-6)**

**नॉल (Knoll) यांच्या शब्दात, गृहव्यवस्थापन म्हणजे नुकतेच कार्य करणे नसून असे कार्य करणे नसून असे कार्य की जे योग्य विचारांन्ती घेतलेल्या निर्णयानुसार केलेले आहे.**

**"Home Management is not mere performance of work, rather it is acctivity or performance that is directed by concious decisions."**

**नॉल (Knoll) यांच्या शब्दात, गृहव्यवस्थापन म्हणजे नुसतेच कार्य करणे नसून असे कार्य की जे योग्य विचारांन्ती घेतलेल्या निर्णयानुसार केलेले आहे.**

**"Home Management is not mere performance of work, rather it is acctivity or performance that is directed by concious decisions."**

**डॉ.सुनंदा वसू व डॉ.रंजनी मेहरे यांच्या शब्दात गृहव्यवस्थापनाची परीभाषा खालीलप्रमाणे करता येईल. "गृहव्यवस्थापन ही एक मानसिक प्रक्रिया असून त्यात नियोजन, नियंत्रण व मूल्यांकन या तीन क्रमबध्द पायऱ्यांच्या मदतीने निर्णयांची एक श्रृंखला तयार होते की, ज्यांच्या मदतीने कौटुंबिक साधनसंपत्तीचा कमीतकमी व योग्य उपयोग करुन कौटुंबिक लक्ष्य साध्य केले जाते."**

**या सर्व परिभाषेवरुन असे म्हणता येईल कि गृहव्यवस्थापन ही माणसीक प्रक्रिया असुन कौटुंबिक ध्येयप्राप्तीसाठी नियोजन नियंत्रण व मुल्यांकन या पायऱ्या पार करुन कौटुंबीक सौख्य प्राप्त करण्यास मदत मिळेल.**

## गृहवस्थापनाचे महत्व :-

पूर्वी संयुक्त कुटुंब होती आता हळुहळु विभक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात आली आणि विभक्त कुटुंब पध्दतीमुळे घरची सर्व जबाबदारी एकट्या गृहीनीवर आली आणि पूर्वी फक्त स्त्रीने घर सांभाळणे व पुरुषांनी बाहेरील काम बघने असे होते पण ते सुध्दा समीकरण हळूहळू बदलत गेले स्त्री ही सर्वच क्षेत्रात कामगीरी करुन आपला ठसा उमटवू लागली आणि त्यामुळे गृहव्यवस्थानाचे महत्व वाढायला लागले.

१) गृहव्यवस्थापनामुळे कुटुंबातील सदस्यांच्या आवडी नुसार व क्षमतेनुसार कामाची विभागणी करण्यास मदत झाली.

२) कार्यसरलीकरणाचा उपयोगामुळे काम सोपे व लवकर होण्यास मदत झाली.

३) कौटुबीक साधनाचा योग्य उपयोग करुन राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत झाली.

४) गृहव्यवस्थापनामुळे श्रमबचतीच्या साधनांचा योग्य उपयोग करुन वेळ व श्रमात बचत झाली.

५) गृहव्यवस्थापनामुळे इच्छीत ध्येयप्राप्त करण्यास मदत झाली. कोणते ध्येय कसे सोप्या पध्दतीने प्राप्त करायचे यास मदत मिळते.

६) गृहव्यवस्थापनामुळे गृहीणीस फावला वेळ मिळतो व त्यामुळे ती तिचा एखादा छंद जोपासू शकते किंवा स्वयंरोजगार करुन कुटुंबात आर्थीक साह्य करु शकते.

७) गृहव्यवस्थापनामुळे काम लवकर पूर्ण झाल्यामुळे मनःशांती व समाधान प्राप्त होते.

८) गृहव्यवस्थापनामुळे घरातील एकाच व्यक्तीवर कामाचा बोझा पडत नाही. त्यामुळे घरात आनंदी वातावरण राहते.

९) योग्य गृहव्यवस्थापनामुळे साधनसंपत्तीची कमतरता भरुन निघते.

१०) आवडीनुसार कामाची विभागणी केल्यामुळे कामाचा दर्जा उंचावतो. उदा.घरातील मुलीला भांडे घासायला आवडत असेल आणि कपडे धुवायला आवडत नसेल तर तीला कपडे धुवायचे काम दिले तर ते काम चांगले होणार नाही. पण तिला जर भांडे घासायचे करण्यास लावले तर काम चांगले व लवकर होईल व घरात आनंदराचे वातावरण सुध्दा राहील.

**गृहव्यवस्थापन प्रक्रिया :–**

गृहव्यवस्थापन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तिन पायऱ्यांचा अवलंब करावा लागतो.

१) नियोजन

२) नियंत्रण

३) मुल्यांकन

कोणतेही ध्येय प्राप्त करायचे असल्यास व्यवस्थापन करीत असतांना नियोजन, नियंत्रण व मूल्यांकन या तिनही पायऱ्या क्रमाने पार कराव्या लागतात. यात नियोजन हे भविष्यासाठी करायचे असते म्हणजे काम सुरु होण्याआधी त्याची सर्व रुपरेषा ठरविणे म्हणजे नियोजन होय तर नियंत्रण हे वर्तमानकाळ दर्शविते कारण कार्य सुरु झाल्यानंतर त्यावर योग्य लक्ष ठेवणे काम नियोजनानुसार सुरु आहे का हे बघने आणि त्याप्रमाणे ते करणे म्हणजे नियंत्रण होय व मूल्यांकन हे भूतकाळ दर्शविते म्हणजे काम पूर्ण झाल्यानंतर ते काम नियोजनानुसार झाले का योग्य ध्येयप्राप्ती झाली का यशस्वी पणे कार्य पूर्ण नाही झाले तर का बर याचे सर्व मूल्यमापन म्हणजेच मूल्यांकन होय.

उदा. एखाद्या बी.ए. च्या विद्यार्थीनीनी ठरविले कि मला बी.ए.मध्ये प्रथम यायचे आहे त्यासाठी मी रोज ५ तास अभ्यास करणार पण काही कारणांनी ती जर २ तासच अभ्यास करत असेल तर तीचे ध्येय प्राप्त होणार नाही म्हणजे

नियोजन चांगले असले पण नियंत्रण म्हणजे त्यावर योग्य कृती जर झाली नाही तर मूल्यांकन सुध्दा बरोबर होणार नाही म्हणजे जी ही प्रक्रिया आहे ती तिनही पायऱ्यांवर अवलंबुन आहे व या तिनही पायऱ्या परस्पराशी संबंधीत आहे. त्यामुळे गृहव्यवस्थापन प्रक्रिया जर योग्य अभ्यासायची असेल तर त्यासाठी त्याच्या पायऱ्यांचा सविस्तर अभ्यास करणे गरजेचे आहे त्या पुढील प्रमाणे

## १) नियोजन (Planning)

नियोजन ही गृहव्यवस्थापन प्रक्रीयेची महत्वाची पायरी आहे किंवा तो गृहव्यवस्थापन प्रक्रीयेचा पायाच आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. कारण नियोजन जर योग्य असेल तर पुढील पायऱ्या म्हणजे नियंत्रण व मूल्यांकन हे योग्य होईल म्हणजे नियोजन करित असतांना सर्वांगीन विचार करुनच नियोजन करावयास पाहिजे कारण कोणत्याही कामाची यशस्वीतता ही जास्तीत जास्त नियोजनावरच अवलंबुन असते. कोणतेही काम करायचे असेल किंवा एखादी समस्या असेल तर ती सोडविण्यासाठी आधी नियोजन करणे गरजेचे आहे. उदा. एखाद्या साधरण घरातील मुलीला बाहेर देशात शिक्षण घेण्यासाठी जायचे असेल तर त्याचे नियोजन आधीपासूनच करावे लागेल. कारण बाहेर देशात शिक्षणासाठी जायचे असल्यास पैसा जास्त लागणार व एवढा पैसे एकदम जमा होणार नाही. त्यासाठी आधीपासूनच बचत सुरु करावी लागते किंवा शिष्यवृत्ती मिळते का ते बघावे लागेल मिळत असेल तर त्यासाठी काय काय अटी व नियम आहे याचा सर्वांचा विचार करुन जर त्यात बी.ई.ला ९५% पाहीजे अशी अट असेल तर बी.ई. ला तसा अभ्यास करुन तेवढे टक्के कसे मिळवता येईल याचे सर्व नियोजन योग्य करावे लागेल तरच तीला पुढे बाहेर देशात शिक्षण घ्यायला जाता येईल.

### यशस्वी नियोजनासाठी पुढील घटक आवश्यक आहे.

**नियोजन जर योग्य व्हावे असे वाटत असेल तर काही बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे.**

**१) नियोजन हे वास्तववादी असावे :-** तसे जर नसेल तर पुढे नियंत्रण योग्य होणार नाही व उचीत ध्येयप्राप्ती न झाल्यामुळे मूल्यांकन सुध्दा बरोबर होणार नाही.

उदा :- एखाद्या साधारण घरातील व्यक्तीने ठरविले कि मला मोठा बंगला एका वर्षातच बांधायचा आहे पण त्याच्याकडे तेवढा पैसा जर नसेल तर त्याला मधेच घराचे काम थांबवावे लागेल व घर पूर्ण होणार नाही.

**२) नियोजन हे लवचिक असावे :-** नियोजन हे काटेकोर असेल तर कृती करणे कठीण होते काही जर अडचणी निर्माण झाल्या तर योग्य ध्येयप्राप्ती होत नाही म्हणून नियोजन जर लवचिक असेल तर काही अनपेक्षितपणे अडचण आल्यास योग्य बदल करुन ध्येय प्राप्त करता येते.

**३) आवड निवड :-** नियोजन करीत असतांना व्यक्तीची आवड निवड लक्षात होणे अतिशय महत्वाचे आहे. कारण एखादे काम जर त्या व्यक्तीला आवडत नसेल व त्या व्यक्तीस करण्यास सांगीतले तर ते त्या व्यक्तीस कंटाळवाने वाटेल व काम योग्य व वेळेत पूर्ण होणार नाही.

उदा. एखाद्या विद्यार्थीनीस चित्रकला आवड असेल तर तिला जर वाणिज्य शाखेत ॲडमीशन करण्यात आले तर त्यात ती योग्य यश संपादन करु शकणार नाही.

**नियोजनाचे फायदे :-**

१) नियोजन केल्यामुळे काम वेळेत पूर्ण होते.

२) नियोजन केल्यामुळे वेळ व श्रम, पैसा या साधनसंपत्तीची बचत होते.

३) नियोजन योग्य असेल तर काम अर्धवट राहण्याचा धोका कमी असतो.

४) नियोजनामुळे काम सोपे होते. कारण काही अडथळे असल्यास त्याचा विचार आधिच नियोजनात केलेला असतो.

५) कामातील दोष कमी होण्यास नियोजनामुळे मदत होते.

## ३) नियंत्रण (Controlling)

नियंत्रण हि गृहव्यवस्थापन प्रक्रीयेची दुसरी आणि महत्वाची पायरी आहे कारण याच पायरीवर खरी कार्याची सफलता अवलंबुन असते. वर्तमान काळात घडणारी पायरी आहे. नियोजन कितीही विचारपूर्वक व चांगले केले पण त्याचे नियंत्रण जर योग्य झाले नाही तर ध्येयप्राप्ती होणार नाही.

नियंत्रण म्हणजे केलेल्या नियोजनावर कृती करणे होय. हे जरी सत्य असले तरी वेळेनुसार व परिस्थितीनुसार त्यात बदल सुध्दा करता येतात व उचीत ध्येयप्राप्ती साध्य करता येते. उदा.उद्या घरी पाहुणे येणार म्हणून बासुंदी करायचे नियोजन केले पण वेळेवर दुधच मिळाले नाही तर मग नियोजनात नियंत्रणामध्ये बदल करुन वेळेवर शिरा करणे किंवा गुलाबजामुन करणे असे  निर्णय नियंत्रण प्रक्रियेमध्ये असे अनेक निर्णय घ्यावे लागतात म्हणून असे निर्णय घेण्यासाठी काही काही महत्वाच्या बाबी आहेत त्या पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| **गृहव्यवस्थापन** | **१) नियोजन** |
| **प्रक्रियेच्या पायऱ्या** | **२) नियंत्रण** |
| | **३) मूल्यांकन** |

### १) प्रेरणा देणे :–

प्रत्येक काम करण्याची पध्दत व गती वेगळी असते त्याचप्रमाणे रुची व आवड सुध्दा वेगवेगळी असते. त्यामुळे निर्णय जर सामुहिक गटासाठी घेतले असेल तर प्रत्येकास प्रेरणा देणे गरजेचे आहे जर कामाची गती कमी असेल तर प्रेरणेमुळे काम योग्य वेळेत पूर्ण होवु शकते. त्यामुळे वारंवार नियंत्रण करित असतांना प्रेरणा देणे गरजेचे आहे. आणि निर्णय व्यक्तीगत असेल तर कधी कंटाळा आला किंवा आळस आला तर प्रेरणेमुळे काम योग्य होवू शकते.

## २) कामाचा आढावा घेणे –

आपण नियोजन केले व त्याप्रमाणे कृती करणे म्हणजे नियंत्रण होय पण हे करीत असतांना वारंवार कामाचा आढावा घ्यावा लागतो की, नियोजनाप्रमाणे काम सुरु आहे का किंवा कामाची गती कमी अधिक तर होत नाही ना आढावा जर घेतला नाही तर ससा आणि कासव या गोष्टीसारखे होईल व उचीत ध्येय प्राप्त होणार नाही.

## ३) कामाची तपासणी करणे –

ज्या प्रमाणे आपण आढावा घेतो त्याचप्रमाणे कामाची तपासणी सुध्दा करायला पाहिजे काम योग्य होत आहे का कि अयोग्य होत आहे. सामुहिक निर्णयामध्ये तपासणीस जास्त महत्व आहे. तपासणीमुळे लक्षात येते कामाचा दर्जा कसा आहे आणि नियोजनाप्रमाणे काम होत नाही असे आढळल्यास त्यात सुधारणा करता येते. वेळोवेळी तपासणी केली असता मग शेवटी पश्चाताप करण्याची वेळ येत नाही.

## ४) देखरेख ठेवणे :–

आपण जेव्हा कोणतेही कार्य वैयक्तीक करीत असतो तेव्हा त्यावर जास्त देखरेख ठेवायची गरज पडत नाही. परंतु जेव्हा तेच कार्य समुहानी करीत असतो तर त्यावर जास्त देखरेख ठेवावी लागते.

उदा. घरी एखादे लग्न कार्य असेल आणि प्रत्येकास नियोजन करुण कुटुंब प्रमुखांनी कामे वाटून दिली असेल व त्यावर जर देखरेख ठेवली नाही तर लग्नाच्या वेळी एखादे कार्य अपूर्ण राहीले तर वेळेवर गोंधळ होवू शकतो म्हणून दिलेली काम सर्व सदस्य बरोबर करीत आहे का यासाठी देखरेख करणे अत्यंत आवश्यक आहे.

### ५) योग्य व नविन निर्णय घेणे :-

आपण नियोजन प्रक्रियेत बघीतले की, नियोजन हे लवचिक असावे कारण पुढे नियंत्रण करीत असतांना जर काही समस्या उदभवली तर त्यात बदल करुन नविन निर्णय घेता येवू शकतात. उदा. एखाद्या मुलीच्या वडीलांनी ठरविले कि, मुलीचे लग्न सरकारी नोकरी असणाऱ्या मुलांशीच करायचे पण जर एखाद्या चांगला मुलाचे स्थळ आले आणि त्याला कंपनीत नोकरी व घरी जोड व्यवसाय आहे व सरकारी नोकरी नाही पण पगार चांगला आहे. अशा वेळी नियोजन जर लवचिक असेल तर त्या मुलाशी त्या मुलीचे लग्न होवू शकते आणि वडीलांचा स्थळ पाहण्यासाठीचा वेळ, पैसा व श्रम सुध्दा कमी होवू शकतात.

### ३) मुल्यांकन

मूल्यांकन ही गृहस्थापन प्रक्रियेची तिसरी व महत्वाची पायरी आहे. कारण आपण केलेले नियोजन व त्यानुसार केलेले नियंत्रण हे योग्य झाले का हे आपणास या पायरीमुळे कळते. ठरविलेले ध्येय प्राप्त झाले का? नाही झाले तर काय चूका झाल्या हे सर्व आपणास मुल्यांकन या पायरीतून कळते आपण नविन कार्य करतांना कोणती काळजी घ्यायला पाहीजे याचा सुध्दा आढावा घेता येतो.

**मुल्यांकनाचे प्रकार तिन आहेत :-**

१) औपचारिक मूल्यांकन

२) अनौपचारिक मूल्यांकन

३) स्वमूल्यांकन

### १) औपचारिक मूल्यांकन :-

औपचारीक मूल्यांकन हे काटेकोर पध्दतीने केलेले असते त्यास नियम व अटी असतात चूक बरोबर गुणदान सुध्दा असू शकते त्यातुन आपणास योग्य निकाल मिळू शकते. उदा.रांगोळी स्पर्धा जर असेल तर ति रांगोळी किती ठिपक्याची आहे, ठिपके सरळ आहेत का, ती कोणत्या वयोगटातील आहे, तिने

स्पर्धेचा संदेश जर त्यातून द्यायचा असेल तर तो हेतु साध्य झाला का हे सर्व बघूनच नंबर दिला जातो याला म्हणतात औपचारिक मुल्यांकन या घ्यायची असेल तर तिला सुधारणा करता येईल.

### २) अनौपचारिक मूल्यांकन :-

अनौपचारिक मूल्यांकनात वरवर मूल्यांकन केले जाते. त्यास नियम व अटी शिथील असतात यातुन आपणास चांगले की, वाईट याचा अंदाज घेता येतो. उदा. एखाद्या मुलीने घरासमोर रांगोळी काढली असेल व ती आकर्षक रंगयोजना केली झाली तर ती व्यक्ती म्हणेल छान आहे. सुंदर दिसते किंवा अप्रतिम रांगोळी. हे झाले अनौपचारिक मुल्यांकन, यात किती वेळ लागला, किती ठिपके काढले याचे सखोल मुल्यांकन होणार नाही.

### ३) स्वमूल्यांकन :-

स्वमूल्यांकन म्हणजे स्वतःनीच स्वतःचे केलेले मूल्यांकन होय हे आपण रोजच करित असतो. म्हणजेच ते आपल्या हातुन अनावधानाने होते. कोणतेही छोटे मोठे कार्य केल्यानंतर आपण ते काम बरोबर झाले की नाही याची तपासणी करतो आणि जर ते बरोबर झाले नसेल तर आपले काय चुकले हे सुध्दा बघतो. उदा. गृहीणी रोज बघते सर्व पदार्थ चविष्ट झाले किंवा नाही आणि एखादा पदार्थ बिघडला तर त्यात पुढच्या खेपेला सुधारणा सुध्दा करित असते. परंतु हे मूल्यांकन सदोष असू शकते.

मूल्यांकन करित असतांना त्याचे सुध्दा प्रकार आहेत जसे गृहीणी स्वतःलाचा प्रश्न विचारुन मुल्यांकन करु शकते, किंवा दुसऱ्याच्या कामाशी तुलना करुण सुध्दा मूल्यांकन करु शकते. बऱ्याच वेळा प्रश्नावली किंवा नोंदी घेवुन सुध्दा स्वमुल्यांकन केल्या जावू शकते तर कधी इतरांशी चर्चा करुन सुध्दा मुल्यांकन करु शकते पण त्याचा हेतु हा मात्र एकच असते इच्छीत ध्येयप्राप्ती झाली कि नाही हे बघने.

## ३) मुल्यांकनाचे फायदे :-

१) काम योग्य झाले किंवा नाही हे बघता येते.

२) झालेल्या चुकांची पुढील वेळेला दुरुस्ती करता येते.

३) मुल्यांकनामुळे पुन्हा काम करतांना आपल्यात आत्मविश्वास निर्माण होतो.

४) कामाच्या दर्जात सुधारणा होते.

५) आपली योग्यता कळते.

६) मतपरिवर्तन होते.

## कौटुंबिक साधनसंपत्ती (Family Resources) :-

कौटुंबिक साधनसंपत्तीचा अर्थ :-

दैनंदिन जीवनामध्ये विविध प्रकारचे कामे करावी लागतात. असंख्य गरजा पूर्ण करायच्या असतात. वेगवेगळी लहान मोठी ध्येये साध्य करावी लागतात. त्याकरता काही साधनांची मदत घ्यावी लागते.

काही संसाधने दृश्य असतात तर काही अदृश्य असतात. काही संसाधने तुलनात्मकदृष्ट्या मुबलक प्रमाणात असतात तर काही कमी प्रमाणात असतात.

प्रत्येक कुटुंबाजवळ साधन संपत्ती सारख्या प्रमाणात नसते. एखाद्या कुटुंबाजवळ भौतिक साधन संपत्ती जास्त तर दुसऱ्या कुटुंबाकडे भौतिक साधन संपत्ती अधिक असते. उदा. एखाद्या कुटुंबातील गृहिणीजवळ शरीर स्वास्थ चांगले असल्यामुळे, शक्ती ही साधन संपत्ती भरपूर आहे. तेव्हा वेळ व शक्तीचा उपयोग करुन ती व्यक्ती बहुतांशी गृहकार्ये स्वतः करणार आणि पैसा ह्या भौतिक साधनसंपत्तीची बचत करुन ती व्यक्ती याउलट दुसऱ्या कुटुंबातील गृहिणीच्या अस्वास्थामुळे शक्ती ही अभौतिक साधन संपत्ती कमी असल्यामुळे तिला पैसा खर्च करुन नोकराकडून गृहकार्ये करुन घेणे आवश्यक असते. म्हणजेच जी साधन संपत्ती कमी आहे. त्या ऐवजी दुसऱ्या साधनांचा उपयोग आपणांस करावा म्हणजेच जी साधन संपत्ती भरपूर प्रमाणात उपलब्ध असून देखील व्यवस्थापन

योग्यप्रकारे केले जात नाही. तर काही कुटुंबात अपुऱ्या साधन संपत्तीव्दारे उच्च प्रतीचे व्यवस्थापन केले जाते. म्हणजेच व्यवस्थापन प्रत्येक कुटुंबात केले जाते. परंतु ते योग्य की अयोग्य हे व्यक्तीच्या कार्य कुशलतेवर निर्भर असते.

**संसाधनांची व्याख्या : Defination**

**मॅकलॉक व डेकन यांच्या मताप्रमाणे :** गरजा भागविण्याचे सुप्त सामर्थ्य आणि उपलब्ध असलेली साधने म्हणजे साधनसंपत्ती होय.


**"Resources as means which are available and recognised for their potential in meeting demands."**

**रॅण्डम हाऊसच्या शब्दकोषानुसार :** रक्षित करण्यात आलेल्या पुरवठ्याच्या आधारावर व मदतीच्या स्त्रोताला साधन असे म्हणतात.

**"A source of supply support or aid especially one held in reserve."**

## कौटुंबिक साधनसंपत्तीचे वर्गीकरण

कौटुंबिक साधनसंपत्तीचे मुख्य दोन भागात वर्गीकरण केलेले आहे– मानवीय साधन संपत्ती आणि अमानविय साधनसंपत्ती मानवीय साधनसंपत्तीमध्ये अमूर्त स्वरुपातील साधनसंपत्तीच्या समावेश होतो व अमानवीय साधनसंपत्ती ही मूर्त स्वरुपात असते.




**मानवीय साधनसंपत्ती :–**

**१) ज्ञान :–** ज्ञान ही अतिशय महत्वाची साधन संपत्ती आहे कारण कोणतेही कार्य आपणास करायचे असल्यास सर्वप्रथम आपणास त्या गोष्टीचे ज्ञान असायला हवे ज्ञान असेल तर ते काम आपण उत्तम प्रकारे करु शकतो ज्ञान हे आपण अध्ययनाने मिळवू शकतो आता तर ज्ञान प्राप्त करण्याची खुप सारी साधणे उपलब्ध आहे आणि त्यामुळे अगदी लवकर लवकर हवे ते ज्ञान आपणास प्राप्त होवु शकते.

**२) योग्यता :–** गृहव्यवस्थापन करित असतांना योग्यता ही साधनसंपत्ती अतीशय महत्वाची आहे. कोणतेही कार्य करायचे झाल्यास त्यासाठी त्या व्यक्तीची योग्यता असावयास पाहिजे आणि योग्यता ही प्रयत्नातुन प्राप्त होते. त्यात आपण अधिका–अधिक प्रयत्न करुन वाढ करु शकतो. उदा :– गृहीणीला जर चांगला स्वयंपाक करता येत नसेल तरी ती सतत प्रयत्न करुन चांगला स्वयंपाक बनवायला शिकु शकतो म्हणजे स्वयंपाक बनवण्यात ती योग्यता प्राप्त करु शकते.

**३) कौशल्य :–** योग्यता आणि कौशल्य यात बऱ्याच प्रमाणात साम्य आहे, कौशल्य हे सुध्दा सरावाने प्राप्त होते. सतत जर एखाद्या कामाचा सराव करत राहील्यास त्या कामात कुशल होते आणि मग ही साधनसंपत्ती गृहव्यवस्थापनासाठी वापरता येते.

एखाद्या गोष्टीत आवड असेल तर त्या गोष्टीचा सारखा सराव केल्यास कुशल होते. उदा.एखाद्या मुलीला गाण्याची आवड असेल तर ती रोज रियाज करुण त्यात कौशल्य प्राप्त करु शकते.

**४) वेळ :–** वेळ ही मर्यादीत साधनसंपत्ती आहे आणि ही साधनसंपत्ती सर्वांना सारखाच प्रमाणात मिळते म्हणजे गरीब असो किंवा श्रीमंत सर्वांना एक दिवसात २४ तासच मिळताच कुणी पैसे खर्च करुण २५ तास मिळवू शकत नाही. म्हणून ही साधनसंपत्ती सारखी असली तरी या साधनसंपत्तीचा कोण कसा उपयोग करतो यावर अवलंबुन आहे.

कारण सर्व व्यक्ती या आपल्या मनाप्रमाणे या २४ तासाचा वापर करीत असतो. कुणी अभ्यास करतो, कुणी पैसा कमवितो तर कुणी फक्त आराम करुण वेळ वाया घालवतो म्हणून यास साधन संपत्ती म्हणावी लागेल.

**५) शक्ती :–** शक्ती ही साधनसंपत्ती मर्यादीत आहे. पण ती प्रयत्न करुन आपण वाढवू शकतो शक्ती ही महत्वाची साधनसंपत्ती आहे. कारण आपल्याकडे ज्ञान,

कौशल्य वेळ इत्यादी साधनसंपत्ती असते पण आपणास काम करण्याची इच्छा पण असेल, पण अंगात शक्तीच नसेल तर आपण कोणतेच कार्य व्यवस्थीत करु शकणार नाही. शक्तीचे दोन प्रकार आहे.

**१) मानसीक शक्ती.**

**२) शारीरीक शक्ती.**

मानसिक शक्ती म्हणजे एखादी व्यक्ती कंपनीत कामाला जाते त्याला जर फक्त बसवूनच लॅपटॉप वर काम करायचे असते तरी पण ती व्यक्ती घरी आल्यावर थकली असते म्हणजे त्याची मानसिक शक्ती कमी झालेली असते. आणि त्याच कंपनीत काम करणारा वर्कर असेल ह्याला शारीरीक कष्टाचे काम असेल तो सुध्दा घरी आल्यावर थकलेला असतो यात त्याची शारीरीक शक्ती खर्च झालेली असते. म्हणूनच दोन्ही माणसीक व शारीरीक दोन्ही शक्ती महत्वाच्या आहे.

**६) आवड किंवा रूची :-** कोणतेही कार्य करीत असतांना ती कार्य करण्याची आवड असावयास पाहिजे म्हणजे कार्य चांगल्या प्रकारे पार पडते आणि कामाचा कंटाळा येत नाही काम करण्यास ऊर्जा मिळते.

घरामध्ये प्रत्येक व्यक्तीची आवड वेगवेगळ्या कामात असते. त्यानुसार जर कामाचे व्यवस्थापन केले तर कार्य लवकर व चांगले होण्यास मदत मिळते.

**७) मानसिकता/मनोवृत्ती :-** कोणतेही काम करण्याची इच्छा असेल तर ते काम चांगल्या प्रकारे पार पडते आणि जर ते काम करायची माणसिकता नसेल तर मानसिक थकवा येतो कामाला वेळ जास्त लागतो कामचा दर्जा चांगला राहीलच असे नाही त्यामुळे मनोवृत्ती हवी म्हणजे ते काम रटाळ वाटत नाही काम करण्यात उत्साह वाटतो व कार्य लवकर होते.

**अमानवीय साधनसंपत्ती :-**

**१) पैसा :–** पैसा ही अतिशय महत्वाची साधनसंपत्ती आहे. ही साधनसंपत्ती मर्यादीत आहे परंतु ती आपण बाकी साधनसंपत्तीचा वापर करुन अधिक पैसा मिळवू शकतो. उदा. घरात एकाच व्यक्ती नोकरी करित असेल तर पैसा, वेळ, शक्ती इ. साधनसंपत्ती असून सुध्दा त्या व्यक्ती घरातच राहत असेल तर पैसा येणार नाही. पण सर्वांनीच कामे करायचे ठरविले तर पैसा सुध्दा जास्त जास्त येईल. कारण प्रत्येक कार्य करण्यासाठी पैसा ही साधनसंपत्ती लागते म्हणून तो जेवढा जास्त तेवढ्या सुख सुविधा जास्त उपभोगता येतील व गृहव्यवस्थापन करणे सुध्दा कठीण होणार नाही.

परंतु याला काही अपवाद सुध्दा असु शकतो काही कुटुंबात पैसा कमी असून सुध्दा व्यवस्थापन चांगले असल्यामुळे घरात सौख्य असते आणि काही घरात मुबलक पैसा असून सूध्दा नियोजन योग्य नसेल तर पैश्याचा अपव्यय होतो व घरात अशांती राहते.

**२) भौतिक वस्तू :–** आपण आपल्या गरजा भागवण्यासाठी ज्या ज्या वस्तुचा वापर करतो त्या घरातील सर्व वस्तुंना भौतिक वस्तु असे म्हणतात.

१) भांडी :– आपण रोज वापरण्यात येणारी सर्व छोटी मोठी भांडी व श्रमबचतीसाठीची यंत्रसामुग्री होय.

२) कपडे :– आपणास रोजच्या वापरण्यासाठी लागणारे कपडे वेगवेगळ्या प्रसंगानुसार घालायचे कपडे, ऋतु मानानुसार घालावयाचे कपडे इ. चा समावेश होतो.

३) वाहने : आपणास एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी जाण्याकरीता लागणाऱ्या वैयक्तीक साधनाचा समावेश यात होतो.

४) फर्नीचर यात घरातील आराम मिळण्यासाठीच व शोभा वाढवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या फर्निचरचा यात समावेश होतो.

उदा. आलमाऱ्या, सोफासेट टेबल, खुर्च्या पलंग इ.

५) स्थावर वस्तू : स्थावर वस्तू मध्ये घर, शेतजमीन स्वतःच्या मालकीचे दुकान इत्यादीचा समावेश होतो.

**३) सामुदायिक सोयी :-** सामुदायीक सोयी म्हणजे सार्वजनिक रुपात ज्या सोयीचा लाभ घेतो. त्या मानव  हा समाजात राहणारा प्राणी असून त्याला या सोयीची नेहमी गरज भासत राहते ते पुढील प्रमाणे

अ) शैक्षणिक सोयी :- यामध्ये बालमंदिर, शाळा, महाविद्यालये आणि अनेक शैक्षणिक क्लास याचा यात समावेश होतो.

ब) आरोग्यविषयक सोयी : यामध्ये ग्रामीण रुग्नालय, शासकीय रुग्णालय काही सेवाभावी संस्था चालवत असणारे दवाखाने, फिरते दरखाने, कुटुंबनियोजन केंद्र, टिकेंद्र कुटुंब कल्याण केंद्र इत्यादीचा समावेश यात होतो.

ड) वाहतुक विषयक सोयी :- यामध्ये दळणवळणासाठी उपयोगात येणाऱ्या साधनाचा समावेश होतो. जसे रेल्वे, बस, आटोरिक्षा, घोडागाडी, चांगले रस्ते, हवाईवाहतुक, जलवाहतुक इत्यादीचा समावेश होतो.

ई) आर्थीक व्यवहार केंद्र व सामाजिक सोयी :- बँक, पोस्ट ऑफीस, दुरभाष केंद्र (टेलिफोन ऑफीस इ.)

उ) खेळ व मनोरंजनात्मक सोयी : खेळाचे मैदान, जिम, सिनेमागृह, नाट्यगृह, बगीचे, हॉटेल, सहलीचे ठिकाण, उद्याने इत्यादी.

ऊ) इतर सोयी :- बाजारपेठ, पाळणाघर, पाणीपुरवठा, विजपुरवठा, देऊळ, जिवनाश्यक वस्तूचा पुरवठा इत्यादीचा समावेश होतो.

**कौटुंबिक साधनसंपत्तीची वैशिष्ट्ये :-**

कोणतेही गोष्ट करायची झाल्यास त्याचे गुण, दोष, उद्दीष्ट, वैशिष्टे बघने अत्यंत आवश्यक आहे तसे साधनसंपत्तीची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत. सर्व साधनसंपत्ती कमी जास्त प्रमाणात असली तरी त्याचे काही साम्य वैशिष्ट्ये

आहेत त्या वैशिष्ट्यावरुन आपणास त्याची उपयोगीता व महत्व लक्षात येते ती वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे

**१) सर्व साधनसंपत्ती उपयोगी असते :-**

आपण कौटुंबिक साधनसंपत्ती कोणती याचा अभ्यास केला आहे त्यात आपण बघीतले की, सर्व साधने ही कमी जास्त प्रमाणात सर्वानाच उपलब्ध झालेली असतात. काही साधने मर्यादीत असतात तर काही आपल्याला सरावाने वाढविता येतात असे असले तरी सर्वच साधने ही उपयुक्त असतात फरक फक्त तेवढाच असतो की, योग्य गृहव्यवस्थापनातुन आपण उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य उपयोग करुन इच्छीत ध्येय प्राप्ती कशी करतो त्या त्या व्यक्तीने केलेल्या व्यवस्थापनावर अवलंबुन असते. उदा. एखाद्या कुटुंबाजवळ पैसा ही साधनसंपत्ती कमी असेल तर ती व्यक्ती योग्य व्यवस्थापन करुन शक्ती व कौशल्य इ.साधनांचा वापर करुण पैसा या साधनसंपत्तीची कमतरता भासू न देता गृहकार्य योग्य प्रकारे पार पाडु शकते.

**२) संसाधनाचा उपयोग जिवनाची गुणवत्ता ठरविण्यात होतो :-**

सर्वांना सारखी साधन संपत्ती प्राप्त होत नसली तरी आपण त्या साधनसंपत्ती चा आपले जिवनात उपयोग करुण घेतो. यावर आपले जीवनमान उंचवण्यास मदत मिळते. काही गृहीणी कमी साधनसंपत्तीत सुध्दा योग्य घर चालवतात आणि काही कुटुंबात मुबलक साधनसंपत्ती असून सुध्दा त्या कुटुंबात मुबलक गृहसौख्य राहत नाही यासाठी संसाधानाबरोबरच गृहव्यवस्थापनाची जोड असावी लागते. तेव्हा उचीत ध्येय प्राप्त होवून कुटुंब सुध्दा सुखी व समाधानी राहते. उदा. एखाद्या खुप मोठ्या बंगल्यात गेल्यानंतर आपल्याला जेवढे समाधान व प्रसन्न वाटप नाही तर ते कधी-कधी एखाद्या खुप मोठ्या बंगल्यात एखाद्या साधारण छोट्याश्या घरी गेल्यावर आपणास वाटते यावरुन असे लक्षात येते की,

कौटुंबिक साधनसंपत्ती व्यवस्थापन आपण कसे करतो त्यावर आपल्या जिवनाची गुणवत्ता ठरते.

**३) साधनसंपत्ती मर्यादीत असतात :-**

साधन संपत्ती ही मर्यादीत असते त्यामुळे त्याचे योग्य व्यवस्थापन करुन वापरायला पाहिजे नाहीतर योग्य ध्येय प्राप्ती होणार नाही.

असे कोणतेच कुटुंब नाही कि त्यांना साधनसंपत्ती कमी पडत नाही. कारण सर्वांना काही ना काही साधनसंपत्ती कमी अधिक प्रमाणात असतेच जसे कुणाकडे पैसा ही साधनसंपत्ती कमी असेल तर शक्ती, कौशल्य, आवड अश्या जास्त असतीलच तर काहीनकडे शक्ती जास्त असेल तर पैसा ही साधनसंपत्ती कमी असते त्यामुळे अश्या मर्यादीत साधनसंपत्तीचे योग्य जर नियोजन केले नाही तर कुटुंब सुखी व समाधानी राहू शकत नाही.

**४) साधनसंपत्ती परस्परसंबंधीत असतात :-**

कोणतेही काम करायचे असल्यास आपणास साधनसंपत्ती गरज असते पण कोणतेही कार्य करण्यासाठी अनेक साधनांची गरज असते. उदा. गृहीनी जर स्वयंपाक करित असे तर फक्त स्वयंपाकाचे ज्ञान असून चालत नाही तर त्यासाठी आवड, शक्ती मनोवृत्ती, वेळ, पैसा अश्या अनेक साधनसंपत्तीची गरज भासते म्हणजेच सर्व साधनसंपत्तीचा एकमेकांशी सहसंबंध असतो व त्याचे योग्य व्यवस्थापन करुन चांगले कार्य होवु शकते.

**५) साधनसंपत्तीचा पर्यायी उपयोग असतो :-**

साधने ही विविध प्रकारची आहेत तसेच साधने मर्यादीत आहेत पण सर्व साधणे ही सर्वांना सारख्या प्रमाणात मिळत नाही. साधनसंपत्ती वापरतांना त्यासाठी अनेक पर्याय असतात.

उदा. एखाद्या गृहीणीकडे पैसा ही साधनसंपत्ती जास्त असेल पण वेळ व शक्ती ही साधनसंपत्ती कमी असेल तर ती पैसा देवून वेळ व शक्ती या साधनसंपत्तीची कमतरता दूर करु शकते.

**कौटुंबिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनावर परिणाम करणारे घटक :–**

१) कौटुंबिक परिस्थिती

२) आर्थीक परिस्थिती

३) व्यक्तीगत परिस्थिती

४) राजकीय परिस्थिती

५) सामाजिक परिस्थिती

६) आकस्मिक संकट

**१) कौटुंबिक परिस्थिती:–**

कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन करीत असतांना कुटुबाची परिस्थिती म्हणजे कुटुंबाचा दर्जा कोणता आहे हे जास्त महत्वाचे आहे कारण उच्च, मध्यम व निम्न असे स्तर आहे. त्याप्रमाणे साधन संपत्ती त्या–त्या कुटुंबामध्ये असते जसे उच्च वर्गात पैसा जास्त असेल तर शक्ती कमी असेल, निम्म वर्गामध्ये शक्ती जास्त असेल तर पैसा कमी असेल अश्या प्रकारे साधनसंपत्तीनुसार त्याचे व्यवस्थापन करावे लागेल व त्याचनुसार त्याचा परिणाम होतो.

**२) आर्थिक परिस्थिती :**

देशाची आर्थिक परिस्थिती व कुटुंबाची आर्थिक परिस्थिती याचा सुध्दा विचार करण्यात येतो जसे देश जर विकसित असेल तर सर्व साधनसंपत्ती मुबलक प्रमाणात प्राप्त होतील आणि देश जर विकसनशिल असेल तर काही सामुहीक साधनसंपत्ती काही प्रमाणात प्राप्त होतील. त्याचमुळे कौटुंबिक व्यवस्थापनावर आर्थीक परिस्थितीचा परिणाम होतो.

**३) व्यक्तीगत परिस्थिती :–**

कुटुंबातील असणारे साधन संपत्ती जसे ज्ञान, कौशल्य, आवड इत्यादी साधन संपत्ती किती आहे. यावर व्यवस्थापन अवलंबुन असते. तसेच घरात कोणत्या वयातील व्यक्ती आहे त्यानुसार सुध्दा ते निर्णय घेवु शकतात. तसेच जिवनचक्रानुसार सुध्दा व्यवस्थापनावर परिणाम होतो.

**४) राजकीय परिस्थिती :–**

देशाची राजकीय परिस्थिती सुध्दा व्यवस्थापनावर परिणाम करते. राजकीय अस्थीरता असेल तर त्याच पक्षानुसार निर्णय घेतले जातात आणि त्या निर्णयाचा परिणाम जनतेवर होतो. राजकीय परिस्थिती जर स्थिर असेल तर व्यवस्थापन सुध्दा करणे सोईचे जाते आणि त्यात जर अस्थीरता असेल तर मात्र व्यवस्थापनात सुध्दा अडथळे येवू शकतात.

**५) सामाजिक परिस्थिती :–**

मानव हा समाजशिल प्राणी आहे. त्यामुळे तो नेहमी समाजात राहतो. आणि त्या परिस्थितीचा परिणाम साधारण जिवनस्तरात राहत असेल तर त्याला त्यानुसार समायोजन करावे लागते तसेच नातेवाईक शेजार, मित्रमंडळ हे कोणत्या प्रकारचे आहेत त्यानुसार समायोजन करावे लागते. नातेवाईक जर जवळ राहत असेल, सारखे सारखे येणे जाणे असेल तर साधनसंपत्ती जास्त खर्च होईल, मित्रपरिवार मोठा असेल तर त्यांना वेळ देणे त्यांचे आदरतिथ्य करेणे यात सुध्दा साधनसंपत्ती जास्त खर्च होईल याउलट जर कुटुंब समाजात जास्त रमत नसेल कुणाचे येणे जाणे नसेल तर जास्त व्यवस्थापन करावे लागणार नाही.

**६) आकस्मिक संकट :–**

कोणतीही समस्या कधीच सांगुन येत नाही. त्यामुळे त्याचे व्यवस्थापन किंवा समाधान सुध्दा आधीच करुन ठेवता येत नाही. त्यामुळे याचा व्यवस्थापनावर खुप मोठा परिणाम होतो.

उदा. एखादे सामान्य कुटुंब असेल कमाई आणि खर्च जेमतेम असेल पण अश्या वेळेस जर कर्ता व्यक्तीचा अपघात झाला आणि त्याला रुग्णालयात पुष्कळ दिवस राहावे लागले व पैसा पण खुप खर्च झाला तर मग बाकी कामासाठी व्यवस्थापन करणे कठीण होईल.

# प्रकरण ३ रे
# निर्णय घेणे :

प्रत्येक व्यक्तीला रोजच्या जिवनात अनेक निर्णय घ्यावे लागतात. रोज प्रत्येकास किंवा प्रत्येक कुटुंबात काही ना काही समस्या असते व त्या समस्या सोडविण्यासाठी अनेक निर्णय घ्यावे लागतात. निर्णय घेणे ही माणसिक प्रक्रीया असली तरी पण तीला अनेक टप्यातुन जावे लागते.

आधीपेक्षा आजच्या गृहीणीला अनेक कार्य पार पाडावे लागते जसे नोकरी, व्यापार, उद्योग असे अनेक क्षेत्रात तीन अग्रगन्य प्रगती केली आहे. त्यामुळे तीला तर बाहेरील क्षेत्रात सुध्दा अनेक निर्णय घ्यावे लागतात. काही निर्णय अगदी सहज घेता येतात पण काही महत्वाचे व गुंतागुंतीचे असतात ते सोडविण्यास अनेक पायऱ्या पार पाडाव्या लागतात.

उदा. गृहीणी रोज काय स्वयंपाक करायचा ह्याचा निर्णय घेत असते. पण हे निर्णय तिला सवय व दररोज घ्यावे लागतात म्हणून ती सहज घेते. पण जर एखाद्या उद्योगात तर महत्वाचा निर्णय घ्यायचा असेल तर खुप विचारपुर्वक घ्यावा लागतो आणि असे निर्णय घेतल्यानंतर काय परिणाम होईल याचा सुध्दा विचार करावा लागतो म्हणून निर्णय हा योग्यच घ्यावा लागतो.

**परिभाषा :–**

**डी.वुड थॉमस** यांच्या मताप्रमाणे निर्णय घेण्यामध्ये कुटुंबाच्या त्या उद्देशाचे अस्तित्व जाणवते ज्याच्या पूर्ततेकरीता निर्णय घेतले जातात. (संदर्भ

वरील सर्व व्याख्याचा विचार करता असे लक्षात येते की, निर्णय प्रक्रीया ही सहज पार पडत नाही आणि निर्णय ही योग्य विचारपूर्वक घ्यावे लागतात बरेच वेळ एखादी समस्या सोडविण्यासाठी बरेच पर्याय उपलब्ध असतात आणि त्या पर्यायाची योग्य निवड करुन निर्णय घेणे कठीण असते. **D Wood Thomas, Socioloical Aspect of the Decision Making Process, Journal of Farm Economic-1956)**

**निकेल आणि डॉर्सी** निर्णय घेण्याच्या संकल्पनेत समस्येचे स्वरुप निश्चित करणे, वेगवेगळ्या कार्यवाही शोधून त्यांची आपसात तुलना करुन त्यातून योग्य कार्यवाहीची निवड करणे या गोष्टींचा समावेश होतात. **("The concept of decision making involves defining the problem, finding comparing and choosing a course of action.")**


**मायकेल यांच्या मत्ते,** "कोणताही निर्णय घेणारी व्यक्ती, त्याने घेतलेले निर्णय तिच्या किंवा त्याच्या उद्दिष्ट प्राप्तीच्या दृष्टीने सर्वोत्तम असावा."**("Any Decision maker would be very particular that his decision should be the best in the interest of achieving his or her objective.")**

वरील सर्व व्याख्याचा विचार करता असे लक्षात येते की, निर्णय प्रक्रीया ही योग्य विचारपूर्वक घ्यावे लागतात बरेच वेळा एखादी समस्या सोडविण्यासाठी बरेच पर्याय उपलब्ध असतात आणि  त्या पर्यायाची योग्य निवड करुन निर्णय घेणे कठीण असते.

**निर्णय प्रक्रियेच्या पायऱ्या :–**

काही निर्णय गुंतागुंतीचे असतात तर काही निर्णय हे सामुहिक असतात तर काही समुहासाठी घेतलेले निर्णय असतात असे निर्णय घेतांना खूप विचार करावा लागतो कारण जर निर्णय चूकीचा झाला तर त्याचा परिणाम अनेक

लोकांवर होतो व नुकसान सुध्दा जास्त होते. तसे तर सर्वच निर्णय पायऱ्यानी घ्यावे लागतात. काही निर्णय सचोटीने घेतले जातात त्यासाठी निर्णय प्रक्रियेच्या पायऱ्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे त्यापुढील प्रमाणे :-



**१) समस्येचे स्वरुप स्पष्ट करणे** :- सर्वप्रथम निर्णय घेण्याआधी आपणास समस्या ओळखता येणे आवश्यक आहे. समस्या कोणती आहे समस्या व्यक्तीगत आहे की, सार्वजनिक आहे ती सोडविण्यास किती वेळ लागू शकतो. त्या समस्येमागील पार्श्वभूमी बघायला पाहीजे त्यावरुन त्या समस्येचे नेमके स्वरुपात लक्षात आले की, समस्या सोडवण्यास व त्याकरीता घेण्यात येणारे निर्णय सोपे होते. समस्येचे स्वरुपात लक्षात आले नाही तर समस्याविषयी निर्णय घेण्यास काही महत्व राहणार नाही.

**२) समस्या सोडविण्यासाठी वेगवेगळे पर्यायी मार्ग शोधणे** :-

एकदा समस्येचे स्वरुपात लक्षात घेतल्यानंतर आपणास निर्णय घेणे सोपे जाते पण निर्णय ही मानसिक प्रक्रीया आहे त्यामुळे निर्णय घेत असतांना प्रथम वेगवेगळ्या पर्यायी मार्गाचा विचार करावयास पाहिजे म्हणजे समस्या सोडविण्यास कोणता मार्ग सोपा आहे हे बघता येते.

उदा. एखादी विद्यार्थीनी १२ वी पास झाली व तिला पुढील कोणता विषय घ्यायचा कोणत्या विभागात पदवी घ्यावी ही समस्या असेल तर वेगवेगळे पर्याय म्हणजे कला शाखा घ्यायची का, वाणिज्य घ्यायची कि विज्ञान शाखेत ॲडमिशन करायची तीला कोणत्या विषयात आवड आहे. कोणत्या शाखेत प्रवेश करण्याची आर्थीक परिस्थिती आहे हे सर्व पर्यायी मार्ग शोधावे लागतील.

**३) कल्पनेत वेगवेगळ्या मार्गाचे अनुगमण करणे** :-

आपण समस्या सोडविण्यासाठी जे पर्यायी मार्ग शोधले त्या सर्व पर्यायाचे कल्पनेत अनुगमन करुण पाहावे म्हणजे आपण जे पर्याय शोधले आहेत त्या सर्व पर्यायाची कल्पनेत कृती करुण बघावी म्हणजे विचार करावा. कोणता मार्ग निवडला म्हणजे सोपे होईल. कोणत्या मार्गानी आपणास इच्छीत ध्येय प्राप्त होईल सर्व बघावे. कोणत्या मार्गानी आपल्या वेळ, श्रम, पैसा इत्यादी साधनसंपत्तीची बचत होईल व ध्येय प्राप्त होईल.

## ४) सर्वात यशस्वी होवू शकणाऱ्या पर्यायी मार्गाची निवड करणे :-

वेगवेगळ्या पर्यायाची कल्पना केल्यानंतर आपणास कोणता पर्याय योग्य व सोयीचा आहे हे लक्षात येते. आपण त्याची कल्पनेत नियंत्रण केल्यामुळे आपणास योग्य पर्यायाची जाणीव होते. आणि त्यामुळे आपल्या इच्छीत ध्येयाची प्राप्ती होते. इच्छीत ध्येयप्राप्ती त्यामुळे समस्यांचे समाधान मिळविण्यासाठी योग्य पर्याय ही अतिशय महत्वाची पायरी आहे त्यामुळे हा निर्णय घेतांना योग्य विचारपूर्वक व्हावयास पाहिजे.

## ५) निर्णयाच्या परिणामाची स्विकृती :-

समस्याचे समाधान शोधण्यासाठी वेगवेगळे पर्याय शोधणे त्याचे कल्पनेत अनुगमन करणे त्यानंतर निर्णय घेणे हे सर्व झाल्यानंतर आपण निर्णय घेतला त्याचे जे चांगले किंवा वाईट परिणाम होतील त्याला जबाबदार सुध्दा आपणच राहणार त्यामुळे आपण तो पायऱ्यांचा विचार करुनच घ्यावयास पाहिजे म्हणजे निर्णय जर योग्य असेल तर त्याचा परिणाम सुध्दा चांगले होतील व ध्येयप्राप्ती सुध्दा होईल.

## ६) निर्णयाचे प्रकार :-

आपण दैनंदिन जिवनात निर्णय घेतो पण सर्वच सारखे नसतात. काही निर्णय अगदी सहज घेतले जातात तर काही अतिशय किचकट असतात त्या निर्णयाचे प्रकार पुढील प्रमाणे :



**१) व्यक्तीगत निर्णय :-**

व्यक्तीगत निर्णय हे स्वतःने स्वतःसाठीच घेतलेले असतात हे निर्णय घेण्यास सोपे असते कारण स्वतःची समस्य व उपलब्ध साधनसंपत्ती याची सर्व माहिती व्यक्तीला असते म्हणून सर्व माहिती व्यक्तीला असते म्हणून हे निर्णय घेण्यास वेळ कमी लागतो.

व्यक्तीगत निर्णय हे अतिशय सरळ असतात ते घेण्यास जास्त मेहनत लागत नाही. उदा.आज नाश्त्याला काय बनवायचे किंवा घरी स्वयंपाक काय बनवायचा कारण ह्यासाठी तिला सर्व गोष्टीची कल्पना असते त्यामुळे तीला निर्णय घेणे सोपे जाते.

**२) सामुहिक निर्णय :-**

सामुहिक निर्णयामध्ये एका पेक्षा जास्त व्यक्ती मिळून हा निर्णय घेतला जातो असे निर्णय घेतांना समस्येबद्दल व ती सोडविण्यासाठी सर्वाचे मत विचारात घेतले जाते आणि त्यामुळे समस्यासोडविण्यासाठी लागणारे अनेक पर्याय आपल्याकडे असतात हे निर्णय घेतांना वेळ जास्त लागतो कारण अनेक पर्यायानपैकी एका पर्यायावर मतऐक्य घेण्यास वेळ लागतो पण हे निर्णय गुंतागुंतीचे असले तरी दर्जेदार असतात कारण ते बरेच विचार मंथन करुन घेतले जातात. उदा.महाविद्यालयात एखादी परिषद घ्यायची असेल तर पाहुणे कोण येणार, वेळ किती तारीख कोणती असे सगळे निर्णय घ्यायचे असेल तर ते समुहाने घ्यावे लागतात.

**३) बौध्दीक निर्णय :-**

बौध्दीक निर्णय हे समुहाने किंवा वैयक्तीक असतात पण त्याचे अनेक प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे

१) केंद्रीत निर्णय

२) अनुभवाने घेतलेले निर्णय

३) महत्वपुर्ण निर्णय

४) शिक्षणामुळे घेतलेले निर्णय

५) दिर्घकालीन निर्णय

६) आर्थीक निर्णय

बौध्दीक निर्णय हे बुध्दीच्या जोरावर आपआपल्या बौध्दीक क्षमतेनुसार घ्यायचे असता केंद्रीत निर्णय हे केंद्रबिंदू माणून घेतले जात तर अनुभवाने घेतलेले निर्णय हे पूर्वी आलेल्या अनुभवावरुन घेतले जातात. महत्वपूर्ण निर्णयामध्ये महत्वाचे निर्णय म्हणजे मुलांचे लग्न, शिक्षण असे असतात.

एखाद्या विशिष्ट शाखेचे शिक्षण घेतले असल्यास त्या शिक्षणानुसार काही निर्णय घेतले जातात. तर काही निर्णय हे दिर्घकालीन असतात जसे, नोकरी, व्यवसाय, गुंतवणुक इत्यादी असतात. तसेच काही निर्णय हे आर्थीक असतात जसे पैशाचे व्यवहार वस्तुची खरेदी, मालमत्ता खरेदी इत्यादी निर्णय घ्यावे लागतात हे सर्व निर्णय महत्वाचे असतात.

**४) सवयीने घेतलेले निर्णय :-**

आपण सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत दिवसभरात बरेच निर्णय घेत असतो पण काही निर्णय आपण सहज घेतो त्यासाठी जास्त विचार करण्याची किंवा नियोजन करण्याची गरज पडत नाही जसे रोज ऑफीसला जाणारा व्यक्ती कशानी जायचे. कोणत्या मार्गानी जायचे याचे जास्त निर्णय घेत नाही कारण त्यांना ते निर्णय रोजची सवय झालेली असते हे निर्णय सोपे असतात व याला वेळ व श्रम पण जास्त लागत नाही.

## गृहव्यवस्थापनात निर्णय घेण्याची भूमीका :-

निर्णय हा गृहव्यवस्थापनाचा आत्मा आहे असे म्हणने वावगे ठरणार नाही कारण गृहव्यवस्थापन करीत असतांना आपल्याला प्रत्येक वेळेस अनेक निर्णय

घ्यावे लागतात. निर्णय प्रक्रियेशिवाय गृहव्यवस्थापन करणेच शक्य नाही. त्यामुळे निर्णय घेण्याची गृहव्यवस्थापनात फार महत्वाची भूमिका आहे.

गृहव्यवस्थापन करित असतांना आपण अनेक निर्णय घेतो ते निर्णय योग्य असेल तर व्यवस्थापन योग्य होते व निर्णय जर चूकीचे झाले तर आपले व्यवस्थापन बरोबर होत नाही. त्यामुळे आपण उचीत ध्येयप्राप्ती करण्यासाठी योग्य व्यवस्थापन करावे लागते व गृहव्यवस्थापन चांगले होण्यासाठी उचीत गृहव्यवस्थापन व निर्णय प्रक्रिया यांचा अतुट संबंध आहे. आणि त्याचे तसे महत्व सुध्दा आहे.

निर्णय ही जिवनावश्यक प्रक्रिया आहे जिवन जगत असतांना कितीतरी निर्णय घ्यावे लागतात हे निर्णय आपण जास्तीत जास्त कौटुंबिक सौख्यसाठी घेत असतो व कौटुंबिक सौख्य हे गृहव्यवस्थापनात अवलंबून असते म्हणून गृहव्यवस्थापन व निर्णय प्रक्रिया याचा घनिष्ट संबंध आहे व महत्वाची भूमीका सूध्दा आहे.

**निर्णय प्रक्रियेवर परिणाम करणारे घटक :-**

निर्णय प्रक्रिया ही अतिशय महत्वाची व गुंतागुतीची आहे आणि ही प्रक्रिया मानसिक आहे. त्यामुळे त्यावर अनेक घटकाचा परिणाम झालेला दिसून येतो ते पुढील प्रमाणे –

१) पैसा

२) शिक्षण

३) वय

४) व्यवसाय

५) कौटुंबिक स्थिती

६) फॅशन

७) जाहीरात

८) आशावादी दृष्टीकोण

९) सामाजिक परिस्थिती

१०) कौटुंबिक जिवनचक्र

या सर्व घटकांचा कमी अधिक प्रमाणात निर्णय प्रक्रियेत परिणाम होत असतो. निर्णय प्रक्रिया हि जिवनातील आवश्यक अत्यंत महत्वाची बाब आहे. आणि असा एकही व्यक्ती मिळणार नाही की, त्या व्यक्तीने आपल्या जिवनात एकही निर्णय घेतला नसेल प्रत्येक आपल्या जिवनात निर्णय घ्यावे लागतात व आपण घेतलेल्या निर्णयाचा परिणाम आपल्या आयुष्यावर होत असतो.

# प्रकरण चार
# कलेचे मूलघटक आणि कलेची तत्त्वे, रंगयोजना

**प्रस्तावना :**

निसर्ग आणि मनुष्य यांचा खूप जवळचा संबंध आहे. पावसाची पहिली सर, वातावरणातला गारवा, मातीचा सुगंध तसेच उन्हाळ्यात खुलणारा पळस आणि गुलमोहर पाहायला की मन होते. आनंद वाटतो. या सृष्टीसौंदर्यात मन हरवून जाते आणि मनातून अलगत तरंग पसरतात. प्रत्येक व्यक्तीची अनुभूती वेगवेगळी घेते. म्हणूनच कला आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक मानली गेली आहे.

सुंदर वस्तू पाहिली की, श्रमपरिहार होतो म्हणून मानवी जीवनात कलेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोणतीही वस्तू असो, ती व्यक्तीचे एक अस्तित्व निर्माण करते. वस्तूची बनावट, आकार, रंग या बाबी त्यात गृहीत धरल्या जातात. घरातील रोजच्या साध्या गोष्टीतसुद्धा सौंदर्य वाढविण्यासाठी कलेचा उपयोग होतो. कला ही आपल्या जीवनाचा आणि व्यक्तिमत्वाचा भाग झाली आहे. प्रत्येक कलात्मक कृतिमुळे जीवनात आनंद निर्माण केला जातो.

कलात्मक वस्तूंची उत्पत्ती करण्यासाठी माणसात सौंदर्यदृष्टी असण्याची आवश्यकता असते. एकाच प्रकारच्या वस्तूपासून वेगवेगळ्या प्रकारांनी सौंदर्य वाढविले जाते. परंतु ते त्या व्यक्तीच्या सौंदर्यदृष्टीवर अवलंबून असते. कोणत्याही गोष्टीतील सौंदर्य सहजपणे वाढविता येते, उदा.वेगवेगळ्या प्रकारच्या फुलांचा गुच्छ तयार करून तो जर एखाद्या पुष्पपात्रात नुसताच खोचून दिला तर तो इतका चांगला दिसणार नाही. परंतु कलेच्या तत्त्वाचा उपयोग करून त्यामध्ये एकप्रकारची लय, रंग संगती, संतुलन साधल्यास ती मांडणी जास्त आकर्षक होऊ शकेल. अशारितीने कलेच्या मदतीने कोणत्याही कृतीचे सौंदर्य वाढविले जाऊन ती आकर्षक दिसते व त्यापासून मनाला आनंद मिळतो.

आजकालच्या धावपळीच्या गतिशील जीवनात कलेला त्याचप्रमाणे गृहसजावटीला जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे. मनुष्य बाहेरून थकून आल्यानंतर, घर सुव्यवस्थित व सुंदर सजविलेले असल्यास, घरात प्रवेश केल्याबरोबर दिवसभराचा थकवा जाऊन मन प्रसन्न होते. समाजात मनुष्याला नकारात्मक परिस्थितीचा सामना करावा लागतो; त्यामुळे मन उदास होते. तेव्हा कला कौशल्याने सजविलेल्या घरात आल्यावर मनःशांती व समाधान प्राप्त होते. कला म्हणजे वस्तू सुशोभित करण्यास मदत करण्याचे साधन असून त्यापासून आनंद, मनःशांती समाधान व मनुष्याचा उत्साह वाढतो.

काही व्यक्तींमध्ये उत्तम अभिरूची व सुंदर आणि योग्य वस्तूंची पारख करण्याचे कौशल्य जन्मजात असते. त्यामुळे त्या व्यक्ती नकळत कलेच्या मुळघटकांचा उपयोग कलेच्या तत्त्वांप्रमाणे किंवा सिद्धांन्ताप्रमाणे करून वस्तूत सौंदर्य निर्माण करतात. परंतु ही अभिरूची किंवा वस्तूंची पारख करण्याचे कौशल्य अभ्यासाने व निरीक्षणाने वाढू शकते. त्याचप्रमाणे व्यकतीतील सौंदर्यदृष्टीसुद्धा अभ्यासाने जोपासली जाते व तिला योग्य वळण मिळू शकते.

गृहिणीला घरासाठी, कुटुंबातील व्यक्तींसाठी विविध प्रकारच्या वस्तूंची निवड करावी लागते. गृहिणीची अभिरूची उत्तम असल्यास वस्तूंची योग्य निवड होऊन सौंदर्यात भर पडू शकेल. उत्तम अभिरूची म्हणजे सौंदर्य व उपयोगिता यांचा मिलाप होय. तो देखील पैसा, समय व शक्ती यासारख्या साधनसंपत्तीच्या कमीतकमी खर्चात होणे आवश्यक असते. अशावेळी त्याला उत्तम अभिरूची व वस्तूंची पारख करण्याचे कौशल्य असे म्हणता येईल. उदा. मौल्यवान फर्निचरची मांडणी मोठ्या जागेत करण्यापेक्षा लहान जागेत कमी किंमतीच्या फर्निचरची योग्य मांडणी करून त्याची उपयोगिता वाढविण्यासाठी जास्त विचाराची, उत्तम अभिखरूचीची व कौशल्याची आवश्यकता असते.

मौल्यवान वस्तू बऱ्याचवेळा सुंदर असतात. परंतु त्यांची मांडणी व त्यांच्या बरोबर मांडलेल्या दुसऱ्या वस्तुंची निवड योग्य प्रकारे केली तरच त्यांचे सौंदर्य उठून दिसते. उदा.,

सजावट करताना सर्व सुंदर वस्तू एकाच बाजूला मांडल्या व सर्वसाधारण वस्तू दुसऱ्या बालूला मांडल्या तर एकाही सुंदर वस्तूचे सौंदर्य उठावदार दिसणार नाही. परंतु त्या ऐवजी काही सुंदर वस्तू साध्या वस्तूंबरोबर ठेवल्यास त्यांचे सौंदर्य अधिक उठून दिसेल; त्याचबरोबर त्यात कृत्रिमतेचा भास होणार नाही. सुंदर व मौल्यवान वस्तू कंमी प्रमाणात असूनसुद्धा मांडणीचे सौंदर्य वाढू शकेल.

**परिभाषा :**

१) **त्रिवेणी फरकाडे आणि सुलभा गोंगे यांच्या** मते, "ज्या सजावटीतून उद्दिष्टपूर्ती, सौंदर्यभिव्यक्ती आणि आनंदनिर्मितीचा अनुभव येतो त्याला कला म्हणतात."

२) **डॉ. लीना कांडलकर** यांच्या मते, मनुष्याच्या सुप्त इच्छांची पूर्ती करणारे, जीवनाकरीता आवश्यक असलेल्या अर्थार्जनास मदत करणारे व आनंद प्राप्तीचे साधन असून फावल्या वेळेचा सदुपयोग म्हणजे कला होय.

गृहिणीला सजावट करताना साधेपणा, उपयोगिता, मितव्ययता व त्याचबरोबर सौंदर्य कसे वाढविता येईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कलेच्या मूलघटकांचा कलेच्या तत्त्वाप्रमाणे उपयोग केल्यास हे सर्व साध्य होऊ शकते. या प्रकरणात कलेच्या मूलघटकांचा व मूलतत्त्वांचा अभ्यास करू.

कलेची तत्त्वे समजून घेण्यापूर्वी कलेच्या मूलघटकांचा विचार करणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही शोभिवंत वस्तूंमध्ये किंवा दृष्यामध्ये कलेचे मूलघटक कलेच्या तत्त्वाप्रमाणे उपयोगात आणलेले असतात. वस्तूचे किंवा मांडणीचे सौंदर्य वाढविण्यासाठी यांची आवश्यकता असते. कारण प्रत्येक दृश्य कलांमध्ये कलेचे मूलघटक असतात. परंतु त्यांचा योग्य उपयोग करून सौंदर्य वाढविण्यासाठी कलेच्या तत्त्वांची मदत घ्यावी लागते.

## कलेचे मूलघटक

१. रेषा (Line) ५. प्रकाश (Light)

२. आकार (Form) ६. अवकाश (Space)

३. पोत (Texture) ७. आकृतीबंध (Pattern)

४. रंग (Colour)

सर्व दृश्य कलांमध्ये मूलभूत समजले जाणारे मूलघटक म्हणजे रेषा (Line), आकार (Form), रंग (Colour) आणि पोत (Texture) हे होत. गृहयोजना किंवा गृहसजावटीमध्ये आकृतिबंध (Pattern), अवकाश (Space) आणि प्रकाश (Light) या तीन मूलघटकांचा देखील समावेश केला जातो. बऱ्याच वेळा कल्पना (Idea) मूलघटक मानली जाते. कारण सजावट करताना एखादी कल्पना डोळ्यासमोर ठेवून त्या सजावटीमध्ये त्या प्रकारचा परिणाम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. आकृतिबंध हा मूलघटक इतर घटकांएवढा लक्षात येत नाही. परंतु घराच्या आतील सजावटीमध्ये याचा उपयोग महत्त्वपूर्ण असतो. पूर्वी प्रकाश आणि अवकाश कलेचे मूलघटक म्हणून मानले जात नव्हते. परंतु आजकाल घराच्या आयोजनात त्या दोहोंचाही विचार केलेला आढळतो.

कोणत्याही सजावटींमध्ये प्रत्येक मूलघटक आपली मर्यादा व वेगळेपणा स्पष्टपणे दर्शवितो. मूलघटकांची मर्यादा व वेगळेपणा, सजावट करणारी व्यक्ती सजावट करीत असतांना, वेगवेगळ्या मूलघटकांवर लक्ष केन्द्रीत करून दाखवू शकते. परंतु सजावटीमधील प्रत्येक मूलघटकाच्या परिणामाचा विचार इतर मूलघटकांबरोबर तसेच सजावटीतील वेगवेगळ्या भागांबरोबर केला जातो. वास्तूशास्त्र, रंगकला किंवा सजावटीमध्ये मूळ कल्पना साकार करण्याकरिता साधन म्हणून मूलघटकांचा उपयोग केला जातो. मूलघटकांचा उपयोग मूलतत्त्वाच्या मदतीने केला तरीदेखील त्यातून सौंदर्य निर्माण होईलच असे नसले तरी सर्वसाधारण सौंदर्यप्राप्तीचे लक्ष्य साध्य करण्याकरिता त्याचे

अमूल्य सहाय्य होते. सजावट करीत असताना वेगवेगळ्या मूलघटकांचा उपयोग कलेच्या तत्त्वानुरूप केल्याने सौंदर्य, अर्थपूर्णता आणि उपयोगिता ही लक्ष्ये साध्य केली जातात. आता आपण वेगवेगळ्या मूलघटकांचा स्वतंत्रपणे खालीलप्रमाणे विचार करता येईल.


**(१) रेषा :** रेषा हा आधुनिक सजावटीतील महत्त्वपूर्ण घटक आहे. रेषा एकत्र येऊन विविध आकार तयार करता येतात. फर्निचरची कमान, काठ, उभाट दारे, खिडक्यांच्या रूंद रेषा या सर्व बाबींमुळे विशिष्ट परिणाम निर्माण करता येतो. गृहसजावट आणि गृहआयोजनात रेषा हा महत्त्वाचा मूलघटक समजला जातो. कारण रेषा आपल्या मनावर परिणामकारक ठरतात. वेगवेगळ्या रेषा निरनिराळ्या कल्पना व परिणाम दर्शवितात. त्यांचा प्रकार, दिशा आणि गुण ह्यावर कल्पना व परिणाम अवलंबून असतात. उभ्या (Vertical), आडव्या (Horizontal), तिरप्या (Diagonal) व वक्राकार (Curved) इत्यादी वेगवेगळ्या प्रकारच्या रेषा असतात. मनुष्याने या रेषांचा आपल्या वेगवेगळ्या अवस्थांशी संबंध जोडल्यामुळे त्या वेगवेगळे अर्थ दर्शवितात. उदा, जेव्हा तो आडवा होतो तेव्हा तो विश्रांती घेत असतो किंवा झोपलेला असते. म्हणून आडव्या रेषा विश्रांती किंवा स्थिरता दर्शवितात. परंतु तो जेव्हा उभा असतो तेव्हा तो क्रिया करण्याच्या तयारीत असतो म्हणून उभ्या रेषा सजीवता, क्रियाशीलता व चैतन्य दर्शवितात. धावणे, चालणे, ओढणे इत्यादी क्रिया करीत असताना मनुष्य हालचाल करीत असतो व जोर किंवा गतीशीलता दर्शवित असतो. म्हणून तिरप्या रेषा तेच दर्शवितात. खेळताना शरीर वक्राकार होते म्हणून वक्राकार रेषा लवचिकता, डौलदारपणा आणि आनंद दर्शवितात.

गृहसजावटीत रेषा फार उपयुक्त ठरतात. कारण घरात किंवा खोलीच्या रचनेत त्या स्पष्टपणे दुगोचर होतात. उदा. दारे, खिडक्या, खोल्यांचे कोपरे, फर्निचरचे काठ, इत्यादी. वेगवेगळ्या रेषांमुळे वेगवेगळे आभास निर्माण करता येतात. उभ्या रेषांमुळे त्या वस्तूची किंवा भिंतीची उंची वाढल्यासारखी दिसते. त्यामुळे वस्तू उंच व अरुंद वाटतात. अशा वस्तू प्रतिष्ठा व औपचार्किता दर्शवितात. या रेषा मनाला उत्साहवर्धक वाटतात.

आडव्या रेषा साधारणपणे लांब व कमी उंचीच्या वस्तूंशी साधर्म्य दर्शवितात. उदा., पलंग, तक्तपोस, सोफा,जेवणाचे टेबल इत्यादी. त्या विश्रांती किंवा आराम सुचवितात. ह्या प्रकारच्या रेषांमुळे वस्तू किंवा जागा लांब, कमी उंचीच्या आणि अनौपचारिक वाटतात.

तिरप्या रेषा जोर दर्शवितात. जेव्हा तिरपेपणाचे योग्य: संघटन करून त्यात संतुलन साधलेले असते तेव्हा त्या बऱ्याच परिणामकारक असतात. पण जर का त्याचे संघटन योग्य झाले नाही तर त्या सजावटीत गोंधळ किंवा घोटाळा सुचवितात. सजावटीत उभ्या रेषांबरोबर आडव्या व तिरप्या रेषा असणे आवश्यक असते.

सारख्या आकाराच्या वक्राकार रेषांच्या पुनरावृत्तीमुळे सजावटीत अनौपचारिकता येते. परंतु अनियमित वक्राकार रेषांच्या पुनरावृत्तीमुळे आनंदीपणा, विलास आणि निष्काळजीपणा सुचविला जातो. सर्वसाधारणपणे आडव्या, उभ्या किंवा तिरप्या रेषांसारख्या सरळ रेषा जास्त कणखर आणि शक्तिशाली वाटतात तर वक्राकार रेषा सजावटीत डौलदारपणा आणतात आणि उठून दिसतात.



**उभ्या रेषा (Vertical)** **तिरप्या रेषा (Diagonal)** **आडव्या रेषा (Horizontal)** **वक्राकार रेषा (Curved)**

रेषांची लांबी, रुंदी किंवा दिशा यामध्ये फरक केल्यास वेगवेगळा परिणाम होऊ शकतो. उदा. कमी उंचीच्या खोलीच्या. भिंतीवर उभ्या रेषांचा उपयोग केल्यास खोलीची

उंची वाढल्याचा भास होतो. म्हणून गृहसजावटीमध्ये खोलीची उंची, रुंदी, लांबी, फर्निचरचा आकार, दारे-खिडक्यांचा आकार, पडद्यांचे डिझाईन इत्यादी गोष्टीचा रेषांच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक असते.

**(२) आकार** (Form) : अनेक रेषा मिळून आकाराची निर्मिती होते. गृहसजावटीत आकाराचा विचार करताना सजावटीतील द्विमितीय (Two Dimentional- लांबी आणि रुंदी) किंवा त्रिमितीय (Thre-dientional- लांबी, रुंदी, खोली) आकृतीसाठी किंवा जागेसाठी विचार केला जातो. गृहआयोजनात आकाराला फार महत्त्व आहे. कोणत्याही वस्तूच्या किंवा जागेच्या आकाराच्या सौदर्याशिवाय त्याचा रंग, पोत, सजावट यांच्या सौंदर्याला फारसे महत्त्व येत नाही.

चांगल्या व योग्य आकाराच्या मुख्यत: दोन आवश्यकता असतात. त्या म्हणजे वस्तूचा आकार नेहमी वस्तूच्या कार्यानुरूप असावा. ज्यासाठी त्या वस्तूचा उपयोग करावयाचा असेल ते कार्य योग्यरितीने त्या वस्तूकडून केले गेले पाहिजे. उदा., एखाद्या खुर्चीचा आकार, सजावट इत्यादी खूप सुंदर असेल पण ती खुर्ची बसण्यास आरामदायक नसेल तर त्या खुर्चीच्या आकारात कलेचा अभाव दिसून येतो. गृहसजावटीत आकाराच्या प्रभावाने सजावटीत संयोजन किंवा एकीकरण दिसून येते. अशा वेळी सजावटीच्या अन्य सहाय्यक वस्तूंचा आकार्सुद्धा त्याच प्रकारचा असणे महत्त्वाचे असते.

**(३) पोत** (Texture) : पोत म्हणजे केवळ स्पर्श ज्ञानाने होणारे नसते. या शब्दाचा वापर प्रामुख्याने कपड्यासाठी केला जात होता परंतु आजच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे वस्तुलाही पोत असते तसेच माणसाला देखील चेहऱ्याचे पोत सुधारण्यासाठी प्रयत्न करावे लागतात हे दिसून आले आहे. आजकाल प्रत्येक वस्तूच्या पृष्ठभागाचा स्पर्शमूलक गुणधर्म पारखण्यासाठी पोत हा शब्द वापरला जातो. परंतु बऱ्याच वेळा पोत डोळ्याने पाहूनच समजतो, त्याला (Visual Texture) दृक्पोत म्हणतात.

वस्तूचे पोत निरनिराळे असतात. उदा., गुळगुळीत, खरखरीत, वाळूसारखा, छिंद्र्युक्त, मखमली इत्यादी.

प्रथम वस्तूचा पोत समजण्यासाठी स्पर्श करण्याची आवश्यकता असते. परंतु अनुभवाने फक्त डोळ्यांनी पाहून देखील वस्तूचा पोत समजतो.

वस्तूला, घराच्या आतील व बाहेरील भागाला, रंगकामाला एक विशिष्ट गुण व सौंदर्य प्रदान करण्यासाठी पोत ह्या कलेच्या मूलघटकाचा उपयोग करतात. प्रथम या मूलघटकाकडे बरेच दुर्लक्ष करण्यात येत होते. परंतु आजकाल पोतात फरक करून वेगवेगळे परिणाम दाखविलेले आढळून आल्याने त्याबद्दलची आवड निर्माण झाली आहे. जवळजवळ सर्व दृश्य कलांमध्ये वेगवेगळया पोतांचा उपयोग केलेला दिसून येतो.

रंगकला, मूर्तीकाम, स्थापत्यशास्त्र या सर्व ठिकाणी वेगवेगळ्या पोताचा उपयोग दिसून येतो. पोत बरेचदा खूप गुळगुळीत असतो तर बरेचदा खडबडीत असतो. गृहसजावटीत देखील पोताला महत्त्व प्राप्त झालेले आहे. सजावटीसाठी वापरण्यात येणाऱ्या वेगवेगळया वस्तूंच्या पोतामुळे वेगवेगळे परिणाम निर्माण करता येतात व सजावट करता येते. उदा., भिंतीचे पोत गुळगुळीत ठेवून त्यावर थोड्या भागात खडबडीतपणा आणून वेगळी सजावट करता येते. तसेच फर्निचरसाठी वापरलेले लाकूड, गालिचा, पडदे इत्यादीमधून वेगवेगळे पोत उपयोगात आणून सजावटीत विविधता व नाविन्य आणता येते. खरखरीत पृष्ठभाग गुळगुळीत पृष्ठभागापेक्षा प्रकाश जास्त शोषून घेतो. खरखरीत भागावरून प्रकाश परावर्तीत होत नाही. त्यामुळे खरखरीत पृष्ठभाग असलेल्या वस्तू जास्त मोठ्या दिसतात. त्यामुळे वस्तूंच्या पोताचा विचार घरातील, बाहेरच्या व आतील सजावटीत करणे अत्यंत आवश्यक असते. आजकाल प्लास्टिक, लाकूड, धातू, चामडे आणि कापड यापासून विविध पोताच्या वस्तूंचे उत्पादन जास्त प्रमाणात होत आहे.

**(४) रंग** (Colour) : रंग हा कलेचा अविभाज्य घटक आहे म्हणून निसर्ग हा रंगाच्या बाबतीत माहिती देणारा खरा शिक्षक आहे. रंगाबद्दलचे आकर्षण व रंगाची जाणीव

लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना असते. त्यांच्या योग्य उपयोगाने आनंदी वातावरण निर्माण करू शकतो.

रंगाचा अभ्यास वेगवेगळ्या दृष्टीकोनातून वेगवेगळ्या पद्धतीने केला जातो व त्यामुळे रंगाच्या वेगवेगळ्या गुणधर्मांचे ज्ञान प्राप्त झाले आहे. शरीरविज्ञान, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, मानसशास्त्र व गृहशास्त्रासाठी गृहसजावटीच्या दृष्टीकोनातून रंगाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. रंगाचे गुणधर्म व घरातील रंगयोजना यांना गृहसजावटीत महत्त्वाचे स्थान आहे. ह्याबद्दल पुढील प्रकरणात आपण स्वतंत्रपणे विचार करणार आहोत.

**(५) प्रकाश** (Light) : प्रकाश हे रंगाचे उगमस्थान आहे. प्रकाशामुळे रंगाची ओळख होते. आधुनिक गृहसजावटीमध्ये प्रकाशयोजनेला महत्त्वाचे स्थान आहे. कलेच्या मूलघटकांच्या दृष्टीकोनातून प्रकाशाचा विचार नव्यानेच करण्यास सुरुवात झाली आहे. प्रथम याचा केवळ उपयोगच अधिक महत्त्वाचा वाटत असल्याने याचा विचार उपयुक्ततावादी मूलघटक म्हणून करण्यात येत असे.घराच्या सजावटीवर दिवसाच्या प्रकाशाचा त्याचप्रमाणे कृत्रिम प्रकाशाचा बराच परिणाम होतो. स्वच्छ सूर्यप्रकाश व योग्य कृत्रिम प्रकाश घराच्या सजावटीत भर टाकतो. प्रकाशामुळे उत्साह वाढतो तर अंधारामुळे खिन्न व उदास वाटते. ह्या बिपरित अतिशय प्रखर प्रकाशामुळे डोळयांवर ताण पडतो व त्रास होतो. यासाठी प्रकाशयोजना योग्यप्रकारे करणे आवश्यक ठरते.

घराच्या सजावटीत सूर्यप्रकाश अतिशय महत्त्वाचा समजला जातो. त्याच्या अभावी घरातील रंग व सजावटीवर परिणाम होतो. म्हणून सजावट करण्याआधी घराची दिशा, दारे-खिडक्यांचा आकारं व प्रमाण तसेच त्यातून येणाऱ्या प्रकाशाचे प्रमाण, बाहेरील झाडे किंवा घरासमोरील मोठी इमारत आणि ऋतु याचा विचार करावा लागतो. आजकाल काचेच्या भिंती किंवा मोठ्या खिडक्यांमुळे आवश्यक तेवढा प्रकाश मिळविता येतो आणि त्यावर सरकणारे पडदे लावून प्रकाशाचे आवश्यकतेनुसार नियंत्रण करता येते.

**(६) अवकाश** (Space) : दोन सजावटीचे समूहातील मोकळी जागा म्हणजे अवकाश होय. अवकाशामुळे सजावटीला आकार देता येतो. गृहसजावट व गृहआयोजन करीत असताना अवकाशाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. मोकळ्या जागेचे (अवकाश) महत्त्व प्रथमपासूनच अधिक आहे परंतु कलेचा मूलघटक म्हणून याचे महत्त्व आजकाल अधिक पटत चालले आहे. अवकाशामुळे गृहसजावटीत सौंदर्य तर वाढतेच परंतु त्याची उपयोगितादेखील वाढते. अवकाशामुळे सजावटीचे सौंदर्य वाढविण्यासाठी दोन सजविलेल्या समूहाने जोडणारी सुशोभित न केलेली भिंत किंवा जागा असावी लागते. यासाठी कमी प्रमाणात फर्निचर वापरून किंवा फर्निचरचे लहान-लहान समूह करून मध्यभागी मोकळी जागा ठेवण्यात येते. काम करताना सोयीस्कर होईल तसेच येता जाताना जास्त अडथळे होणार नाहीत अशातऱ्हेने जागा मोकळी ठेवण्याची पद्धत आजकाल दिसून येते. खोल्यांना मोठे दरवाजे करून घरात अखंड मोकळी जागा ठेवली जाते.

**(७) आकृतिबंध** (Pattern) : आकृतीबंधामध्ये गृहसजावटीत सजीवता आणि नाविण्य तसेच चैतन्य निर्माण करता येते. गृहसजावटीत कोणत्याही वस्तूचा बाह्य पृष्ठभाग सुशोभित करण्यासाठी आकृतिबंधाचा उपयोग केला जातो. याचा उपयोग द्विमितीत तसेच त्रिमितीय वस्तूंचा पृष्ठभाग सुशोभित करण्यासाठी केला जातो. सजावटीत सर्व पृष्ठभाग कोणत्याही डिझाईन नसलेल्या साध्या रंगाचे असतील तर सजावट रक्ष वाटेल, त्यात जिवंतपणा वाटणार नाही. परंतु थोड्या पृष्ठभागावर काही डिझाईन असेल तर तो पृष्ठभाग उठून दिसेल. सजावटीत विविधता व सजीवता येईल. आकृतीबंधाचा उपयोग सजावटीत योग्य प्रमाणात असणे आवश्यक असते. आकृतिबंधाचा उपयोग केला नसेल तर रुक्षता निर्माण होईल, तसेच त्याचा आवश्यकतेपेक्षा अधिक प्रमाणात उपयोग केल्यास बेचैनी (Restlessness) व क्षुब्धता (Excitement) निर्माण होईल उदा, सजावटीमध्ये पडदे, गालिचा, फर्निचरवरील कापड, भिंती या सर्व ठिकाणी आकृतिबंधाचा उपयोग न केल्यास जिवंतपणा व विविधता येणार नाही. तसेच सर्व ठिकाणी आकृतीबंधाचा उपयोग केला तर ते डोळ्याला भगभगीत वाटेल, शांत वाटणार नाही.

सजावट करीत असताना कमीतकमी एक -चवतुर्थांश भागात आकृतिबंधाचा उपयोग केलेला असावा. भिंत व गालिचा प्लेन असेल तर पडदे व दोन-तृतियांश फर्निचरची आच्छादने आकृतिबंधाची असावी. मोठ्या खालीत यापेक्षा जास्त प्रमाणात आकृतिबंधाचा उपयोग केल्यास हरकत नाही, परंतु लहान खोल्यांमध्ये त्याचे प्रमाण कमी असावे.

आकृतिबंधाची निवड महत्त्वाची असते. आकृतिबंध नेहमी सभोवतालच्या पार्श्वभूमीशी सुसंगत असावे. त्यात उपयोगात आणलेले रंग खोलीतील रंगसंगतीशी जुळणारे असावेत. बरेचदा अतिशय मोठ्या गुंतागुंतीच्या आकृतिबंधाचा उपयोग केलेला असतो, परंतु ते इतर पार्श्वभूमीशी सुसंगत न झाल्याने शोभून दिसत नाहीत.

### आकृतिबंधाची निवड करताना खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

१) लहान, नाजुक आकृतिबंधाचे वेगवेगळे भाग असावेत व त्यांची मांडणी योग्य अंतर सोडून असावी.

२) त्यात आकृतिबंधाची पुनरावृत्ती झालेली असावी.

३) आकृतिबंध सुस्पष्ट असावे.

४) आनंददायक आकृतिबंधाचा उपयोग केलेला असावा.

५) आकृतिबंधातील रंग, रेषा व त्याची पार्श्वभूमी ह्यात अनुरूपता असावी.

या सर्व गोष्टी लक्षात ठेवल्यास योग्य प्रकारच्या आकृतिबंधाची निवड. केली जाऊन त्याचा सजावटीत योग्य परिणाम झालेला दिसून येतो.

## ४.२ अंतर्गत सजावटीत कलेच्या तत्त्वांचा वापर, महत्त्व व व्याख्या

कला ही आनंद प्राप्तीसाठी असते. गृहसजावट हे जसे शास्त्र आहे तसेच ती कला देखील आहे. कलेच्या मूलघटकांबद्दल माहिती बघितल्यानंतर कलेची तत्त्वे समजून घेणे योग्य होईल. कारण सजावटीमध्ये कलेच्या मूलघटकांची कलेच्या तत्त्वांच्या नियमानुसार मांडणी केल्यास सजावट चांगली होते. कोणत्याही दृश्य कलांमध्ये योग्य परिणामासाठी कलेचे मूलघटक कलेच्या तत्त्वांच्या नियमानुसार बसविलेले असतात. ही तत्त्वे सौंदर्य निर्माण करणारे घटक नसून ते फक्त वस्तू किंवा सजावट, कलेच्या दृष्टिकोनातून चांगली किंवा वाईट का आहे हे: ठरविण्यास मदत करतात. यांच्या अभ्यासामुळे अभिरूचीचा दर्जा सुधारला जाऊन मन सौंदर्याबद्दल जास्त संवेदनक्षम होते.

प्रमाण (Proportion), संतुलन (Balance), संगती किंवा अनुरूपता (Harmony), लय (Rhythm), प्राधान्य (Emphasis) ही कलेची मुख्य तत्त्वे होत.

**कलेची तत्त्वे खालीलप्रकारे आहेत.**

१) संगती किंवा अनुरूपता (Harmony)

२) परिमाण/माप (Scale & Proportion)

३) संतुलन /समतोल (Balance)

४) लय (Rhythm)

५) प्राधान्य (Emphasis)

**(१) संगती किंवा अनुरूपता (Harmony) -**


संगती हे कलेचे महत्त्वाचे तत्त्व आहे. विचारात संगती असेल तर कलाकृतीत अनुरूपतेचा प्रभाव दिसून येतो.

**त्रिवेणी फरकाडे आणि सुलभा गोंगे** यांच्या मते, “संगती हे कलेचे असे तत्त्व आहे त्याच्या माध्यमातूनकलेच्या मूल घटकांमध्ये अनुरूपता निर्माण करण्यास प्राप्त संसाधनांचा वापर करण्यास कलाकृतीमध्ये एकसंघ परिणाम निर्माण करण्यास मार्गदर्शकाची भूमिका वठवते.

सजावटीत रंग, रेषा, आकार, पोत हे मूलघटक पूर्णपणे एकत्र मिसळले जाऊन त्यात एकात्मता आणतात व प्रत्येक घटक एकाच कल्पनेत सहभागी होतो, तेव्हा त्या सजावटीत संगती आहे असे म्हणता येईल. कोणत्याही कार्याचा सौंदर्य व उपयोगिता या दृष्टिकोनातून विचार करावयाचा झाल्यास त्यात संगती असणे आवश्यक असते. संगती हे एक असे तत्त्व आहे की जे सुसंगत वस्तूंची आणि कल्पनांची निवड आणि मांडणी करून सजावटीत एकता निर्माण करते. जेव्हा एका सजावटीतील सर्व वस्तू एकप्रकारचे कौटुंबिक सादृश्य दाखवितात तेव्हा त्या सजावटीतील वस्तूची निवड ही संगतीला धरून आहे हे दाखविते. संगती असलेल्या वस्तूंची मांडणी सजावटीत केली जाते तेव्हा त्या सजावटीत निवड व मांडणी दोन्हीत संगती साधलेली दिसून येते. संगतीबरोबर थोड्या प्रमाणात विरोध असल्यास सजावटीचे सौंदर्य वाढविण्यास मदत होते, परंतु संगतीच्या दृष्टिकोनातून त्याचे प्रमाण अतिशय कमी असावे. हा विरोध सजावटीतील लहानलहान गोष्टीत असावा व सर्व मोठ्या वस्तू संगतीला धरून असाव्यात. कोणत्याही दृश्य कलांमध्ये संगतीचा विचार पाच दृष्टिकोनातून केला जातो.

(१) रेषा, (२) आकार, (३) पोत, (४) कल्पना, (५) रंग.

**रेषा व संगती :** कोणत्याही सजावटीत रेषांना बरेच महत्त्व असते कारण त्यातील रेषा स्पष्टपणे उठून दिसतात. सजावटीत सुसंगती येण्याकरिता सारख्या प्रकारच्या रेषा असणे आवश्यक असते. सर्वसाधारणपणे रेषांचे तीन प्रकार केलेले आहेत. जेव्हा रेषा समांतर असतात किंवा एकाच दिशेने पुन्हा पुन्हा काढलेल्या असतात तेव्हा त्यांना पुनरावृत्ती रेषा असे म्हणतात. (आकृती अ)




काही वेळा आडव्या व उभ्या रेषा काटकोनात एकत्र येऊन वेगळेच विरोधी आकार तयार होतात. ह्या रेषा संगतीच्या विरुद्ध असतात व जेव्हा विरोधाभासाची आवशकता असते तेव्हा अशाप्रकारच्या रेषांचा उपयोग करतात. (आकृती ब)

तिसऱ्या प्रकारच्या रेषा म्हणजे संक्रमण रेषा होत. या अधिक डौलदार व सौम्य असून विरोध कमी करण्यास मदत करतात. त्यामुळे नजर एका रेषेवरून किंवा आकारावरून सहजपणे दुसऱ्या रेषेवर किंवा आकारावर फिरते. विसंगत भाग जोडून त्यात संगती आणण्याची शक्ती या रेषात असते. (आकृती क)

अशारीतीने या तीन प्रकारच्या रेषांमुळे वेगवेगळे परिणाम दाखविता येतात. ह्या रेषांच्या उपयोगामुळे सजावटीत संगती असूनसुद्धा विविधता निर्माण करता येते. गृहसजावटीत याप्रकारच्या रेषांचा उपयोग बऱ्याच ठिकाणी करता येतो. उदा. फर्निचरची मांडणी, त्यावरील कापड, पडदे लावण्याची पद्धत, पुष्परचना इत्यादी.

व्यवहारात देखील या तत्त्वाचा उपयोग करून निवड करता येते. उदा., कपड्यांची वा कापडाची निवड, केशरचना, दागिन्यांची पद्धत, इत्यादीत शरीराच्या ठेवणीनुसार निवड करून सुसंगती आणता येते.

**आकार व संगती :** सजावटीत ज्याठिकाणी वेगवेगळे आकार उपयोगात आणलेले असतात त्याठिकाणी एकप्रकारच्या संघटनात्मक परिणामाची आवश्यकता असते. मांडणीत सुव्यवस्था हवी असल्यास आकारात संगती असणे अत्यंत आवश्यक असते. यासाठी मोठे फर्निचर खोलीच्या आकाराप्रमाणे लावून फक्त लहान खुर्च्या किंवा टेबल त्यापेक्षा वेगळ्या रीतीने मांडावे. विरोध किंवा विविधता आणण्यासाठी थोडेसे फर्निचर वेगळ्याच कोनात बसवावे. पण ह्याचे प्रमाण अतिशय थोडे असावे, कारण जास्त असल्यास चित्तवेधक विविधतेपेक्षा घोटाळा किंवा गोंधळच जास्त वाटेल.

**पोत व संगती :** पोत दोन प्रकारचे असतात. दृश्यजन्य आणि स्पर्शजन्य. खडबडीत, गुळगुळीत दोन्ही प्रकारचे पोत वापरून संगती साधणे सोपे जाते. आधुनिक काळात जीवनपद्धती बदललेली आहे.

**कल्पना व संगती :** विचार कल्पनेच्या जोरावर योग्य निर्णय निवडावा लागतो. हा प्रभाव गृहसजावटीवर देखील दिसून येतो. सजावट करताना फक्त आकार, रेषा, रंग, पोत यात सुसंगती असून चालत नाही तर त्या सजावटीतील कल्पनेमध्येसुद्धा सुसंगती असणे आवश्यक असते. लहान आधुनिक बांधणीच्या घरात जुन्या प्रकारचे फर्निचर किंवा सजावट न होता गर्दी झाल्यासारखी वाटेल. तसेच आधुनिक घरामध्ये जास्त प्रमाणात सरळ रेषांचा उपयोग केलेला असतो तर जुन्या घरामध्ये वक्राकार रेषा जास्त प्रमाणात असतात. त्यामुळे विरोधाभासासाठी थोड्या प्रमाणात याचा उपयोग आधुनिक घरात चांगला दिसतो. परंतु जास्त प्रमाण झाल्यास विसंगती वाटून घोटाळा व गोंधळ वाटतो. जुन्याप्रकारचे मोठे फर्निचर औपचारिकता सुचविते व ते लहान आधुनिक अनौपचारिक घरापेक्षा मोठ्या औपचारिक घरातच सुसंगत वाटते. जास्त सुशोभित असलेल्या चांदीच्या व काचेच्या

सहाय्यक शोभेच्या वस्तू, मोठी झुंबरे इत्यादीसुद्धा आधुनिक घरात विसंगत दिसतात. कारण त्या वस्तू व घर यांच्या कल्पनेत विसंगती दिसून येते.

**रंग व संगती :** रंग हे सजावटीचे प्रमुख माध्यम आहे. उष्णगटातील आणि शीतगटातील रंगाचा वापर करून संगती साधता येते. वेगवेगळ्या रंगाचा उपयोग करून घरात सौंदर्य व विविधता आणता येते. परंतु कोणतेही रंग एकमेकांना उठून दिसत नाही किंवा सुसंगत वाटत नाहीत.

**(२) परिमाण/माप** (Scale and Proportion) –

सजावटीत प्रमाणबद्धतेला महत्त्व आहे. सजावटीतील वेगवेगळ्या भागांचा एकमेकांशी व पूर्ण सजावटीशी येणारा संबंध आकर्षक किंवा समाधानकारक असणे म्हणजे प्रमाणाचे पालन करणे होय. सजावटीतील रंग, पोत, रेषा, आकार, इत्यादी त्यातील प्रत्येक भागात किंवा वस्तूत प्रमाणशील असाव्यात. त्या सर्व वस्तू प्रमाणात असाव्यात उदां., फर्निचरमधील प्रत्येक वस्तू प्रमाणात असावी व फर्निचरचा संपूर्ण गट सजावटीत प्रमाणात असणे आवश्यक आहे. लहान खोलीत मोठ्या फर्निचरचा गट ठेवला तर तो त्या खोलीत प्रमाणशीर वाटणार नाही. गृहसजावटीत माप किंवा स्केल ह्याचा चार तऱ्हेने विचार करावा लागतो.

(१) वस्तूचे व ज्या खोलीत ती ठेवायची आहे तिचे माप.

(२) वस्तू व खोलीतील इतर वस्तूंचे प्रमाण.

(३) वस्तूच्या वेगवेगळ्या भागांचे परस्पर प्रमाण.

(४) संपूर्ण वस्तूचे प्रमाण.

ह्या चार गोष्टी लक्षात घेतल्याशिवाय गृहसजावटीत सुसंगती येत नाही. उदा., मोठे अवजड फर्निचर मध्यम आकाराच्या खोलीत ठेवल्याने गर्दी झाल्यासारखी वाटेल तसेच

लहान फर्निचरवर मोठ्या डिझाईनचे कापड शोभून दिसणार नाही किंवा अतिशय लहान टेबलवर खूप मोठी पुष्परचना विसंगत वाटेल.

खोलीच्या मानाने फर्निचर मोठे आढळल्यास थोड्या फर्निचरचा उपयोग करावा. त्याचप्रमाणे मोठ्या खोलीत लहान फर्निचर असल्यास सारख्या प्रकारच्या फर्निचरचे वेगवेगळे गट करून योग्य अंतराने ठेवावेत.

बऱ्याच वेळा खरखरीत पोताच्या वस्तू अवजड वाटतात व गुळगुळीत पोताच्या वस्तू आटोपशीर दिसतात. त्याचप्रमाणे घरासमोरील बगिच्यात झाडे लावताना झाडांना आकार व घराचा आकार यांचे माप लक्षात घ्यावे म्हणजे झाडांची वाढ झाल्यावर ती घरांबरोबर विसंगत दिसणार नाहीत.

अशारीतीने गृहसजावटीत अवकाश, रेषा व माप (Scale) यांचा विचार करून गृहासजावट प्रमाणबद्ध करता येणे शक्य आहे.

**(३) संतुलन किंवा समतोल (Balance) -**

संतुलन हे कलेच्या तत्त्वापैकी एक प्रमुख तत्त्व आहे. संतुलन साधण्याकरिता रंग, बनावट, नमुना, प्रकाश याची आवश्यकता असते.

**हॅरियट व गोल्डस्टिन** यांच्या मते, 'संतुलन म्हणजे आराम किंवा विश्राम होय. हा विश्रामाचा प्रभाव आकृती आणि रंगाला एका केंद्रबिंदूच्या चारही बाजूने एकत्रित करून प्राप्त केला जातो. ज्यामुळे केंद्राच्या प्रत्येक बाजूला समान आकर्षण निर्माण होते.

संतुलन हे तत्त्व समजण्यास अतिशय सोपे आहे. त्याचे प्रमुख तत्त्व म्हणजे सारख्या वजनाच्या वस्तू मध्यबिंदूपासून सारख्या अंतरावर असल्यास त्यात संतुलन साधले जाते. एक वस्तू दुसऱ्या वस्तूपेक्षा जड असल्यास जड वस्तूचे अंतर मध्यबिंदूपासून कमी करून हलक्या वस्तूचे अंतर मध्यबिंदूपासून जास्त ठेवले जाते. सजावटीत संतुलन साधण्यासाठी वस्तूचे वजन लक्षात न घेता ती वस्तू कितीप्रमाणात लक्ष वेधून घेते हे पहाणे आवश्यक

असते. उदा., दोन वस्तूंपैकी एकीचा रंग लाल व दुसरीचा ब्राऊन (Brown) असल्यास लाल रंगाची वस्तू अधिक लक्ष आकर्षित करते म्हणून ती वस्तू मध्यबिंदूच्या जवळ व ब्राऊन रंगाची वस्तू कमी लक्ष केंद्रित करेल म्हणून मध्यबिंदूपासून लांब ठेवल्यास दोन्ही बाजूला संतुलन साधले जाईल. संतुलन साधण्यासाठी जागेचा मध्यबिंदू महत्त्वाचा असतो. मध्यबिंदूच्या भोवती दुसऱ्या लक्ष वेधणाऱ्या वस्तूंचे समायोजन करावयाचे असते. वस्तू एकसारख्या असल्यास त्या मध्यबिंदूपासून सारख्याच अंतरावर ठेवाव्यात व कमी जास्त आकर्षित करणाऱ्या असल्यास मध्यबिंदूपासून वेगवेगळया अंतरावर ठेवाव्यात. यावरून हे स्पष्ट होते की संतुलनाचे दोन प्रकार असतात.

(१) औपचारिक (Formal) किंवा समान (Symmetrical)

(२) अनौपचारिक (Informal or Occult) किंवा असमान (Unsymmetrical)

**गोल संतुलन (Radial Balance) :**

यामध्ये मांडणीचा अर्धा भाग ही दुसऱ्या भागाची प्रतिकृती असते. यामध्ये केद्रबिंदूपासून गोल आकारात घटक दूर जातात. उदा. फुलांच्या पाकळ्या, सायकल चाकातील स्पोक, पुष्परचना किंवा डिझाईन्समध्ये अशा तऱ्हेचे संतुलन आढळते.

**अनौपचारिक किंवा समान संतुलन**

केंद्राच्या दोन्ही बाजूंना वजन, आकार नसलेल्या वस्तू वेगवेगळ्या अंतरावर ठेवल्या जातात त्याला अनौपचारिक संतुलन असे म्हणतात. यात जास्त लक्ष केंद्रित करणारी वस्तू केद्राजवळ तर कमी आकर्षित वस्तू केंद्रापासून दूर ठेवली जाते. समान संतुलन साधने सोपे असते. एकसारख्या प्रकारचे फर्निचर किंवा इतर वस्तूंचे समान संतुलन सहजपणे साधता येते. जेव्हा मांडणीच्या दोन्ही बाजूंना सारख्याच किंवा सारख्या प्रमाणात लक्ष आकर्षून घेणाऱ्या वस्तू ठेवून संतुलन साधलेले असते तेव्हा त्याला समान संतुलन

असे म्हणतात. यात दोन्ही बाजूच्या वस्तू सारख्याच महत्त्वपूर्ण असतात. निसर्गातील याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुष्याचे शरीर होय.

**औपचारिक किंवा असमान संतुलन**

जेव्हा दोन वस्तू सारख्याच प्रमाणात लक्ष आकर्षून घेत नाहीत आणि त्यांच्या आकर्षणाच्या प्रमाणात त्या वस्तू मध्यकेंद्रापासून कमी-जास्त अंतरावर ठेवून संतुलन साधले जाते तेव्हा त्याला असमान संतुलन म्हणतात. यात लहान-मोठ्या आकाराच्या वस्तू किंवा जास्त-कमी गर्द किंवा तेजस्वी रंगाच्या वस्तू किंवा सर्व दृष्टीने विरोधी असलेल्या वस्तू उपयोगात आणून संतुलन साधले जाते. हा विरोध रंग, आकार, रेषा, पोत, वजनं यामध्ये दाखवून संतुलन साधले जाते. याप्रकारचे संतुलन साधण्यास कठीण असते. परंतु यामुळे मांडणीत विविधता आणता येते, कारण यात मांडणी करणाऱ्या व्यक्तिच्या कल्पनेला वाव मिळतो. एखाद्या वस्तूचे दृश्य-वजन किती आहे हे जाणून त्यावरून त्या वस्तूची आरामदायक मांडणी करावी लागते. हे संतुलन गती, स्वाभाविकता व औपचारिकता सुचविते, मांडणीबद्दलची उत्सुकता वाढवते. योग्य संतुलन साधले जाण्यासाठी याप्रकारच्या संतुलनात पूर्ण स्वातंत्र्य व लवचिकता मिळते त्यामुळे मांडणीची उपयोगिता, सौंदर्य व वैशिष्ट्य वाढते. घराच्या आतील तसेच बाहेरील मांडणीत, पुष्परचनेत, फर्निचरच्या मांडणीत, प्रदर्शनातील ब दुकानातील वस्तूंच्या मांडणीत, जाहिराती इत्यादी सर्व ठिकाणी समान किंवा असमान संतुलनाचा उपयोग केलेला दिसून येतो. अशा विविध प्रकारे घरातील व बाहेरील सजावट करता येते.

**(४) लय (Rhythm) -**

लय हे कलेचे तत्त्व आहे. लस असल्यामुळे वस्तू आकर्षक दिसते. लय या कलेच्या तत्त्वाचे उदाहरण द्यायचे झाल्यास मानवी आकृतीचे देता येईल. कारण शरीररचनेत लयबद्धता आहे.

लय म्हटल्यावर काहीतरी डौलदार, नागमोडी, उत्साहपूर्ण, सहजस्फूर्त हालचाल आहे अशी कल्पना मनात येते. या सर्व कल्पनांमध्ये काहीतरी सौंदर्यपूर्ण संघटन आहे असे दिसते. लय म्हणजे एकप्रकारची हालचाल, परंतु सर्वच हालचाली लयदार नसतात तर त्यांच्यातून गोंधळ किंवा घोटाळा प्रतीत होतो. म्हणून लय म्हणजे नुसतीच हालचाल नसून संघटनात्मक रीतीने केलेली हालचाल होय. कलेमध्ये लय म्हणजे सोपा, संबंधित असलेला मार्ग की ज्याच्या मदतीने नजर मांडणीतील रेषा व रंग यावरून सहजपणे फिरू शकेल. म्हणूनच लय म्हणजे संबंधित हालचाल (Related Movement) असे म्हणता येईल. रिकाम्या जागेवर काहीच हालचाल होत नाही. नजर ज्याठिकाणी असेल तिथेच राहते. परंतु त्याठिकाणी एखादी आकृती किंवा वस्तू आल्याक्षणीच नजरेची हालचाल सुरू होते. त्या वस्तूत किंवा आकृतीत दाखविलेल्या रेषांना अनुसरून नजरेची हालचाल सुरू होते. आकृती किंवा वस्तू यात लय असेल तर नजर सहज फिरेल. परंतु जर वस्तूमध्ये लय नसेल तर नजर सहजपणे फिरणार नाही व त्यात लयेची कमतरता दिसून येईल.

**हॅरिअट आणि गोल्डस्टिन** यांच्या मते, "लय म्हणजे एक असा सोपा मार्ग जो रेषा, आकार, रंग याद्वारे कोणत्याही मांडणीची यात्रा करू शकतो. अशा प्रकारे लय ही गतीशी संबंधित आहे.

कोणत्याही कलेत लय असेल तरच ती आकर्षक वाटते. उदा., चित्रकला, गायनकला, नृत्यकला या सर्व ठिकाणी लय असणे आवश्यक असते. लय हे कलाकृतीचे महत्त्वाचे तत्त्व समजले जाते. म्हणूनच सजावटीतसुद्धा याला महत्त्व असते.

लयबद्ध हालचाल साध्य करण्याच्या तीन पद्धती आहेत.

(१) आकाराच्या पुनरावृत्तीमधून

(२) आकारमानाच्या वृद्धिमधून

(३) सहज संबंधित किंवा अखंड रेषांच्या हालचालीमधून

**(१) आकाराच्या पुनरावृत्तीमुळे लय साधणे :** आकारात पुनरावृत्ती करताना प्रमाण आणि अवकाश याचा विचार करणे आवश्यक असते. आकाराची नियमबद्ध व योग्य अंतराने पुनरावृत्ती होते तेव्हा नजर एका भागावरून दुसऱ्या भागावर सहजपणे फिरते व ते वेगवेगळे भाग न वाटता तो लयबद्ध विकास वाटतो. त्यामुळे सजावटीत किंवा आकृतीत एकता आल्यासारखी वाटते.

गृहसजावट करताना सारख्या आकाराच्या वस्तू वापरून लयबद्धता आणता येते. सारख्या आकाराच्या पुनरावृत्तीमुळे आरामोत्पादक परिणाम दिसून येतो. दोन वेगळ्या आकाराच्या वस्तू एकत्र करून त्यांच्या पुनरावृत्तीमुळे लयबद्धता आणता येते. उदा., फक्त त्रिकोणाची, चौकोनाची, वर्तुळाची पुनरावृत्ती करून चांगली डिझाईन करता आली नाही तरी दोन वेगळे आकार एकत्र करून लय साधता येते व डिझाईन आकर्षक करता येते. अशा प्रकारे गृहसजावटीमध्ये त्याचा उपयोग करता येतो.

**(२) आकारमानात वृद्धिमुळे लय साधणे :** आकारमानात नियमपूर्वक वाढ करून लय साधली जाते. त्यामुळे नजर लहान आकारमानावरून सहजच मोठ्या आकारमानाकडे वळते. म्हणून आकारमानाची अशाप्रकारे मांडणी करावी लागते. आकारमानात नियमबद्ध वृद्धि करून लय साधली जाते. आकारमानात नियमबद्ध वृद्धि केल्याने नजर लहान आकारमानावरून सहजपणे मोठ्या आकारमानापर्यंत फिरते. आकारमानातील फरक हा अतिशय कमी प्रमाणात करणे आवश्यक असते; तेव्हाच नजर हळूवारपणे व सहजपणे फिरते. आकारमानातील फरकामुळे नजर लवकर पुढे सरकते. त्यामुळे आकारमानातील वाढ योग्य नसली तर त्या आकृतीत अखंडीतपणा न राहून ती लयबद्ध वाटत नाही. गृहसजावटीत बऱ्याच वेळा याचा दुरुपयोग केलेला दिसून येतो. बऱ्याच वेळा वस्तूंची किंवा चित्रांची मांडणी भिंतीला लागून खालपासून वरपर्यंत केली जाते. त्यामुळे नजर खालून वर पोहचते आणि खोलीतील दुसऱ्या जास्त चित्तवेधक भागापासून लांब नेली जाते. जेव्हा वस्तूंच्या उंचीत किंवा आकारमानात फरक नसतो तेव्हा सजावट कंटाळवाणी होऊ नये म्हणून अशी पायऱ्या-पायऱ्यांची मांडणी करणे आवश्यक

असते. परंतु तेव्हा पायऱ्यांची विभागणी अशाप्रकारे करावी की ज्यामुळे नजर परत खाली येईल.

**(३) अखंड रेषांच्या गतीमुळे लय साधणे :** याचे वैशिष्ट्य म्हणजे अखंड रेखांच्या गतीने लय साधली जाते. यामध्ये डिझाईनच्या कोणत्याही भागाकडे लक्ष गेले तरी नजर रेषांच्या माध्यमातून प्रवास करते.

घराच्या बाह्यस्वरूपात देखील लय आवश्यक असते. ही लय घराच्या बाह्य भागात येणारी दारे व खिडक्या यांची योग्य जागा ठरवून त्यांच्यापासून निघणाऱ्या रेषांमध्ये अखंडता आणून साधता येते. परंतु बरेचदा घराचे आयोजन आतील खोल्यांपासून केले जाते. त्या खोल्यांमध्ये ज्या प्रमाणात खिडक्या आवश्यक असतात त्याप्रमाणात ठेवल्या जातात आणि त्यामुळे दरवाजे व खिडक्यांची घराच्या बाह्यबाजूने *दिसणारी मांडणी लयबद्ध नसते.

घराच्या अंतरसजावटीमध्ये लय किती प्रमाणात व कोणत्या भागात असावी याचा विचार प्रथम करावा. गालिचावर डिझाईनमध्ये लयबद्धता असल्यास ते शोभणार नाही कारण सर्व लक्ष तिथेच आकर्षले जाईल. यासाठी त्या डिझाईन लहान व थोड्या प्रमाणात लयबद्ध असाव्यात.

फर्निचरच्या मांडणीतसुद्धा लय असणे आवश्यक असते. लय नसली तर ती मांडणी विखुरलेली वाटेल. फर्निचरची मांडणी मुख्यतः त्याच्या उपयोगाप्रमाणे गटागटात केली जाते. परंतु ह्या गटांमध्ये रेषांच्या उपयोगाने अखंडता आणली जाऊन मांडणीत लय साधता येते. फर्निचरची मांडणी अशा प्रकारची करावी की ज्यामुळे नजर त्यावरून सहजपणे फिरून, जेथे प्राधान्य दिलेला भाग असेल तिथे जाऊन थांबेल. फर्निचरच्या मांडणीत लय साधण्यासाठी सारख्या प्रकारचे फर्निचर असावे व दह्यातील तोचतोपणा घालविण्यासाठी थोड्या वक्राकार रेषांचा उपयोग करावा म्हणजे त्यावरून नजर सहज फिरू शकेल.

**(५) प्राधान्य (Emphasis) -**

प्राधान्य हे गृहसजावटीतील महत्त्वाचे कलेचे तत्त्व आहे. सजावटीत एखाद्या गोष्टीला प्राधान्य देणे म्हणजे ती वस्तू उठावदार दिसण्याकरिता प्रयत्न करणे होय.

प्राधान्य म्हणजे कोणत्याही मांडणीतील सर्वात महत्त्वाच्या भागाकडे प्रथम आणि इतर वस्तूंकडे त्यांच्या महत्त्वाच्या क्रमानुसार नंतर लक्ष वेधणारे तत्त्व होय.

जेव्हा कोणत्याही वस्तूची निवड किंवा मांडणी तिच्या स्वरूपावरून केली जाते तेव्हा प्राधान्य हे तत्त्व वापरलेले असते. मांडणी करताना ती आकर्षक होण्यासाठी वस्तूंचे स्वरूप पाहून आकर्षक वस्तूंची निवड करून मांडणी केल्यास ती जास्त यशस्वी होते.

वस्तूंना प्राधान्य देताना पुढील चार मुद्यांचा विचार करावा लागतो.

(१) कशाला प्राधान्य द्यावे.

(२) प्राधान्य कसे द्यावे.

(३) प्राधान्य किती प्रमाणात द्यावे.

(४) प्राधान्य कुठे द्यावे

**(१) कशाला प्राधान्य द्यावे :** कोणतीही सजावट करताना नेमके काय करायचे आहे याचे नियोजन करावे. आणि नियोजनाच्या गोष्टी निश्चित कराव्यात. ज्या वस्तूला प्राधान्य द्याचे आहे त्याचे कलेचे मूलघटकाचा प्रभाव चांगला असावा. प्रत्येक सजावटी मध्ये सर्वात महत्त्वाच्या वस्तूमध्ये विविधता दिसून येईल. परंतु ज्या वस्तू अतिशय कमी महत्त्वाच्या असतील त्या सर्वसाधारणपणे सगळ्या सजावटीमध्ये सारख्याच असतात. कमी प्राधान्य असलेल्या वस्तूंचा पार्श्वभूमी म्हणून उपयोग केला जातो, ज्याच्यासमोर महत्त्वाच्या किंवा प्राधान्य दिलेल्या वस्तू मांडलेल्या असतात. यावरून एक सर्वसाधारण सिद्धान्त लक्षात येतो तो असा की पार्श्वभूमी नेहमी तिच्या समोर ठेवण्यात येणाऱ्या वस्तूपेक्षा साधी असावी.

ज्या वस्तूला प्राधान्य द्यायचे असेल त्यांचा रंग, आकार, पोत, डिझाईन, पार्श्वभूमी इत्यादी सुसंगत असाव्यात.

**(२) प्राधान्य कसे द्यावे :** प्राधान्य देण्याच्या बऱ्याच पद्धती आहेत. त्यापैकी खालील पाच पद्धती

**(अ) वस्तूंची गटात मांडणी करून :** फर्निचरचा गट करून ते आकर्षक रीतीने मांडून प्राधान्य देता येते किंवा छोट्या चित्रांचा गट करून किंवा फुलांची आणखी काही वस्तूंबरोबर मांडणी करून त्या गटाला प्राधान्य देता येते. वस्तूंचा गट करताना अशा वस्तूंची निवड करावी की ज्यांचा एकमेकीशी संबंध आहे. गटात प्रत्येक वस्तूला योग्य स्थान द्यावे त्याने गटाला अर्थपूर्ण एकात्मता येईल.

**(ब) विरोधी रंगाचा वापर :** विरोधी रंगाच्या उपयोगामुळे लक्ष एकदम आकर्षित होते म्हणून कोणत्याही वस्तूकडे लक्ष वेधून घेण्याची परिणामकारक पद्धत म्हणजे प्राधान्य द्यावयाची वस्तू विरोधी पार्श्वभूमीवर ठेवणे. बऱ्याच वेळा प्राधान्य द्यायची वस्तू तेजस्वी प्रकाशात ठेवणे. बऱ्याच वेळा प्राधान्य द्यायची वस्तू तेजस्वी प्रकाशात ठेवून बाकीच्या ठिकाणी थोडा अंधुक प्रकाश देऊन विरोध उत्पन्न केला जातो. ह्यात तेजस्वी प्रकाश ठेवताना त्याचा डोळयाला त्रास होणार नाही हे पहाणे आवश्यक असते. एकाच रंगाची अत्यंत फिकी छटा व गडद छटा यांचा उपयोग करून विरोध निर्माण करता येतो.

**(क) सजावटीचा उपयोग करून :** प्राधान्य द्यायच्या वस्तूला जास्त सजवून मांडल्याने ती जास्त आकर्षक दिसते. उदा., वेगवेगळया प्रकारच्या बाहुल्या तयार करता येतात. परंतु बाहुलीला सर्व दागिने घालून चागल्या रीतीने सजवून मांडली तर ती जास्त आकर्षक दिसेल, तसेच कपड्यावर लेस किंवा भरतकाम करून वस्तू सजविता येते.

**(ड) साध्या पार्श्वभूमीचा उपयोग :** अत्यंत साध्या पार्श्वभूमीसमोर जर वस्तू मांडली तर ती जास्त आकर्षक दिसते व एकदम लक्ष वेधून घेते. त्या वस्तूंच्या जवळपास दुसऱ्या वस्तू असल्या तर प्राधान्य दिलेल्या वस्तूचा परिणाम डोळयावर पटकन होत नाही.

परंतु फक्त तिच वस्तू अतिशय साध्या पार्श्वभूमीसमोर असली तर ती जास्त डोळ्यात भरते. त्याचप्रमाणे ती वस्तू पूर्णपणे दिसू शकते व लगेच लक्ष वेधते:

**(इ) विरोधी किंवा असाधारण रेषांचा उपयोग :** विरोधी रंगाप्रमाणेच विरोधी रेषांमुळे वस्तू उठून दिसते. कारण नेहमीपेक्षा त्यात काहीतरी वेगळेपणा दिसून येतो व लक्ष आकर्षित होते. पेपरमध्ये किंवा जाहिरातीत मुख्य महत्त्वाची बातमी जाड अक्षरात किंवा तिरप्या अक्षरात छापतात त्यामुळे लगेच लक्ष वेधले जाते.

**(३) प्राधान्य किती द्यावे :** प्राधान्याचे प्रमाण हे सजावटीप्रमाणे बदलते तसेच खोलीचा आकार, उपयोग लक्षात घ्यावे लागतात. जितके प्राधान्य देणे शक्य असते त्यापेक्षा नेहमी कमी प्रमाणात प्राधान्य द्यावे म्हणजे ते जास्त न झाल्यामुळे जास्त आकर्षक वाटते. जास्त प्रमाणात प्राधान्य दिले गेल्यास ते परिणामकारक होणार नाही कारण प्राधान्य दिलेला भाग जास्त व गौण भाग कमी राहण्याची त्याचप्रमाणे दोन किंवा तीन प्राधान्याचे बिंदू तयार होण्याची भीती असते. खोलीतल्या मोकळ्या जागेचे व प्राधान्याचे प्रमाण हे ३:२ असे असावे म्हणजे रिकाम्या जागेचा दोन पंचमांश भाग प्राधान्यासाठी सोडावा म्हणजेच मोकळ्या साध्या जागेच्या तुलनेत प्राधान्याला कमी जागा द्यावी.

**(४) प्राधान्य कुठे द्यावे :** केलेल्या सर्व कलाकृतीकडे लक्ष वेधल्या जाईल अशा प्रकारची मांडणी करण्यात यावी. प्राधान्य दिलेल्या वस्तुच्या आजुबाजूला मोकळी जागा ठेवणे क्रमप्राप्त आहे. वस्तुच्या आकारावरून वस्तु कुठे ठेवावी हे अवलंबून असते. उंच पुष्परचना असेल तर ती जेवणाच्या टेबलवर ठेवता येणार नाही तर तेथे पसरट पुष्परचना करावी लागले. प्राधान्य गृहसजावटीत जास्त महत्त्वाचे असते. ज्या खोल्यांमधे जास्त वेळ राहावे लागते अशा खोलीत सौम्य, नाजुक वस्तू प्राधान्य म्हणून निवडावी व ज्या खोलीत थोडावेळ रहावे लागते अशा खोलीत अधिक शोभिवंत व उत्तेजक प्राधान्याचा उपयोग करावा. त्याचप्रमाणे किती प्रमाणात प्राधान्य द्यावयाचे हे नक्की ठरविता येत नाही कारण ते खोलीप्रमाणे तसेच घरात राहणाऱ्या लोकांच्या आवडीवर अवलंबून असते.

## ४.३ रंग, रंगाचे उगमस्थान आणि वर्गीकरण

रंग ही निसर्गाने मानवाला दिलेली अद्भूत गोष्ट आहे. मानवाच्या विकासाबरोबर रंगशास्त्र देखील तितकेच विकसीत झालेले आहे. निसर्गामध्ये असणाऱ्या विविध रंगांचा आपल्या जीवनामध्ये आणि गृहसजावटीकरिता उपयोग करून त्याचा आनंद घेता येतो.

सौंदर्याची अनुभूती घेतच मनुष्य जगत असतो. निसर्गात विविध रंगांची मुक्त उधळण आपल्याला दिसून येते. या रंगाच्या सहाय्याने निसर्गाचे सौंदर्य अधिक खुलून दिसते. त्यामुळे आपण मुग्ध होतो. रंगांना दृक कलाकृतीचे संगीत (Music of Visual Arts) असे म्हटले आहे. रंगांमध्ये आकर्षण निर्मितीची शक्ती असते.

रंगाचे आकर्षण हे विश्वव्यापी असते व त्यांचा सगळयात चांगला उपभोग ते जेव्हा योग्य प्रकारे वापरले असतील तेव्हाच मिळतो. त्याच रंगाचा उपयोग घराच्या आंतर व बाह्य सजावटीसाठी करून घरात सौंदर्य व चित्तवेधकता आणता येते.परंतु त्यासाठी रंगाबद्दल, रंगसंगतीबद्दल व त्यांच्या मानसिक परिणामाबद्दल माहिती असणे जरुरीचे असते. नाहीतर बऱ्याच वेळा त्या रंगापासून चांगला परिणाम होण्यापेक्षा व मन उल्हासित होण्यापेक्षा जास्त उदास वाटू लागते. किंवा त्या रंगाच्या उपयोगानी संताप व चिडकेपणा वाढतो.

मनुष्य जरी रंगाचा वापर विविध कारणासाठी करत असला तरी रंग एकमेकात मिळसून त्याच्यापासून नवीन आकर्षक रंग निर्माण करता येतात याबद्दल सर्वांनाच थोडीफार माहिती असते. या प्रकरणामध्ये आपण गृहसजावटीत रंग व रंगसंगतीचा उपयोग कसा करता येईल हे पाहू.

**रंगाचा स्त्रोत किंवा उगम (Source of Colour)**

प्रकाश रंगाचे उगमस्थान आहे हे सर्वप्रथम आयझॅक न्यूटन या शास्त्रज्ञाने शोधून काढले. प्रकाश हे रंगाचे उत्पत्तीस्थान आहे. रंगाचा शोध लावताना न्यूटन याने एका अंधाऱ्या खोलीत भिंतीवर पांढरा पडदा लावला आणि एका रोलकातून प्रकाश किरण

परिवर्तीत केले. त्या किरणाचे वक्रिभवन होऊन रंगाचा एक समिश्र पट्टा पडद्यावर पडलेला दिसला. रंग म्हणजे डोळ्याकडून काही विशिष्ट उत्तेजनामुळे मेंदुला दिली गेलेली अस्पष्ट संवेदना होय. कोणत्याही पृष्ठभागाने प्रकाश वर्णपटातील किरणे शोषण करून परावर्तित केलेली दृश्य किरणे म्हणजे रंग होय. ज्यावेळी एखाद्या अपारदर्शक वस्तूवर प्रकाश पडतो, तेव्हा काही प्रकाशकिरणे ती वस्तूं शोषण करते व काही परावर्तित करते. या परावर्तित किरणांच्या तरंग विस्तारामुळे (WaveLenght) वस्तूला विशिष्ट रंग प्राप्त होतो. ज्या रंगाची वस्तू असेल त्या रंगाची किरणे त्या वस्तूवरून परावर्तित केली जातात आणि त्याची संवेदना डोळ्यातील नेत्रदशा (Retina) वर होऊन नेत्रमज्जातंतूंनी मेंदुकडे पोहोचविली जाते. वेगवेगळ्या रंगाच्या वेगवेगळ्या तरंग विस्तारामुळे वेगवेगळ्या रंगाची संवेदना मेंदुला होऊन वेगवेगळे रंग दिसू लागतात. विछिन्न किरणदर्शक (Spectroscope) या नेत्रविषयक साधनाच्या मदतीने प्रकाश किरणांचे पृथक्करण केल्यास प्रकाश हा वेगवेगळ्या रंगकिरणांनी बनलेला आहे हे दिसून येते व त्यांची मांडणी रंगाच्या तरंग विस्ताराप्रमाणे असते. त्याच्या एका टोकाला जांभळा रंग असतो. ज्याचा रंगविस्तार सर्वात कमी असतो व दुसऱ्या टोकाला लाल रंग असतो ज्याचा तरंग विस्तार सर्वात जास्त असतो आणि आतले नारिंगी, पिवळा, हिरवा, निळा हे रंग त्यांच्या तरंग विस्ताराप्रमाणे उपस्थित असतात. विशिष्ट तरंग विस्तार असलेल्या प्रकाश लहरींमुळे विशिष्ट रंगानुभव मिळतो.

रंग व रंगद्रव्य यांचा अभ्यास वेगवेगळ्या दृष्टीकोनातून वेगवेगळ्या पद्धतीनी नियमबद्ध केलेला आहे. त्यातील दोन सर्वात जास्त वापरण्यात येतात त्या म्हणजे प्रॅंग पद्धती (Prang System) आणि मनसेल पद्धती (Musell System). रंग व त्यांचे प्रकार याबद्दल मनात घोटाळा निर्माण न व्हावा म्हणून आपण फक्त प्रॅंग या पद्धतीचा सखोल अभ्यास करू.

**प्रॅंग रंग पद्धती :** प्रॅंग या शास्त्रज्ञाने रंगासंबंधी बरेच अध्ययन करून त्यावरून काही निष्कर्ष काढले आहेत. त्याच्या पद्धतीप्रमाणे रंगांना सुद्धा तीन गुण असतात. त्यांना

रंगाची परिमाणे असे म्हणतात. ज्याप्रमाणे वस्तूची उंची, रुंदी, व जाडी वेगवेगळी असते त्याप्रमाणेच ही रंगाची परिमाणेसुद्धा रंगाचे वेगवेगळे गुण दर्शवितात.

या सर्वांचे वर्गीकरण तीन प्रकारे करता येईल.

(१) भौतिक गुण (२) मनोवैज्ञानिक गुण (३) रंगातून उद्धवलेले गुण

**(१) भौतिक गुण :** रंगाचे दोन प्रकार असतात. काही रंग चमकदार व आकर्षक असतात. हे रंग चक्राच्या डाव्या बाजूस दिसतात, त्यांना उष्ण रंग म्हणतात तर रंगचक्राच्या उजव्या बाजूला शांत व मनाला प्रसन्न करणारे रंग असतात त्या रंगांना शीत रंग म्हणतात. यात काही पुढे सरकणारे तर काही मागे सरकणारे रंग येतात.

**(२) मनोवैज्ञानिक गुण :** प्रत्येक रंगाचा मनावर वेगळा परिणाम होतो. रंगामध्ये शरीराला तसेच मनाला ओढून घेणारी, आकर्षित करणारी शक्ती असते. मनुष्याच्या मानसिकतेवर रंगाचा होणारा परिणाम अभ्यासतांना मनोवैज्ञानिकांच्या मते उष्ण रंग मनुष्याला काम करण्यास सक्रिय बनवतात. तर शीत रंग मनाला शांतता देतात.

**(३) रंगातून उद्धवलेले गुण :**

१) रंगनाम किंवा वर्ण (Hue or Name of the Colour)

२) रंगछटा किंवा रंगमुल्य (Value of the Colours)

३) रंगाची तीव्रता किंवा रंग कांती (Intensity of the Colour)

कोणत्याही रंगात ही तीनही पश्माणे उपस्थित असतात. ही परिमाणे रंगातील उष्णत्व किंवा शीतत्व, फिक्केपणा किंवा गडदपणा व तेजस्विता किंवा मंदपणा दर्शवितात.

**(१) रंगनाम किंवा वर्ण (Hue or Name of the Colour) :** रंगाच्या नावाला रंगनाम किंवा (Hue) असे म्हणतात. उदा. लाल, पिवळा, निळा इत्यादी. पिवळ्या

व लाल रंगातील फरक म्हणजे रंगनामातील फरक होय. जर पिवळ्या रंगात लाल रंग मिसळला तर तो लगेच नारिंगी होईल म्हणजेच त्याचे रंगनाम बदलेल.

प्रकाशाचे पृथक्करण केल्यावर त्यातील वेगवेगळे रंग दिसून येतात. त्यांना 'सामान्य रंग' असे म्हणतात. प्रकाशाच्या किंवा रंगाच्या अनुपस्थितीमुळे वस्तूला काळा रंग येतो. ज्या पृष्ठभागावरून सर्वच प्रकाश किरणाचे शोषण केले जाते तो पृष्ठभाग काळा दिसतो व पांढरा रंग म्हणजे ज्या पृष्ठभागावरून सर्व रंगाचे सारख्या प्रमाणात परावर्तन होईल तो पृष्ठभाग. परंतु रंगद्रव्यामध्ये सर्व रंगद्रव्ये एकत्र केल्यावर राखाडी हा तटस्थ रंग तयार केला जातो कारण पांढरे रंगद्रव्य हे प्रकाशाप्रमाणे सर्व किरणे परावर्तीत न करता काहींचे शोषण करते. त्यामुळे दुसऱ्या रंगाबरोबर मिसळल्याने राखाडी रंग तयार होतो.

**(२) रंगछटा किंवा रंगमूल्ये (Value of the Colour) :** हे रंगाचे दुसरे परिमाण होय. रंगछटा किंवा रंगमूल्य रंगाचा फिकेपणा किंवा गडदपणा दाखविते. पांढरा रंग हा सर्वात फिक्का व काळा रंग हा सर्वांत गडद मानला जातो व द्या दोन रंगाच्यामध्ये रंगाच्या बऱ्याच छटा दिसून येतात. पण रंगाचा उपयोग करण्यासाठी सोईस्कर जावे म्हणून रंगछटांच्या नऊ पायऱ्या केलेल्या आहेत. फिक्या छटांचे मूल्य जास्त व गडद छटांचे मूल्य कमी असते. पांढऱ्या रंगाचे मूल्य सर्वात जास्त व काळया रंगाचे मूल्य सर्वात कमी मानले जाते. या दोनच्या मधल्या छटेला माध्यमिक छटा असे म्हणतात. रंगमुल्यांच्या पायऱ्यांची सुरुवात पांढऱ्यापासून सुरू होते. त्याचे चिन्ह (W) असे दाखविले जाते. त्यानंतर जास्त फिक्का (High Light) , फिक्का (Light), कमी फिक्का (Low Light), मध्यम (Middle), कमी गडद (Low Dark), गडद (Dark), जास्त गडद (High Dark), काळा (Black).

रंगाच्या रंगछटा त्यात पाणी किंवा पांढरा रंग टाकून फिक्या व जास्त रंगद्रव्य किंवा काळा रंग टाकून गडद करता येतात. प्रत्येक रंगाचे रंगमूल्य काळया रंगापेक्षा थोडे कमीपर्यंत कमी करता येत व पांढऱ्या रंगापेक्षा थोडे कमीपर्यंत वाढविता येते.

ज्या रंगछटा मध्यम छटेच्या आधी येतात त्यांचे मूल्य उच्च समजले जाते व ज्या रंगछटा नंतर येतात त्यांचे रंगमूल्य कमी समजले जाते.

कोणताही रंग पांढऱ्या किंवा फिक्या पार्श्वभूमीवर गडद वाटतो, मध्यम पार्श्वभूमीवर फिका वाटतो व काळया रंगाच्या पार्श्वभूमीवर जरासुद्धा उठून दिसत नाही. म्हणून रंगाचा योग्य उपयोग करण्यासाठी रंगछटांची योग्य निवड जरुरीची असते. नाहीतर रंगाची निवड योग्य होऊन सुद्धा त्याचा परिणाम योग्य होत नाही.

फिक्या रंगछटामुळे वस्तू मागे गेल्यासारख्या वाटतात. त्यामुळे खोलीला फिका रंग दिल्यास खोली मोठी दिसते. तसेच पांढरा व फिका रंग प्रकाश परावर्तीत करतात त्यामुळे त्यांच्या पार्श्वभूमीवर वस्तू उठून दिसते. काळा व गडद रंग पुढे आल्यासारखे वाटतात त्यामुळे त्यांचा उपयोग लहान खोलीच्या पार्श्वभूमीसाठी योग्य ठरत नाही. त्यांचा उपयोग फरशीसाठी किंवा गालीच्यासाठी योग्य ठरतो. सारख्याच रंगमूल्यांचा उपयोग फक्त जेव्हा जास्त रंग वापरावयाचे असतात तेव्हा करावा. दोन रंगछटातील विरोध हा दोन विरोधी रंगातील विरोधापेक्षा जास्त ठळकपणे दिसून येतो. विरुद्ध पार्श्वभूमीवर वस्तूचा आकार ठळकपणे उठून दिसतो. म्हणून आकर्षक आकार असलेल्या वस्तू विरुद्ध पार्श्वभूमीवर ठेवाव्यात.

**(३) रंगाची तीव्रता किंवा रंगकांती (Intensity) :** रंगाची तीव्रता किंवा रंगकांती रंगाचा तेजस्वीपणा किंवा मंदपणा सुचविते. ही रंगाचे करड्या किंवा उदासिन रंगापासूनचे अंतर दर्शविते. पूर्ण तीव्रता असलेले रंग अतिशय मनोवेधक असतात व त्यांचा योग्य व थोडा वापर केल्यास मनोवेधक वाटतात. एकाच रंगाच्या वेगवेगळया तीव्रतेनी वेगवेगळे मानसिक परिणाम दाखविले जातात. कमी तीव्रता असलेले रंग जास्त शांत व नाजुक वाटतात त्यामुळे मोठ्या भागासाठी किंवा पार्श्वभूमीसाठी अशा रंगाचा उपयोग करावा व जास्त तीव्रता असलेले रंग चटकन लक्ष वेघून घेतात म्हणून थोड्या भागात जिथे प्राधान्य द्यावयाचे असेल तिथे वापरावे. उदा., रंगसंगतीमध्ये जास्त तीव्र रंग भिंतीला किंवा

फर्निचरला देण्यापेक्षा शोभेच्या सहाय्यक वस्तूंसाठी वापरावे. आकृतीमधील रंगचक्रातील बाहेरच्या वर्तुळातील रंग हे सर्वात जास्त तीव्र, मधल्या वर्तुळातील कमी तीव्र व आतील करडा रंग हा सर्वात कमी तीव्र, किंवा उदासिन, तटस्थ रंग समजला जातो. रंगमूल्याप्रमाणेच रंगकांती किंवा रंगाची तीव्रतासुद्धा पाच श्रेणीमध्ये विभागली जाते. सर्वात जास्त तेजस्वी ¼ उदासीन, ½ उदासीन, ¾ उदासीन, पूर्ण उदासीन. पूरक रंगाच्या उपयोगानी तीव्रतेत फरक करता येतो. पूरक. रंग म्हणजे जे रंग चक्रावर बरोबर समोरासमोर येतात ते. पूरक रंग शीतता व उष्णता यांच्यात पूर्ण समतोलत्त आणतात व जेव्हा ते मिसळले जातात तेव्हा ते एकमेकांची तीव्रता कमी करून एकमेकांना उदासिन करतात.

**रंगाची तीव्रता कमी करण्यासाठी खालील उपाय करावे -**

१) जास्त प्रमाणातील अती तीव्र रंगाबरोबर मंद, नाजुक रंगाचा वापर केल्यास तीव्र रंगाची तीव्रता कमी होते.

२) तीव्र रंग कमी तीव्र करण्यासाठी तो त्याच रंगछटेच्या पण थोड्या वेगळ्या व अतिशय मंद रंगाबरोबर मिसळल्यास त्या रंगाची तीव्रता कमी होते.

पोत व रंगाची तीव्रता यांचा बराच संबंध असतो. गुळगुळीत पोताच्या वस्तूचा रंग जास्त तीव्र दिसतो तर खरखरीत पोताच्या वस्तूचा रंग कमी तीव्र दिसून त्यात रंगाचे तरंग दिसून येतात.

**रंगाचे वर्गीकरण (Types of Colour) -**

रंग पद्धतीत रंगाचे ५ श्रेणींमध्ये विभाजन केले आहे.

१. प्राथमिक रंग (Primary Colours)

२. द्वितीय श्रेणीचे रंग (Secondary Colours)

३. माध्यमिक रंग (Intermediate Colours)

४. तृतीय श्रेणीचे रंग (Tertairy Colours)

५. चतुर्थ श्रेणीचे रंग आणि रंगचक्र (Quarternery Colours)

**(१) प्राथमिक किंवा प्रथम श्रेणीचे रंग :** लाल, पिवळा व निळा हे प्राथमिक किंवा मूलभूत रंग समजले जातात व बाकीचे सर्व रंग ह्या रंगाच्या वेगवेगळ्या प्रमाणातील मिश्रणातून मिळतात. ही तीनच मुल रंगतत्वे रंगद्रव्य तयार करताना वापरली जातात. रंगद्रव्यामधील हेच रंग असे आहेत की जे कोणत्याही रंगाच्या मिश्रणानी तयार होत नाही.

**२) द्वितीय श्रेणीचे रंग :** दोन प्राथमिक रंग समप्रमाणात मिसळले असता वेगळाच र होतो. ह्या नवीन रंगाला द्वितीय श्रेणीचे किंवा दुय्यम रंग असे म्हणतात.

हिरवा, नारिंगी व जांभळा हे तीन दुय्यम रंग अनुक्रमे पिवळा व निळा, पिवळा व लाल आणि लाल व निळा या प्राथमिक रंगाच्या मिश्रणाने तयार होतात.

**३) माध्यमिक रंग :** प्रथम श्रेणीचा एक व द्वितीय श्रेणीचा एक असे दोन रंग मिसळल्यास माध्यमिक रंग तयार होतो. माध्यमिक छटाही तो ज्या रंगापासून बनलेला असेल त्याच्या मधली येते. 'असे माध्यमिक रंग सहा आहेत.

| **प्रथम श्रेणीचे** | | **द्वितीय श्रेणीचे** | **माध्यमिक श्रेणीचे** | |
|---|---|---|---|---|
| लाल | + | नारिंगी | = | लालसर नारिंगी |
| पिवळा | + | नारिंगी | = | पिवळसर नारिंगी |
| पिवळा | + | हिरवा | = | पिवळसर हिरवा |
| निळा | + | हिरवा | = | निळसर हिरवा |
| निळा | + | जांभळा | = | निळसर जांभळा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लाल | + | जांभळा | = | लालसर जांभळा |

**(४) तृतीय श्रेणीचे रंग :** जेव्हा दोन द्वितीय श्रेणीचे रंग मिसळले जातात तेव्हा तृतीय श्रेणीचे रंग तयार होतात. तृतीय श्रेणीचे रंग म्हणजे लाल, निळा व पिवळा हेच रंग बऱ्याच उदासीन छटेतील असतात. म्हणून तृतीय श्रेणीचा निळा रंग राखाडी निळा, पिवळा रंग राखाडी पिवळा व लाल रंग राखाडी लाल म्हणून संबोधण्यात येतो. रंग उदासिन किंवा राखाडी असतात कारण त्यात तिन्ही प्राथमिक रंगाचे मिश्रण कमी अधिक प्रमाणात झालेले असते. उदा., तृतीय श्रेणीतील पिवळा रंग हा नारिंगी व हिरवा या रंगाच्या मिश्रणाने तयार होतो. नारिंगी रंग हा लाल आणि पिवळा या रंगांच्या मिश्रणाने व हिरवा रंग हा पिवळा व निळा ह्या रंगाच्या मिश्रणाने तयार होतो. त्यामुळे हिरवा व नारिंगी यांच्या मिश्रणात निळा, पिवळा व लाल हे तिन्हीरंग असून पिवळयारंगाचे प्रमाण त्यात जास्त असते. लाल आणि निळ्या रंगाच्या मिश्रणाने तयार होणारा जांभळा रंग पिवळ्या रंगाचे उदासिकरण करतो व म्हणून तो राखाडी पिवळा म्हणून ओळखला जातो.

तसेच नारिंगी व जांभळा यांच्या मिश्रणाने राखाडी लाल आणि जांभळा व हिरवा यांच्या मिश्रणाने राखाडी निळा रंग तयार होतो.

**(५) चतुर्थ श्रेणीचे रंग :** दोन तृतीय श्रेणीचे रंग मिसळले असता चतुर्थ श्रेणीचे रंग तयार होतात. म्हणून चतुर्थ श्रेणीचे रंग हे हिरवा, जांभळा व नारिंगी हेच असतात परंतु उदासिन छटेत असतात.

| | | |
|---|---|---|
| निळसर राखाडी | पिवळसर राखाडी | हिरवट करडा |
| निळसर राखाडी | लालसर राखाडी | जांभळट करडा |
| पिवळसर राखाडी | लालसर राखाडी | नारिंगीसर करडा |

निळसर करडा व पिवळसर करडा या तृतीय श्रेणीच्या रंगाचे मूळ घटक पुढीलप्रमाणे आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (पिवळा + निळा | + | (निळा - लाल) | = | निळसर राखाडी |
| (लाल + पिवळा) | + | (पिवळा + निळा) | = | राखाडी पिवळा |

या निळसर राखाडी व पिवळसर राखाडी या रंगाच्या मिश्रणापासून चतुर्थ श्रेणीचा हिरवट रंग तयार होतो. त्यातील मूळघटक ३ भाग पिवळा +३ भाग निळा +२ भाग लाल असे होतात. यातील निळा व पिवळा यांच्या प्राधान्यामुळे हिरवा रंग येतो व लालसर रंग त्यात मिसळल्यामुळे राखाडी उदासीन छटा येते.

वरील दिलेल्या वर्गिकरणात काही परिचित रंग नेहमी उपयोगात आणल्या जाणाऱ्या रंगाची नांवे दिसून येत नाहीत. उदा. गुलाबी, तंपकिरी, लव्हेंडर इत्यादी. परंतु हे वेगळे रंग नसून वरील रंगांच्याच वेगवेगळ्या छटांना ही नावे दिलेली आहेत. लालच्या फिक्कट छटेलाच गुलाबी म्हणतात. वरिल रंगात पांढरा किंवा त्याच रंगाचे रंगद्रव्य जास्त मिसळून वेगवेगळ्या छटा बनविता येतात. जर का मुळचा रंग सोडून वेगळाच रंग तयार करावयाचा असेल तर रंगचक्रावरील जवळजवळचे रंग मिसळून तो रंग तयार करता येतो.

**उदासीन रंग :** काही रंग व त्यांचे पूरक रंग ऐकमेकात मिसळले तर ते एकमेकांना निष्क्रिय करतात. त्यामुळे त्यांचे विशिष्ट रंग नप्रमाणात रंगाचे विभाजन केल्यास राहीसे होऊन उदासीन रंग तयार होतो.

**प्रँग रंग योजनेप्रमाणे रंगचक्र :** तीन प्रथम श्रेणीचे, तीन द्वितीय श्रेणीचे व सहा माध्यमिक श्रेणीचे असे बारा रंग मिळून रंगचक्र तयार केले जाते. तसेच त्याच्या आत तीन तृतीय श्रेणीचे व तीन चतुर्थ श्रेणींचे असे सहा रंग मिळून आणखी एक चक्र तयार होते व या सर्वांच्या आत ह्या रंगाच्या मिश्रणाने होणारा उदासीन रंग येतो. अशा रीतीने एकंदर एकोणीस रंगाचे रंगचक्र तयार होते.

**उष्ण व शीत रंग :** प्रँगच्या पद्धतीत दिलेल्या रंगचक्रात जर पिवळा रंग वरच्या बाजूला ठेवला तर जांभळा रंग बरोबर त्याच्या समोर येईल. ह्या दोन रंगाना जोडणारी सरळ

रेषा काढली तर चक्रावरील रंगाचे दोन गट तयार होतील. त्यातील उजव्या बाजूचे म्हणजे निळया रंगाच्या बाजूचे रंग हे शीत रंग आणि डाव्या बाजूचे लाल व नारिंगी रंगाच्या जवळचे रंग उष्ण रंग होत. त्यात लाल व नारिंगी हे रंग सर्वात जास्त उष्ण व पुरोगामी समजले जातात आणि ते सर्वांत प्रामुख्यानी दिसून येतात.

निळसर जांभळा व निळा हे रंग सर्वात जास्त थंड रंग समजले जातात. हे प्रतिगामी (Receding) असतात. त्यामुळे ह्या रंगात वस्तू लहान किंवा दूरवर ठेवल्यासारख्या वाटतात. हे रंग खोलीच्या भिंतीला दिल्यास खोलीचा आकार मोठा वाटतो.

हिरवा रंग हा दोन्ही प्रकारच्या रंगाच्या मध्ये येतो. परंतु जर त्यात पिवळा रंग जास्त मिसळला तर तो उष्ण होतो व निळा मिसळला तर शीत होतो. उष्णरंगात संगती दिसून येते कारण ते एकमेकाशी संबंधित असतात तसेच शीत रंगातसुद्धा थोड्या प्रमाणात संगती दिसून येते.परंतु उष्ण रंग व शीत रंग हे एकमेकांना पूरक असतात. त्याच्यात संगतीपेक्षा विरोध जास्त असतो.

वेगवेगळ्या रंगाचा वेगवेगळा परिणाम मनावर होत असतो. प्राथमिक व द्वितीय श्रेणीतल्या रंगामुळे लवकर कंटाळवाणे होते. उष्ण रंग जास्त उत्साहवर्धक व आनंदीपणा दर्शवितात व शीत रंग शांत व आरामदायक वाटतात. परंतु जास्त उष्ण रंग खळबळजनक वाटतो व जास्त शीत रंगाचे प्रमाण असल्यास उदासीन वाटते.

उष्ण संवेदक पुरोगामी रंगामुळे वस्तूचा आकार मूळच्या आकारापेक्षा मोठा व वस्तू जवळ ठेवल्यासारखी वाटते आणि शीत रंगातील वस्तू दूर ठेवल्यासारखी व लहान दिसते.

## रंगयोजना

गृहसजावटीत रंगाचा उपयोग यशस्वी व समाधानकारक असणे अत्यंत महत्त्वाचे असते. रंगाचा उपयोग सर्वांनाच करणे जरूरीचे असते पण त्याचा उपयोग नीटपणे केला

गेला नाही तर् त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. रंगाबद्दल व्यकती तसेच संस्कृतीप्रमाणे वेगवेगळे व परस्पर विरोधी स्तर असतात. परंतु रंगाबद्दल दोन गोष्टी सर्वानुमते मान्य आहेत. त्यातले पहिले हे की रंग सुंदर असतात व दुसरे म्हणजे वस्तूचे किंवा जागेचे सौंदर्य वाढविण्यासाठी त्याचा उपयोग केलेला असतो.

प्रत्येक रंग हा सुंदर असतो, पण त्याचा उपयोग योग्य प्रमाणात व योग्य ठिकाणी केला तरच त्याचे सौंदर्य दिसून येते म्हणून गृहसजावट करताना रंग आणि त्यांच्या परिणामाबद्दल माहिती असणे अत्यंत जरूरीचे असते. काही लोक रंगाबद्दल माहिती नसतानासुद्धा रंगसंगती यशस्वीरीतीने करतात. परंतु त्याबद्दल त्यांना स्पष्टीकरण देता येत नाही किंवा परत कुठे रंगाचा उपयोग करावयाचा असल्यास आत्मविश्वास वाटत नाही.

रंग, रंगछटा व रंगाची तीव्रता यात बरीच विविधता असते हे आपण पाहिलेच आहे. त्या सर्व दृष्टीने रंगाचा उपयोग योग्य असेल तर तो डोळयांना सुंदर, समाधानकारक व चित्तवेधक वाटतो. परंतु अयोग्य असल्यास त्यांचा शारीरिक तसेच मानसिक परिणाम योग्य होत नाहीत. सर्वांनाच रंगाचा उपयोग योग्यरीतीने करता येतो असे नाही. त्यामुळे कलाकरांनी अभ्यास करून अनेक वर्ष यशस्वीपणे उपयोगात आणलेल्या रंगयोजनांचा उपयोग करणे योग्य असते. परंतु बऱ्याचवेळी यासुद्धा रंगयोजना अयशस्वी झालेल्या दिसतात. कारण रंगात, त्यांच्या तटस्थपणात, रंगछटेत, तीब्रतेत बरेच बदल केले जातात व या बदलामुळे त्यांचा परिणाम वेगळाच होतो. यासाठी रंगाबद्दल पूर्ण अभ्यास करून मग रंगयोजना अंमलात आणल्या तर त्या जास्त सुंदर व परिणामकारक होतात.रंगाचा अभ्यास करण्यासाठी रंगचक्राचा अभ्यास करून ज्याठिकाणी रंग वापरावयाचे असतील तेथे तेथे त्यांचा जाणिवपूर्वक उपयोग करावा. म्हणजे रंग, रंगछटा, त्यांची तीव्रता, तटस्थता यात योग्य बदल करून सौंदर्य व विविधता साधता येते.

रंगयोजना किंवा रंगसंगती मुख्यता दोन भागात वर्गिकृत केल्या जातात. त्यानंतर त्याचे आणखी उपप्रकार केले जातात.

# रंगयोजना

| संबंधित रंगयोजना | | | | | विरोधी रंगयोजना |
|---|---|---|---|---|---|
| एकरंगीय योजना | समीप रंगयोजा | पूरक रंगयोजना | दुहेरी पूरक रंगयोजना | विभक्त पूरक रंगयोजना | तिरंगी नाविन्य रंगयोजना |
| तटस्थ | रंगयोजना | | | | |

**संबंधित रंग योजना :** अशा प्रकारच्या रंगयोजना रंगचक्रातील जवळजवळचे रंग वापरून साधता येतात. या योजनेतील रंगामध्ये एकप्रकारचे साम्य असल्यामुळे किंवा मूळरंग

एकच असल्यामुळे त्यांच्यात संबंध असल्याचा भास होतो व त्यामुळे एकतेची भावना निर्माण होते. एकाच रंगाच्या वेगवेगळ्या रंगछटा वापरून या रंगायोजनामध्ये विविधता व आकर्षकता निर्माण करता येते. यामुळे त्यात तोचतोपणा न वाटता रंगयोजना परिणामकारक होते.या रंगयोजना डोळ्याला नेहमी शांत वाटतात.

**(१) एकरंगीय योजना :** ह्या प्रकारची रंगयोजना रंगचक्रावरील एकाच रंगाच्या वेगवेगळ्या छटा घेऊन करता येते. उदा., पिवळा रंग घेतल्यास, राखाडी पिवळा व राखाडी हे दोन रंग त्याबरोबर घेऊन रंगयोजना करता येते. यात रंगचक्रावरील बाहेरच्या वर्तुळातील प्राथमिक किंवा द्वितीय श्रेणीतील एकरंग घेऊन आतील वर्तुळातील त्याच रंगाची राखाडी एकरंगीय योजना समीप रंगयोजना छटा व राखाडी रंगाचा उपयोग करावा. अशाप्रकारच्या रंगसंगतीत तोचतोपणा येऊ नये म्हणून त्या रंगाच्या वेगवेगळ्या छटा वापराव्यात, परंतु रंगनाम बदलू नये. रंगसंगतीत विविधता व आकर्षकता आणण्यासाठी तटस्थ रंगाचा वापर किंवा मधूनच थोड्या जागेसाठी गडद रंग वापरावा किंवा पोतमध्ये फरक करावा.

**(२) समीप रंगयोजना :** या रंगयोजनेत रंगचक्रावरच्या बाहेरच्या वर्तुळातील जवळजवळचे रंग वापरले जातात. साधारणपणे त्यात एक प्राथमिक, एक द्वितीय व एक

तृतीय श्रेणीतील असे तीन रंग वापरलेले असतात. या तीनपैकी एका रंगाचा वापर जास्त प्रमाणात केलेला असतो. तसेच या तीनही रंगात एकरंग मुख्य असतो, त्यामुळे हे रंग एकमेकांचे विरोधी न भासता त्यांच्यात निकटचे संबंध असल्याचे दिसून येते. उदा., पिवळा, पिवळसर हिरवा आणि हिरवा. हे तीन रंग वापरून समीप रंगयोजना करता येईल. या तीनही रंगात पिवळा हा प्राथमिक रंग असतो.

**विरोधी रंगयोजना :** रंगचक्रावरील दूरदूरच्या रंगाचा उपयोग करून याप्रकारच्या रंगयोजना साधता येतात. या रंगयोजनामध्ये जास्त विविधता असते. वेगवेगळ्या पार्श्वभूमीवर रंगाचा परिणाम वेगळाच दिसतो. विरोधी रंग एकमेकांजवळ असल्यास उठावदार दिसतात. विरोधी रंगयोजनेत रंगाचा योग्य समन्वय साधण्यास कल्पकता व कौशल्याची आवश्यकता असते. योग्य रंगसंगती साधल्यास ती फारच परिणामकारक व आकर्षक दिसते. त्यात उष्ण व थंड रंगामध्ये समन्वय साधल्यामुळे या रंगयोजना डोळयाला त्रासदायक वाटत नाही. तसेच तोचतोपणा असण्याची शक्यता पण फार कमी असते. यात रंगाच्या गडद छटा जास्त प्रमाणात वापरल्यास डोळ्याला भगभगीत वाटतात. व रंगसंगती आकर्षक वाटत नाही. म्हणून परस्परविरोधी रंगाच्या फिकट रंगछटा जास्त क्षेत्रासाठी व नाविन्य निर्माण करण्यासाठी लहान वस्तूना गडद रंग वापरावे. या रंगयोजना पाच प्रकाराने करता येतात.

**(१) पुरक रंगयोजना :** या रंगयोजनेत रंगचक्रावरील समोरासमोरचे रंग वापरून रंगसंगती साधली जाते. हे रंग एकमेकांचे पूरक असतात.उदा., पिवळा, जांभळा, लाल, हिरवा इत्यादी. दोन्ही रंगाचा योग्य प्रमाणात उपयोग केल्यास रंगयोजना परिणामकारक होते.

**(२) दुहेरी पूरक रंगयोजना :** रंगचक्रातील जवळजवळचे दोन रंग व त्यांचे पूरक रंग यांचा उपयोग करून याप्रकारची रंगयोजना केली जाते. यात चार रंगाचा उपयोग केला असल्यामुळे रंगाचा योग्य उपयोग करणे फार महत्त्वाचे असते. सर्व रंग समप्रमाणात वापरले तर ती रंगयोजना उठावदार व परिणामकारक वाटणार नाही. जास्त क्षेत्रासाठी एकच रंग

वापरावा. त्याची रंगछटा व रंगकांती. मंद असावी म्हणजे रंगयोजना भगभगीत वाटणार नाही. या रंगाचा पूरक रंग थोडा तेजस्वी असावा. यांचा उपयोग पहिल्या रंगापेक्षा थोड्या कमी प्रमाणात करावा. तिसरा रंग मूळ रंगापेक्षा तटस्थ असावा व फार थोड्या क्षेत्रासाठी त्याचा उपयोग करावा. चवथा रंग तेजस्वी असावा व या सर्व रंगाना उठाव देण्यासाठी थोड्या प्रमाणात व मधूनमधून त्याचा उपयोग करावा.

**(३) विभक्त पूरक योजना :** प्रथम श्रेणीच्या किंवा माध्यमिक रंग व त्याच्या पूरक रंगाच्या आजूबाजूचे दोन रंग अशा तीन रंगाच्या उपयोगानी ही रंगयोजना करता येते. यात पूरक रंग दोन रंगात विभक्त केला जातो व या विभक्त झालेल्या रंगाचा रंगयोजनेत उपयोग केला जातो. उदा., पिवळा हा प्राथमिक श्रेणीतील रंग घेतल्यास त्याचा पूरक रंग जांभळा हा न घेता लालसर जांभळा व निळसर जांभळा हे रंग वापरतात. त्यांच्या मिश्रणाने जांभळा रंग तयार होतो. ही रंगयोजना करताना एक गोष्ट लक्षात ठेवावी लागते, ती म्हणजे यात प्रथम किंवा माध्यमिक रंगापासूनच सुरुवात करावी लागते. कारण द्वितीय श्रेणीतील रंग प्रथम घेतल्यास त्याचा पूरक रंग प्रथम श्रेणीतील होतो व प्रथम श्रेणीतील रंग विभाजित होऊ शकत नाहीत. कारण त्यात एकच रंग असतो. उदा., हिरवा म्हणजे मुख्य रंग घेतल्यास त्याचा पूरक रंग लाल येतो व याच्या आजूबाजूचे रंग म्हणजे लालसर जांभळा व लालसर नारंगी हे होत, परंतु ह्या दोन रंगाच्या मिश्रणाने लाल रंग तयार होत नाही. विभक्त पूरक योजनेत मुख्यतः दोन साधारण सारख्या रंगाचा वापर करून एक विरोधी रंग त्यात नाविन्य आणण्यासाठी वापरलेला असतो.

**(४) तिरंगी रंगयोजना :** रंगचक्रातच तयार होणाऱ्या समभूज त्रिकोणाच्या तीन कोन बिंदूवर येणाऱ्या रंगाच्या मदतीने केलेल्या रंगयोजनेस तिरंगी योजना असे म्हणतात. यात प्राथमिक तिरंगी योजना तीन प्राथमिक रंगापासून, द्वितीय तिरंगी योजनामधील तीन द्वितीय श्रेणीतील रंगापासून व दोन तिरंगी योजना तीन तीन माध्यमिक श्रेणीतील रंगापासून तयार करता येते. उदा., पिवळा, निळा व लाल ही प्राथमिक रंगापासून तयार होणारी रंगयोजना होईल तर नारंगी, जांभळा व हिरवा ही द्वितीय श्रेणीतील रंगापासून तयार होणारी तिरंगी रंग

योजना होईल. तसेच लालसर जांभळा, पिवळसर नारिंगी व निळसर हिरव्या रंगामुळे एक व लालसर नारिंगी, निळसर जांभळ्या व पिवळसर हिरव्या रंगाच्या मदतीने दुसरी अशा दोन तिरंगी योजना माध्यमिक रंगाच्या मदतीने करता येतील.

**(५) तटस्थ नाविन्य रंगयोजना :** या रंगयोजनेत तटस्थ रंगाचा वापर जास्त असून त्यात नाविण्य निर्माण करण्यासाठी रंगचक्रातील बाहेरच्या वर्तुळातील एक रंग वापरलेला असतो. ह्या रंगाची छटा फिक्कट न ठेवता गडद ठेवावी तसेच रंगकांतीसुद्धा तेजस्वीअसावी, म्हणजे रंग योजनेत तटस्थ रंगामुळे निर्माण होणाऱ्या तोचतोपणात नाविन्यपूर्णता येईल. तटस्थ रंग म्हणजे फक्त राखाडी न घेता त्यात दुसऱ्या रंगाची थोडीशी झाक ठेवता येते. उदा., तटस्थ हिरवा, तटस्थ निळा इत्यादी व यात नाविन्य निर्माण करण्यासाठी तेजस्वी लाल किंवा गडद नारिंगी रंग वापरता येईल.

गृहसजावटीत सर्वात जास्त उठाव रंगसंगतीमुळे येतो. त्यामुळे रंगाचा योग्य वापर करणे आवश्यक असते. यासाठी जो रंग सर्वात जास्त प्रमाणात म्हणजे साधारणपणे ६०% ते ६५% जागा व्यापतो तो रंग तटस्थ, फिक्कट रंगछटेचा किंवा थोड्या कमी रंगकांतीचा वापरावा. दुसरा रंग थोडा गडद किंवा थोड्या तेजस्वी रंगकांतीचा असावा. हा रंग साधारणपणे २५-३० % जागा व्यापतो व तिसरा रंग जास्त गडद किंवा तेजस्वी रंगकांतीचा असावा. परंतु तो फक्त मधून मधून नाविण्य निर्माण करण्यासाठी वापरावा. या प्रमाणात रंगाचे विभाजन केल्यास रंगसंगती प्रमाणबद्ध व परिणामकारक वाटते व गृहसजावट उठावदार वाटते.

## प्रकरण पाच

# पुष्परचना

## (Flower Arrangement)

## ५.१ पुष्परचना- इतिहास, उद्देश व परिभाषा

**प्रस्तावना-**

पुष्परचना ही प्राचीन कला आहे. गृहसजावटीमध्ये पुष्परचनेला अत्यंत महत्त्व आहे कारण पुष्परचनेचा प्रमुख उद्देश वातावरणातील सजीवता, प्रसन्नता आणि सुंदरता यात वृद्धी करणे हा आहे. फुले जात्याच सुंदर असतात. ती सर्वांना मोहित करतात. कलावंतांच्या प्रतिभेला फुलविण्याचे कामही फुले करीत असतात. त्यातूनच प्राचीन काळापासून मोहक फुलांपासून सुंदर कलाकृती निर्माण करण्याची कला व्यक्तीने विकसित केलेली दिसते. आपापल्या जीवनपद्धतीप्रमाणे, संस्कृतीच्या प्रभावाप्रमाणे व्यक्तींनी फुलांच्या कलात्मक रचना करण्यास प्रारंभ केल्याचे आढळून येते. घरातील दिवाणखाना, जेवणघर, शयनकक्ष, कितीही सुंदर किमती वस्तूंनी सजवा, नटवा पण थोड्याशा ताज्या टवटवीत फुलांनी येणारी शोभा काही आगळीच आहे. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या फुलापानांचा उपयोग करून आकर्षक, नाविन्यपूर्ण रचना करून घराचे सौंदर्य वाढविता येते. तसेच वातावरणात जीवंतपणा आणता येतो.

**इतिहास :-** पुष्परचनेच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता असे लक्षात येते की सहाव्या शताब्दीमध्ये ती अस्तित्वात होती. त्याकाळी चीनमधील बौद्धसाधू आपल्या शिष्यांना मठामध्ये फुलापानांना सजविण्याचे शिक्षण देत असत तर जपानमध्ये या कलेचा विकास शाळांमधून केलेला दिसून येतो. त्यामुळे जपानमध्ये ही कला खूपच विकसित झाली. १५ व्या शतकात जपानमध्ये पुष्परचनांचा पद्धतशीर अभ्यास सुरू झाला. शोभेच्या आणि पुजेच्या अशा दोन पद्धती तेथे आढळतात. पुजारी देवळात उंच फुलदाणीत उभ्या रचना करीत त्यांना 'टाटेबाना' म्हणत व कालांतराने त्यांना रिक्का' हे नाव प्राप्त झाले. रेखीवपणा हे जपानी पुष्परचनेचे वैशिष्ट्य आहे. सोफू जे शिगाहारा (Sofu Jeshigahara) हे जगप्रसिद्ध थोर आणि कर्तबगार कलावंत जपानमधील पुष्परचनेच्या शिक्षणक्रमाचे निर्मति आहेत. १९२६ मध्ये "सोगेत्सु" या शिक्षणसंस्थेची स्थापना झाली. पुष्परचेनमुळे शोभा वाढते हा एकच उद्देश नसतो. जपानमध्ये रचना या सांकेतिक आणि संदेशवाहक असतात. या सांकेतिक योजनांमुळे रचनेस विशिष्ट अर्थ निर्माण होत असे. जपानमध्ये जुन्या अभ्यासक्रमात या गोष्टींना प्राधान्य असे.

पुष्परचनेमुळे मनाचा उत्साह वाढतो, क्रियाशीलता वाढते. व्यक्ती - आपले दुःख काही काळ विसरतो तसेच थकलेल्या शरीराला व मनाला थोडा दिलासा मिळतो. घरातील वातावरण प्रसन्न होते. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत बदल होतो. शीतल, मंद, सुगंध मन प्रसन्न करतो.

ही कला महागडी आहे असा समज आहे. पण हा चुकीचा भ्रम आहे. पुष्परचना करण्याकरिता लागणारे साहित्य स्वस्त व सहज उपलब्ध होणारे आहे. परंतु त्याकरति विशिष्ट दृष्टीची गरज असते. केवळ महाग साहित्यातूनच चांगली पुष्परचना करता येते असे नाही तर् बरेचदा आपल्या जवळ उपलब्ध साहित्याचाही उपयोग पुष्परचनेमध्ये करून रचना नाविण्यपूर्ण बनविली जाऊ शकते. तसेच सहज उपलब्ध अशा पाने फुले तरु यांचा उपयोग करून सुंदर आकर्षक पुष्परचना करता येते. या कलेची आवड प्रत्येक गृहिणीने

स्वतःमध्ये तसेच आपल्या मुलांमध्ये लहान वयातच निर्माण करावी. कारण यामुळे निर्मितीचा आनंद व समाधान प्राप्त होते.

**व्याख्या (Definition)**

**अना हॉग रट** यांच्या मते – "फुले इतर झाडे, साहित्य आणि पुष्पपत्र यांचा रंग, पोत व आकार यांच्यात संतुलन निर्माण करून संघटित केलेली रचना म्हणजे पुष्परचना होय. वातावरणात उत्साह, चैतन्य व सौंदर्य वृद्धी करणे हा पुष्परचनेचा उद्देश होय."

"Flower arrangement may be defined as the art of organizing flowers, other palnts, materials and receptacles into composition having harmony of form, texture and colour. Its purpose is to add cheer, life and beauty to surroundings."

**त्रिवेणी फरकाडे आणि सुलभा गोंगे** यांच्या मते, एखाद्या कल्पनेची कौशल्याच्या सहाय्याने अनुरूप फुला-पानांच्या माध्यमातून आनंद निर्मितीसाठी पुष्पपात्रात साकारलेली कलाकृती म्हणजे पुष्परचना होय.

## ५.२ मानवी जीवनात पुष्परचनेचे महत्त्व

आजकालच्या धावपळीच्या जीवनामध्ये बाहेरून थकून आल्यानंतर घरात प्रवेश करतात. आकर्षक पुष्परचना दिसली की मनुष्य थकवा विसरतो आणि नवीन चैतन्यमय वातावरण निर्मिती होते. म्हणून पुष्परचनेला मानवी जीवनामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. सुंदरता आणि आनंद ह्या पुष्परचनेच्या दोन्ही बाजू आहेत. आपल्या संस्कृतीमध्ये आदर व्यक्त करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून फुलांना महत्त्वाचे स्थान आहे. व्हॅलेंटाईन डे ला तर फुलांचया विक्रीचा उच्चांक गाठला जातो. म्हणून फुलांचा आपल्या मनावर सकारात्मक परिणाम होतो. गृहिणी कल्पना शक्तीचा उपयोग सुंदर पुष्परचना करण्यात करू शकते. तिच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळतो, क्रियाशीलता वाढते. नैतिक दृष्टीकोनातून

फुलांना महत्त्व आहे. जीवनाची वास्तविकता समजून सांगण्यात फुलांचे मोठे योगदान आहे. कळी-फुल- नंतर कोमेजणे याच अवस्थेतून मनुष्य जीवन जगत असतो. सुख-दुःखाच्या वेळेस आपण फुलांचा वापर करतो. फुले समर्पणाची साक्ष देत असतात.

## ५.३ पुष्परचनेकरिता आवश्यक साहित्य

सुंदर, आकर्षक व नाविण्यपूर्ण पुष्परचना करण्याकरिता काही साधनसामुग्री आवश्यक असते. ती पुढीलप्रमाणे.

1) पाने

२) फुले

3) पुष्पपांत्र

4) पीन होल्डर

५) इतर साधने / उपसाधने

**(1) पाने -** हिरवीगार गडद रंगाची पाने पाहिली की, मनामध्ये प्रसन्नता निर्माण होते. पुष्परचनेमध्ये फुलांबरोबर पाने, छोट्या डहाळया, फळे आदींचीदेखील आकर्षक मांडणी केली जाते. पुष्परचनेत या सर्वांचे रंग, आकारमान, पोत इ. घटक लक्षात घेऊन त्यातून प्रसन्नकारक आकृतिबंध साधले जातात. पानांमुळे पुष्परनचेचे सौंदर्य वाढते. विशिष्ट प्रकारच्या पानांचा निवडीमुळे पुष्परचनेला विशिष्ट आकार देता येतो. उदा. लांबट व निमुळत्या पानांचा उपयोग उभट पुष्परचनेत तर रूद व गोलाकार पानांचा उपयोग पसरट व पंख्यांच्या आकाराच्या पुष्परचेनकरिता केला जातो. नाजूक फुलांबरोबर नाजूक व बारीक पानांची निवड करावी. जाडसर पाने पिनहोल्डरमध्ये सरळ उभी लावता येतात.

**(2) फुले -** फुले ही निसर्गाने मानवाला दिलेली एक अमोल देणगी आहे. म्हणून सर्वजण फुलांवर प्रेम करतात. निसर्गाने फुलांपासून आपल्याला नैसर्गिक सौंदर्याचा शुद्ध,

आनंद मिळत असतो. त्यांच्या विविध रंगछटा, मुलायमपोत, मधुर सुगंध आणि त्यांचे मनमोहक दृश्य पाहून आपण सर्वच सुखी होत असतो.

सर्वसाधारणपणे सर्व झाडाझुडुपांचे त्यांच्या नैसर्गिकरित्या वाढण्याच्या पद्धतीवरून वर्गीकरण करता येते व त्याला अनुसरून रचनेकरिता फुलांची निवड करताना त्या त्या गटातील फुलापानांची निवड केल्यास पुष्परचना अधिक वास्तववादी बनतात. काही झाडे व फुलांची देठे सरळ उभी वाढतात. उदा. - निशीगंध, करदळ, गवतांचे प्रकार, बांबू. अशा झाडांचा व फुलांचा उपयोग उंच प्रकारच्या पुष्परचनेकरिता योग्य ठरतो. तर काही झाडे गर्दीने व झुडुपांप्रमाणे वाढतात त्यांचा उपयोग गोलाकार, त्रिकोणी, अर्धचंद्राकृती पुष्परचनेकरिता केल्यास त्या अधिक शोभून दिसतात. तसेच विविध प्रकारच्या वेली त्या कशाच्यातरी आधाराने वाढत असतात त्यांचा उपयोग झुलत्या किंवा लोंबत्या पुष्परचनेत करता येतो. थोडक्यात म्हणजे कोणत्याही पुष्परचनेत फुलापानांची नैसर्गिक वळणे कायम ठेवण्याचा प्रयत्न करावा. पुष्परचनेचे सौंदर्य हे फुलांचा ताजेपणा व टवटवीतपणा यावर अवलंबून असते. म्हणून त्याकडे विशेषत्वाने लक्ष देणे अत्यंत आवश्यक असते अन्यथा ती लवकर कोमेजतात व ती पुष्परचना सौंदर्यहीन बनते. म्हणून पुष्परचनेकरिता निवडलेली फुले दीर्घकाळ ताजी राहण्याकरिता पुढील काळजी घ्यावी.

1) फुले तोडल्यानंतर बऱ्याच वेळानंतर रचना करावयाची असल्यास ती थंड ठिकाणी पाणी शिंपून किंवा पसरट बादलीतील पाण्यात ठेवावीत.
2) फुलांवर सूर्यप्रकाश पडू देऊ नये तसेच तयार केलेली पुष्परचना देखील गरम झळा लागतील अशा ठिकाणी ठेवू नये त्यामुळे फुले लवकर सुकतात.
3) फुले सूर्योदयाच्यावेळी व सूर्यास्तापूर्वी तोडावीत. म्हणजेच थंड वेळी तोडवीत. फुले हाताने ओढून तोडण्याऐवजी धारदार कात्रीचा उपयोग करावा तसेच देठ तिरपे कापावे व ताबडतोब पाण्यात घालून ठेवावे म्हणजे त्यांच्या देठातील रस वाळत नाही. तिरपे कापल्यामुळे फांद्याला पाणी शोषून घेण्याकरिता अधिक जागा मिळते व फुले दीर्घकाळ ताजी राहतात.

4) फुले तोडताना फुलांची देठे लांब कापावीत म्हणजे प्रत्यक्ष रचना करताना त्यांना हव्या त्या आकारात कापता येते.

5) फुले अर्धवट उमललेली निवडावीत म्हणजे ती अधिंक काळ टिकतात. पूर्ण उमलून शिळी झालेली फुले लवकर कोमेजतात.

6) फुले तोडतांना पुष्परचनेच्या मागणीनुसारच तोडावी. म्हणजेच जास्त फुले तोडून वाया जाणार नाही तसेच रचनेच्या गरजेनुसार फुले निवडावीत कारण विविध प्रकारच्या पुष्परचनांकरिता निरनिराळ्या प्रकारच्या फुलांची गरज असते. म्हणून फुले तोडण्यापूर्वी पुष्परचनेचा आकार निश्चित करावा.

7) पुष्पपात्रातील पाण्यात किंचित प्रमाणात साखर किंवा मीठ किंवा कोळसा टाकल्यास फुले अधिक काळ ताजी राहतात.

**(३) पुष्पपात्र-** पुष्पकलेमध्ये पुष्पपात्राला महत्त्वाचे स्थान आहे. पुष्पपात्राशिवाय पुष्परचना करणे अशक्य आहे. जागेनुसार व रचनेनुसार योग्य आकाराचे असावे .पानाफुलांचे साहित्य जमविण्यापूर्वी पुष्पपात्राची लांबी, रूंदी तसेच त्यांचा घाट याची नीट पाहणी करणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण करावयाची पुष्परचना फुलदाणीच्या घाटावर तसेच तिच्या लांबी, रूंदी व खोलीवर अवलंबून असते. पुष्पपात्राच्या आकारावरून पुष्परचना करण्यासाठी कोणते आणि किती पानाफुलांचे साहित्य जमवावे याची! कल्पना येऊ शकते. भारतातील तांब्या पितळेची पुष्पपात्रे, युरोपमधील चिनीमातीची, काचेची व चांदीची पुष्पपात्रे आणि नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क इ. देशातील स्टेनलेस स्टीलची तसेच मांतीची पुष्पपात्रे उल्लेखनीय आहेत. पुष्परचनेचे स्वरूप व सौंदर्य पुष्पपात्रांवर अवलंबून असते. विविध माध्यमांतील आणि आकार प्रकारांतील पुष्पपात्रे आणि त्यातून मांडलेली फुले यांच्यात संगती राखली की पुष्परचना वेधक बनते. पुष्परचनेच्या प्रकारानुसार पुष्पत्राची निवड करावी

**पुष्पपात्राचे आकार -** आजकाल विविध आकारात पुष्पपात्रे बाजारात विकत मिळतात. तसेच घरातील विविध वस्तूंचादेखील पुष्पपात्र म्हणून उपयोग करता येतो. पुष्पपात्रांच्या आकारावरून त्यांचे प्रमुख दोन प्रकार पडतात. १) उभट आकाराची पुष्पपात्रे आणि २) पसरट आकाराची पुष्पपात्रे.

**(१) उभट आकाराची पुष्पपात्रे -**

उभट आकाराची सुंदर पुष्पपात्र बाजारामध्ये विकत मिळतात. उभट पुष्पपात्र म्हणून बरेचदा घरातील सुंदर आकाराच्या काचेच्या बाटल्या, पेले, चिनीमातीच्या बरण्या, पोकळ बांबू रंगवून तसेच मातीची उभट भांडी, सुरई यांचाही उपयोग करता येतो.

**(२) पसरट आकाराची पुष्पपात्रे** –

पसरट आकराचे पुष्पपात्र हे चिनीमातीचे, लाकडाचे, धातुचे असते. ही पुष्पपात्रे बाजारात विकत मिळतात. ही चपटी, पसरट, गोल, अंडाकृती, आयताकार, चौकोनी असतात. दिसायला अतिशय आकर्षक असतात. यामध्ये पुष्परचना करताना पीनहोल्डरचा वापर करणे आवश्यक असते. पुष्पपात्रे ही कुठल्याही आकाराची असलीत तरी त्यात पुरेसे पाणी राहील अशी जागा. असावी म्हणजे त्यातील फुले/पाने दीर्घकाळ टवटवीत राहतील. आज अनेक आकारांची पुष्पपात्रे बाजारात विकत मिळतात. परंतु पुष्परचना कोणती व कुठे करावयाची यावर पुष्पपात्राचा आकार अवलंबून राहील.

**पुष्पपात्रांचे रंग**

पुष्पपात्राचे वेगवेगळे रंग आपल्याला पहायला मिळतात. साधारणपणे फिक्का निला, हिरवा, पांढरा, काळा, पिवळा, लाकडी, तपकिरी हे रंग पुष्पपात्रांकरिता खुलून दिसतात. गडद किंवा चकाकणारी पुष्पपात्रे निवडू नये कारण त्यामुळे पाहणाऱ्यांचे लक्ष पुष्पपात्राकडे आकर्षित होते व पुष्परचनेकडे दुर्लक्ष होते.

वरील सर्व बाबींचा विचार करून पुष्पपात्राची निवड करावी. तसेच एका पुष्पपात्रात अनेक प्रकारच्या पुष्परचना करता येणे शक्य असाव्यात.

**(४) पिनहोल्डर -** पुष्परचनेला पिनहोल्डरमुळे भक्कम आधार मिळतो. उथळ पुष्पपात्राकरिता पिनहोल्डर लागतात. त्यामुहे फुले, पाने, ताठ राहण्यास मदत होते. लोखंडी आणि पितळी अशा दोन धातुंमध्ये पिनहोल्डर बाजारामध्ये उपलब्ध असतात. पुष्परचना

करताना निश्चित केलेल्या आकारात फुले, पाने, फांद्या रहाव्यात याकरिता पिनहोल्डरची आवश्यकता असते. ही जड असून लहान मोठ्या विविध आकारांमध्ये मिळतात. जसे गोल, चौकोनी, त्रिकोणी, अंडाकृती इ. पुष्पपात्राच्या आकारानुसार व फुलापानांच्या वजनानुसार पिनहोल्डरची निवड करावी. बरेचदा एका पुष्परचनेत एका पेक्षा अधिक पिनहोल्डरचा वापर करतात. पिनहोल्डर्स लोखंड किंवा पितळ अशा जड धातूंचे बनलेले असते. धातूच्याजड पृष्ठभागावर तीक्ष्ण टोके असलेले खिळे जवळजवळ बसविलेले असतात. या खिळयांमधील जागेत फांद्या घट्ट बसवितात त्यामुळे पुष्परचना स्थिर राहते. फांदी कधीही पिनच्या अणुकूचीदार टोकांमध्ये टोचू नये. कारण त्यामुळे फुलापानांच्या फांद्यांना इजा पोहोचून ती लवकर खराब होतात.

**(५) इतर साधने / उपसाधने -** वरील साधनांव्यतिरिक्त पुष्परचना करताना इतर काही साधनेदेखील आवश्यक असतात. ती पुढीलप्रमाणे

**अ) कात्री -** धारदार कात्रीची पुष्परचनेकरिता आवश्यकता असते. धारदार कात्रीमुळे फांद्या, फुले व्यवस्थित कापता येतात.

**ब) फ्लोरिस्ट टेप** - बरेचदा फुलापानांच्या फांद्यांची उंची वाढविण्यासाठी आवश्यकता असते. अशावेळी एका फांदीला दुसरी फांदी बांधून ती झाकण्याकरिता फ्लोरिस्ट टेपचा उपयोग करतात.

**क) तार -** पोकळ फांद्या असलेली फुले उपयोगात आणताना ती ताठ उभी राहावीत म्हणून तारेचा उपयोग केला जातो. परंतु तिचा उपयोग करताना फांदीला किंवा फुलाला इजा होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक ठरते.

**ड) काटे, टूथपीक, टाचण्या -** मोठी तसेच जड फुले ताठ राहण्याकररिता बाभळीचे काटे, टूथपीक किंवा टाचण्यांचा वापर करतात.

- **उपसाधने -** पुष्परचना करताना उपसाधने मिळून खालील गोष्टींचा वापर करता येतो. ज्या साधनांच्या सहाय्याने आपण पुश्परचनेच्या सौंदर्यामध्ये भर टाकतो त्याला पुष्परचनेची उपसाधने असे म्हणतात. उदा. शंख, शिंपले, पिसे, रंगीत दगड, रंगीत काचेचे कंचे, काचेचे तुकडे, वाळू, कृत्रिम पक्षी, लहान मूर्ती, मेणबत्त्या, गारगोट्या, लाकडाचे ठोकळे, चमकदार धातूचे पत्रे इत्यादी. पुष्परचनेत उपयोगात आणले जाणारे कोणतेही उपसाधन हे कलात्मक व सुंदर असावे तसेच त्यात पुष्परचनेला अनुरूप असा भाव असावा. अनावश्यक उपसाधनांचा उपयोग टाळावा. उपसाधने ही पुष्परचनेला पुरक ठरणारी असावीत तरच ती पुष्परचना उठून दिसते.

## ५.४ पुष्परचना करताना लक्षात ठेवावयाच्या बाबी

## (Factors to be considered while arranging flowers)

पुष्परचना करताना काही महत्त्वपूर्ण बाबी लक्षात घेणे आवश्यक असतात. त्या पुढीलप्रमाणे.

**(१) पुष्परचनेची जागा -** घरामध्ये पुष्परचना कोणत्या ठिकाणी ठेवावयाची ती जागा निश्चित करावी. म्हणजे त्यानुसार पुष्परचनेचा आकार ठरविणे शक्य होते. उदा. खोलीत एका कोपऱ्यात पुष्परचना करावयाची असेल तर ती उंच, उभट आकाराची तसेच पंख्याच्या आकाराची करता येईल. पंख्याच्या आकाराच्या पुष्परचनेत मागील बाजूने फुले लावण्याची गरज नसते. याउलट बैठकीच्या खोलीत मध्यवर्ती टेबलवर पुष्परचना करताना ती सर्व बाजूंनी चांगली दिसेल अशी असावी. तसेच समोरासमोर बसलेल्या व्यक्तींना बोलताना तिचा अडथळा होऊ नये म्हणून ती कमी उंचीची असावी. उदा. गोलाकार, अर्धचंद्राकृती. तसेच जेवणाच्या टेबलवर करावयाची पुष्परचना बसकी व पसरट असावी.

खोलीत प्रवेश करताच पुष्परचना दृष्टीस पडेल अशा ठिकाणी असावी ती फार उंचावर असू नये.

**(२) पुष्परचनेचा आकार -** पुष्परचनेचे विविध आकार आहेत. त्यामध्ये त्रिकोणी, गोलाकार, अर्धचंद्रकार आणि उभट इत्यादी प्रकारे पुष्परचनेला आकार देता येतो.

तसेच मोठ्या टेबलवर मोठी व लहान टेबलवर लहान पुष्परचना योग्य दिसते. मोठ्या खोलीतील कोपऱ्यात पुष्परचना करावयाची असेल तर मोठी व उंच पुष्परचना केल्यास कोपऱ्याची जागा भरीव दिसते व रचनेचा अडथळाही वाटत नाही. ऋतुनुसार उपलब्ध फुलापानांचा विचार करून पुष्परचनेचा आकार निश्चित करावा.

(३) पुष्परचनेची सौदर्यांनूभूती येण्याकरिता प्रकाशाच्या गरज असते. त्यामुळे कृत्रिम प्रकाश पुष्परचनेवर पडेल याची काळजी घ्यावी. त्यामुळे पुष्परचनेचे सौंदर्य खुलून दिसेल आणि खोलीत येणाऱ्या व्यक्तींचे लक्ष तिच्याकडे आकर्षिले जाईल. परंतु पुष्परचनेवर प्रत्यक्ष सूर्यप्रकाश किंवा गरम हवेच्या झळा येऊ देऊ नये. त्यामुळे पुष्परचनेतील फुले पाने लवकर सुकतील.

(४) उपलब्ध साधने व प्रचलित फॅशन यांचा विचार करून विविध वस्तूंचा उपयोग पुष्परचनेसाठी करण्याचा प्रयत्न करावा.

(५) पुष्परचनेकरिता फुलापानांची निवड करताना रंगसंगतीचा विचार केल्यास ती अधिक आकर्षक बनते. याकरिता गृहिणीने आपल्या सुप्त कल्पनाशक्तीचा भरपूर उपयोग करून घ्यावा. विविध कलाकारांच्या पुष्परचनांचे निरीक्षण करून नाविण्यपूर्ण पुष्परचना करण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे आपण काहीतरी रचनात्मक कार्य केल्याचे समाधान मिळेल.

**(६) पुष्पपात्राची निवड -** पुष्परचनेमध्ये पुष्पपात्राच्या निवडीला महत्त्वाचे स्थान आहे. फुलापानाचा प्रकार, आकार व संख्या लक्षात घेऊन पुष्पपात्राची निवड करावी. लांब देठांच्या फुलपानांचा उपयोग करून उंच पुष्परचना करावयाची असेल तर उंच पुष्पपात्र तर कमी उंचीच्या पुष्परचनेकरीता पसरट, कमी उंचीची पुष्पपात्र निवडावीत. आजकाल पिनहोल्डरच्या सहाय्याने पसरट पुष्पपात्रातदेखील उंच पुष्परचना करता येणे शक्य असते.

तसेच पुष्पपात्राची निवड करताना त्याचे रंग, त्यावरील कलाकुसर व त्यांचा चमकदारपणा या सर्वांचा विचार करावा. कारण पुष्पपात्र चमकदार रंगाचे व सुंदर, आकर्षक

कलाकुसरीचे असल्यास पाहणाऱ्याचे लक्ष पुष्परचनेऐवजी पुष्पपात्राकडेच वेधले जाईल. तसेच पुष्पपात्र सुंदर असल्यास त्यातील रचना त्यापेक्षा अधिक आकर्षक करण्याची जबाबदारी कलाकारावर येऊन पडेल.

पुष्पपात्र वजनाने जड असावे म्हणजे पुष्परचनेतील फुलापानांच्या वजनाने ते पडणार नाही. पुष्पपात्रातील दोष फुलापानांच्या रचनेच्या सहाय्याने झाकून टाकावेत.

## 5.5 पुष्परचना आणि कलेची तत्त्वे

## (Arts Principals in flower arrangement)

कोणत्याही कलेच्या तत्त्वांचा जाणीवपूर्वक उपयोग केल्यास ती कलाकृती निश्चितच दर्जेदार होते. पुष्परचना ही इतर ललित कलांप्रमाणेच आत्माविष्कारी कला आहे व म्हणून तिच्यात पुष्परचनाकाराच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब उमटले पाहिजे. असे असले तरी पुष्परचना करीत असताना कलेच्या तत्त्वांचा उपयोग केल्यास ती अधिक आकर्षक होते. बरेचदा कलेच्या या तत्त्वांचा उपयोग आपण सहजपणे करीतही असतो. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे-

**(१) संगती (Harmony) -** पुष्परचनेमध्ये उपयोगात आणलेले सर्व साहित्य हे परस्परांशी सुसंगत असेल तर तयार कलाकृतीही सुंदर, आकर्षक व नाविण्यपूर्ण होईल. पुष्परचनेतील सर्व वस्तू परस्परांना जुळणाऱ्या असल्या म्हणजे त्यांची निवड सुसंगत झाली असे म्हणता येईल.

पुष्परचनेमध्ये संगतीचा विचार करताना प्रामुख्याने रंगसंगती विचारात घ्यावी. त्याकरिता पार्श्वभूमी, पुष्पपात्र, फळे व इतर उपसाधने यांचे रंग विचारात घेतले जावेत. तसेच फुले नाजूक असतील तर लहान पुष्पपात्र अनुरूप वाटेल तर मोठ्या फुलांची रचना करताना मोठे चिनीमातीचे धातुचे अथवा लाकडाचे पुष्पपात्र योग्य वाटेल.

**(२) प्रमाण (Proportion) -** एखाद्या वस्तूच्या वेगवेगळ्या भागांमध्ये किंवा एका गटातील विविध वस्तूंमध्ये परस्परसंबंध प्रमाणशीर किंवा समाधानकारक असणे म्हणजे त्यातील प्रमाण हे तत्त्व योग्य रितीने साधले गेले आहे असे समजावे. ज्याप्रमाणे कोणतेही डिझाईन प्रमाणबद्ध व समतोल असेल तर ते उठून दिसते. त्याप्रमाणे पुष्परचनादेखील प्रमाणबद्ध असेल तर ती चांगली दिसते म्हणून पुष्परचना करताना प्रथम नियोजित आकार कागदावर काढल्यास पुष्पपात्राचा आकार व रचनेचा आकाः परस्परांना अनुरूप आहे किंवा नाही हे कळेल. मोठ्या पुष्पपात्रात मोठी पुष्परचना व लहान पुष्पपात्रात लहान पुष्परचना प्रमाणबद्ध वाटते. तसेच उंच पुष्पपात्रात उंच उभट पुष्परचना व पसरट पुष्पपात्रात समूहबद्ध गोल पुष्परचना चांगली दिसते. पुष्परचनेचा प्रत्येक भाग म्हणजेच फुले, पाने, दांड्या वगैरे सर्व एकमेकांशी प्रमाणशीर असावीत. .

**(३) संतुलन (Balance) -** एखाद्या विशिष्ट वस्तूला केंद्र समजून तिच्याभोवती इतर वस्तूंची मांडणी अशा तऱ्हेने करणे की त्याचा परिणाम आरामोत्पादक होईल व तेच म्हणजे संतुलन होय. संतुलन दोन प्रकारचे असते. (१) दोन्ही बाजूंनी सारखे दिसणारे आणि (२) दोन्ही बाजूंनी सारखे न दिसणारे तरीही संतुलन राखणारे.

पुष्परचना करतानादेखील तिच्यात संतुलन साधणे आवश्यक असते. त्याकरिता प्रथम कशाला प्राधान्य द्यावे हे निश्चित करून त्याला केंद्रबिंदू समजून त्याच्याभोवती फुलापानांची रचना करून वरील दोन्ही प्रकारांपैकी एक संतुलन साधण्याचा प्रयत्न करता येईल.

जेव्हा पुष्परचनेचे दोन्ही बाजूंकडील भाग एकसारख्या आकाराचे असतील तेव्हा सम संतुलन तर दोन्ही बाजूंचे भाग सारख्या आकाराचे नसूनही ते समतोल असतील तर ते विषम संतुलन समजावे. कोणत्याही प्रकारे संतुलन साधलेली पुष्पएचना अधिक आकर्षक दिसते.

**(४) लय (Rhythm) -** एका केंद्रावरून दुसऱ्या केंद्रावर नजर फिरत जावून पुन्हा पहिल्या केंद्रावर पुन्हा स्थिरावने याला लय म्हणतात. ही लय पुष्परचनेमध्ये रेषेच्या माध्यमातून साधल्या जाते. पुष्परचनेमध्ये लय या कलेच्या तत्त्वाला अत्यंत महत्त्व आहे. पुष्परचनेत येणाऱ्या रेषा आणि निरनिराळे आकार यांची मांडणी आल्हाददायक होते, त्यावेळी लयबद्धता निर्माण होते. एकाच दिशेने प्रवाहित होणाऱ्या रेषा आणि एकसारखे किंवा परस्परांना जुळणारे आकार जवळजवळ आल्यास आपली दृष्टी सुखवते. यालाच लयबद्धता म्हणतात. विशेषत: आधुनिक व जपानी पुष्परचनेत अशा प्रकारच्या रेषांना अधिकच महत्त्व प्राप्त झालेले दिसते. अशा रेषांच्या निर्मितीकरिता फांद्यांचा, वेलींचा उपयोग केला जातो.

**(५) प्राधान्य (Emphasis)** - पुष्परचना करत असताना सर्वप्रथम प्राध्यान्य कशाला द्यायचे हे निश्चित करावे. कोणत्याही कलाकृतीतील सर्वात महत्त्वाच्या वस्तूंकडे प्रथम व नंतर इतर वस्तूंकडे त्यांच्या महत्त्वाच्या क्रमानुसार लक्ष वेधणारे तत्त्व म्हणजे प्राधान्य होय.

पुष्परचनेमध्ये देखील एखादे आकर्षक फुल, पान, केंद्र समजून इतर पानाफुलांची रचना केल्यास पाहणाऱ्यांचे लक्ष आकर्षित करून घेण्यास मदत होते व या केंद्रबिंदूतून लयबद्ध हालचालींचे निदर्शन होते. केंद्रबिंदू, लय आणि पुनरावृत्ती यांच्यामुळे पुष्परचनेत एकसंघपणा निर्माण होतो.

## ५.6 पुष्परचनेचे प्रकार
## (Types of Flower Arrangement)

पुष्परचनेच्या अनेक प्रकारांपैकी काही प्रमुख व वैशिष्ट्यपूर्ण प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) परंपरागत पुष्परचना (Traditional Flower Arrangement)

२) जपानी पुष्परचना (Japanese Flower Arrangment)

३) आधुनिक पुष्परचना (Modern Flower Arrangment)

४) अल्पाकृती पुष्परचना (Miniature Flower Arrangment)

५) शुष्क पुष्परचना (Dry Flower Arrangement)

६) रेखाबद्ध पुष्परचना (Linewise Flower Arrangment)

७) समूहबद्ध पुष्परचना (Groupwise Flower Arrangment)

**(१) परंपरागत पुष्परचना** – परंपरागत पुष्परचनेमध्ये विशिष्ट आकाराची धातूची नक्षिदार पुष्पपात्रे अपेक्षित असते. तसेच दाटीवाटीने गुच्छात बसविलेली फुले यामध्ये अपेक्षित असते. या प्रकारात फुलेपाने व रचनेच्या तंत्रावर विशेष भर लेला असतो तर रचनाकाराच्या कल्पनेला गौण स्थान असते. पुष्पपात्र म्हणून केवळ पुष्पपात्रांचाच उपयोग केला जातो इतर कुठल्याही साधनांचा उपयोग पुष्पपात्र म्हणून करता येत नाही. गोल, सुरईच्या आकाराचे व धातुचे नक्षीकाम केलेले पुष्पपात्र अधिक उपयोगात आणली जातात. एकाच पुष्परचनेमध्ये अनेक प्रकारची बरीच फुले उपयोगात आणून पुष्परचना केली जाते. फुलांच्या तुलनेत पानांचा उपयोग कमी केला जातो. या रचनेत फुले लावताना समान संतुलनाचा विचार केला जातो. पूर्ण उमललेली टवटवीत फुले आणि त्यांच्या तजेलदार रंगसंगतीवर भर देणारी ही पद्धती आहे.

युरोपीय देशातील पारंपारिक पुष्परचना पुष्पपात्रात ठेवलेल्या गुच्छ (Mass Flower Arragnment) पद्धतीची होती.

वेगवेगळ्या रंगांची व आकाराची फुले विविध प्रकारच्या पुष्पपात्रांतून रचून ठेवण्याची पद्धत २० व्या शतकापर्यंत रूढ होती. परंतु पुढे जपानी पुष्परचनेच्या प्रभावाखाली ही पारंपारिक रचना बदलत गेली.

**(२) जपानी पुष्परचना** – ही जपानी पुष्परचना आहे. जपानी पुष्परचना ही झाडाच्या नैसर्गिक ठेवणीप्रमाणे केली जाते. या पद्धतीला पौर्वात्य पुष्परचनादेखील म्हणतात. ओ नो नो - इमोको हे जपानी पुष्परचनेचे आद्य जनक होते. इ.स. ६०७ च्या सुमारास तो चीनमध्ये जपानचा प्रातिनिधीक दूत म्हणून गेला. चीनमध्ये बुद्धमूतीपुढे ब्रांझच्या किंवा चिनीमातीच्या पात्रांतून फुले रचून ठेवण्याची पद्धत होती. तत्कालीन चिनी पुष्पपात्रे कलात्मक असली तरी पुष्परचनेची खास शैली तेथे विकसित झालेली नव्हती. पण यातूनच ओ नो - नो - इमोको याने प्रेरणा घेऊन जपानमध्ये परतल्यावर पुष्परचनेची स्वतंत्र कला विकसित केली. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत पारंपारिक जपानी पुष्परचना पूर्णतः विकसित झाल्याचे दिसते. या काळात पुष्पपात्रांचे नानाविध आकार, प्रकार, पुष्परचनेच्या स्वतंत्र शिक्षण संस्था आणि नियमबद्ध पुष्परचनेच्या विविध प्रणाली यांचा विकास घडून आला. १८५८ पासून पश्चिमी राष्ट्रांशी व्यापाराच्या निमित्ताने जपानचां जवळचा संबंध आला. पश्चिमी कलाविषयक कल्पनांचा प्रभाव जपानी पुष्परचनेवरही उमटू लागलेत.

जपानी पुष्परचनेमध्ये कळया, अर्धोन्मिलित व पूर्ण उमललेली फुले, पाने, फांद्या, फळे या सर्वांचा प्रतिकात्मक आकृतिबंध साधण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. पूर्ण उमललेले फूल, अधोन्मिलित कलिका व मुग्ध कलिका यातून अनुक्रमे भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांचे प्रतिकात्मक संकेत मिळतात. जपानी पुष्परचनेला दीर्घ परंपर असल्याने या कलेवरील जपानी प्रभाव सर्वत्र दिसून येतो. जपानी पद्धतीने फुलांची रचना साकार करण्यासाठी तीन आंतरिक तत्त्वे - स्वर्ग, मानव आणि पृथ्वी ही प्रतिक रूपाने तीन फांद्यांच्या साह्याने दर्शविली जातात. या तीन फांद्या म्हणजेच जपानी पुष्परचनेचा सांगाडा असतो. या सांगाड्यावरून जपानी पुष्परचना केल्या जातात. सर्वात उंच फांदी स्वर्ग, मध्यम फांदी मानव आणि लहान फांदी पृथ्वी दर्शविते. पुष्परचनेला रुंदी (खोली) प्राप्त होण्याकरीता आणखी दोन जास्तीच्या फांद्या वापरतात त्यातील एक म्हणजे **"कुरण"** तर दुसरीला **"पर्वत"** म्हणतात. या फांद्यांची उंची रचनाकाराला स्वतःच्या मनाने घेता येत

नाही. तर त्याची विशिष्ट मापे असतात. सर्वात उंच स्वर्ग" (शीन) फांदीची उंची पुष्पपात्राच्या उंची व रूंदी यांच्या बेरजेच्या दीडपट असते. पुष्परचनेच्या आकारानुसार त्यात थोडाफार बदल केला जाऊ शकतो. (उदा. पुष्परचना मोठी करावयाची असल्यास ही उंची दुप्पट घेतात तर लहान रचनेकरिता पुष्पपात्राच्या उंची व रुंदीच्या बेरजेइतकी देखील घेतात.) संपूर्ण पुष्परचनेतील ही फांदी म्हणजे मध्यवर्ती रेषा असून तिच्याकर्ता शक्य तेवढी जास्तीत जास्त निराळी, आगळीवेगळी फांदी निवडावी.

स्वर्ग फांदीनंतर दुय्यम फांदी म्हणजे मानव (सो) फांदीचा विचार करावा. ही फांदी मुख्य फांदीच्या (स्वर्ग) बाजूने आली. पुढच्या दिशेने पुष्परचनेची वाढ व्हावी अशा रीतीने मांडणी केली जाते. मानव फांदीची उंची स्वर्ग फांदीच्या पाऊणपट किंवा दोन तृतियांश इतकी घेतली जाते. आणि ही फांदी स्वर्ग फांदीकडे झुकती ठेवावी.

तिसरी फांदी म्हणजे 'पृथ्वी' ('हायके' किंवा 'तै') ही सर्वात कमी उंचीची असते. ही समोर किंवा पहिल्या दोन फांद्यांच्या मुळांच्या विरुद्ध दिशेला ठेवतात. पिनहोल्डरमध्ये या तीनही फांद्या अशा रितीने पक्क्या बसवितात की एकाच फांदीतून त्या तिन्ही उगविल्याचा भास होईल.

पुष्परचना चांगली दिसण्याकरिता आणि पुष्परचनेतील पोकळपणा भरून काढण्यासाठी जास्तीची फुले वापरण्याची मुभा असते. परंतु वरील तीन फांद्यांच्या जागा मात्र निश्चित ठिकाणीच असणे अत्यंत आवश्यक असते. यातील एक फांदी स्वर्ग रेषेपेक्षा कमी उंच घेऊन ती स्वर्ग रेषेच्या मागे लावतात. तिला 'पर्वत' (Mountain) फांदी म्हणतात. एक फांदी 'मानव' फांदीपेक्षा थोड़ी कमी उंच घेऊन ती समोरच्या बाजूने स्वर्ग व पृथ्वी यांच्यामध्ये लावतात. तिला 'कुरण' फांदी (Meadow) म्हणतात. चे 'पर्वत' व 'कुरण' या दोन फांद्यामुळे पुष्परचनेला 'खोली' (Depth) येते. याशिवाय रचनेच्या मागणीनुसार काही सहायक फुले देखील लावता येतात. जपानी पुष्परचनेचे अनेक प्रकार आहेत. त्यातील काही महत्त्वपूर्ण प्रकार पुढीलप्रमाणे-

अ) नागिरे ब) जियुबाना क) शोका ड) मोरिबाना इ) रिक्का फ) झिनीबाना

**अ) नागिरे (हैका) -** ही पुष्परचना उंच, उभट व अरूंद तोंडाच्या पुष्पपात्रामध्ये करतात. अरूंद तोंडाच्या पुष्पपात्रांमुळे ही रचना करताना पिनहोल्डरची गरज नसते. परंतु रचनेतील फांद्या घट्ट बसविण्याकरिता व त्यांना स्थिरता येण्याकरिता पुष्पपात्रांच्या तोंडात Y किंवा X आकाराच्या फांद्या तयार करून पक्क्या बसवितात व पुष्पपात्राच्या तोंडाचे तीन किंवा चार भागात विभाजन करून त्यामध्ये फांद्या फसविल्या जातात.

पुष्परचनेच्या मूलभूत कल्पनेवर यामध्ये भर दिलेला असतो. यात कृत्रिमतेला वाव नसतो. जे नैसर्गिक वनस्पती साहित्य उपलब्ध असेल, त्यांचे नैसर्गिक सौंदर्य निरखणे आणि ' ते आपल्या कौशल्याने अभिव्यक्त करणे हाच नागिरे शैलीचा प्रमुख हेतू आहे. नागिरे म्हणजे अतिशय साधी आणि नैसर्गिक सौंदर्य खुलविणारी पुष्परचना होय.

**ब) जियुबाना -** ही एक मुक्तशैली पुष्परचना आहे. यात मुक्त व स्वतंत्र अभिव्यक्तीला विशेष स्थान दिले जाते. म्हणून या रचना विभिन्न प्रकारच्या दिसतात. परंतु यात समानता एक दिसते ती म्हणजे भडक रंगांना प्राधान्य देणे, नेहमीपेक्षा वेगळी पुष्पपात्रे वापरणे, गुंतागुंतीचा आकार, बोधं न होणारा प्रतिकात्मक आकार, कधी कधी पानाफुलांसोबतच धातूच्या टाकाऊ कात्रणांचा उपयोग इत्यादी. त्यामुळेच ही रचना गुढ समजली जाते.

**क) शोका -** पारंपारिक आणि किचकट अशा रिक्का पुष्परचनेत बदल करून ‘‘शोका' ही शैली अस्तित्वात आली. यात जपानी पुष्परचनेतील मूळ 'तीन फांद्या स्वर्ग, मानव, पृथ्वी यांना लक्षात घेऊनच रचना करावयाची असते. या तीन फांद्यांना 'शोका 'मध्ये - शिन, सो व तै म्हणतात. यात शिन ही सर्वात प्रमुख असून ती सर्वात उंच असते. 'सो' ही दुय्यम प्रतीची असून ती मध्यम उंचीची असते, तर 'तै' ही सर्वात लहान असते व ती रचनेला आधार देते. यामध्ये सर्व फुलांच्या फांद्या जमिनीतून एकच देठ बाहेर निघाल्याप्रमाणे फुलदाणीतून बाहेर निघतात. म्हणजे पुष्पपानाच्या वर ७-८ सें.मी. पर्यंत एकच खोड दिसते

व नंतर त्यांच्या फांद्या व फुले (स्वर्ग, मानव, पृथ्वी) वेगवेगळया दिशेने व भिन्नभिन्न उंचीवर दिसतात.

**ड) रिक्का -** जपानी पुष्परचनेचा अतिप्राचीन प्रकार म्हणजे **'रिक्का'** होय. गुंतागुंतीची व आकाराने भव्य अशी **'रिक्का'** पुष्परचना भव्य मंदिरांना किंवा विलासी महालांना साजेशी असे. याकरिता मोट्टी, मौल्यवान, सुबक घाटांची व कलाकुसरीचे काम केलेली पुष्पपात्र उपयोगात आणली जात असत. ही पुष्पपात्रे चीनमधून आणली जात. रिक्का पुष्परचनेत पाईन झाडाची मोठी फांदी आणि चेरी वृक्षाच्या फळाफुलांनी बहरलेल्या फांद्यांचा उपयोग केला जात असे. तसेच इतर फूले, पाने, फांद्या वापरून उंच व मोठी रचना केली जात असे. हिची उंची पाच सहा फूट ते ४० फूट पर्यंतदेखील केली जात असे. त्यामुळे खर्च देखील अधिक जास्त येत असे. इतर फांद्यांमध्ये सिडार, बांबू आणि सायप्रेसेस यांचा उपयोग केला जात असे.

**इ) झिनीबाना -** हा एक मुक्तशैली पुष्परचंनेचा प्रकार असून यात कलाकाराच्या कल्पनाशक्तीला व कौशल्याला भरपूर वाव असतो. मूळ जपानी पुष्परचना प्रतिकात्मक असून त्रिकोणावर आधारित असल्या तरी झिनीबाना प्रकारातील रचना गोलाकार, चौरस, लंबगोल तसेच कलाकाराच्या आवडीच्या आकारांच्या असू शकतात. यात पानाफुलांसोबतच इतर साधनांचा कल्पकतेने उपयोग केला जातो. उदा. दगड, झाडांची मुळे, खोडे, शंख व शिंपले, लहानलहान चिनीमातीचे पक्षी वगैरे.

**फ) मोरिबाना -** परदेशी फुले जपानमध्ये येऊ लागल्यावर १९००व्या शतकाच्या सुमारास अनाशिन ओहोरा यांनी मोरिबाना प्रकार सुरू केला. त्यांनीच *ओहारा (स्कूल) शैली सुरू केली. पुष्परचना ही नेहमीच पुष्पपात्राच्या आकाराला शोभेशी असली पाहिजे यावर त्यांचा अधिक भर् असल्याने त्यावेळी अनेक नवनवीन आकरांची पुष्पपात्र तयार होऊ लागली. मोरिबाना पुष्परचना उथळ व पसरट भांड्यात केली जात असल्याने त्या पद्धतीची कितीतरी पुष्पपात्रे प्रचारात आलीत. पसरट पुष्पपात्रात फांद्या ताठ उभ्या

राहण्याकरिता पीनहोल्डरचा उपयोग केला जातो. यात स्वर्ग, मानव, पृथ्वी या तीन फांद्या विशिष्ट पद्धतीने लावून तीन मुख्य फुलांच्या जागा निश्चित करतात. भरगच्छ पुष्परचना करावयाची असल्यास जास्तीची फुले लावावीत.

रचनेतील पिनहोल्डर दिसू नये म्हणून शंखशिंपले, शेवाळ, गारगोट्या, पाने, बारीक दगड यांचा उपयोग करतात.

**(३) आधुनिक पुष्परचना -** काळाचा प्रभाव जीवनावरही होत असतो. जीवनातील प्रत्येक कलेवर होत..असतो. तसाच तो परिणाम पुष्परचनेवरदेखील झालेला दिसतो. आधुनिक पुष्परचनेमध्ये कलाकाराला पूर्ण स्वातंत्र्य असते. त्याच्यावर कोणतीच बंधने न घालता त्याच्यातील सुप्त प्रतिभेला आणि कलागुणांना वाव देऊन त्यांचे प्रगटीकरण पुष्परचनेतून होऊ द्यावे ही विचारधारा आधुनिक पुष्परचनेमध्ये दिसून येते. पुष्परचनेच्या परंपरागत नियमांचे पालन करणे कलाकारावर बंधनकारक नसते.

फुलांचे रंग आणि आकार यांचा अप्रतिरूप अविष्कार साधण्याकडे आधुनिक कल दिसतो. याकरिता पुष्पपात्र साधेच परंतु वैशिष्ट्यपूर्ण वापरतात. घरातील नाविण्यपूर्ण आकारांच्या भांड्याचा उपयोगदेखील पुष्पपात्र म्हणून केला जातो. प्रथम रचनेकरिता फांद्या व पानांची निवड करून त्याला साजेशी फुलांची व पुष्पपात्राची निवड करून कलाकार आपल्या कल्पनाशक्तीनुसार विविध आकारांच्या पुष्परचना करू शकतात. फुले उपलब्ध नसल्यास विविध क्रोटन, कॅक्टस यांची पाने, तुर यांचीच आकर्षक मांडणी करून पुष्परचना केली जाते. कधीकधी वाळवून आकर्षक आकार दिलेल्या फांद्या, गवताचे प्रकार, तुरे, मेंदीच्या बिया यांचादेखील उपयोग पुष्परचनेमध्ये रंगवून अथवा मुळ रंगात केला जातो तर कधी भाज्या व फळांचा उपयोगदेखील केला जातो.

आजकाल वनस्पती साहित्याबरोबर इतरही साहित्याचा उपयोग पुष्परचनेत करण्यात येतो. उदा. - धातूंच्या टाकाऊ वस्तू, धातूंचे पत्रे, तारा, शंख, शिंपले, पितळी भांडी, काचेच्या वस्तू, पक्ष्यांची पिसे इत्यादी. पुष्परचनेत काय वापरले आहे, यापेक्षा त्या

वस्तू कशाप्रकारे वापरल्या आहेत याला आधुनिक रचनेत अधिक महत्त्व असते. नित्य नवनवीन कल्पना आणि नवनवीन साहित्याचा वापर यामुळे आधुनिक रचना अधिक लोकप्रिय होत आहे.

**(४) अल्पाकृती पुष्परचना -** ही पुष्परचना अत्यंत लहान आकाराची असते. पुष्पात्र अत्यंत लहान आकाराचे असते. त्यामुळे त्यात लहान आकाराची पुष्परचना केली जाते. पुष्पपात्राचा आकार व पुष्परचनेचा आकार यात प्रमाणबद्धता असावी. रंगसंगतीला विशेष महत्त्व दिले जाते. आकार लहान असल्यामुळे एका जागेवर दुसऱ्या जागी नेणे सोईचे होते. फुले पाने कमी लागत असल्यामुळे कुठेही व केव्हाही ही रचना करता येते. या पुष्प - रचनेची उंची जास्तीत जास्त ५ ते ६ इंच असते. ही पुष्परचना सर्व प्रकारात करता येते. अल्याकृती पुष्परचना अधिक लोकप्रिय आहे.

**(५) शुष्क पुष्परचना -** पुष्परचनेचे सौंदर्य फुलांच्या ताजेपणा व टवटबीतपणावर अवलंबून असते. परंतु कधी कधी ताजी - टवटवीत फुले पाने मिळू शकतं नाहीत. विशेषतः उन्हाळयांच्या दिवसात ताजी फुले मिळणे कठीण असते आणि मिळालीच तर ती अधिक काळ टिकवून ठेवण्याकरिता बरेच परिश्रम घ्यावे लागतात आणि इतके करूनही ती लवकर सुकतातच. सुकलेल्या तसेच माना टाकलेल्या फुलापानांमुळे पुष्परचनेचे सौंदर्य नष्ट होते. म्हणून अशा परिस्थितीत शुष्क पुष्परचना करणे सोयीचे ठरते.

शुष्क पुष्परचना करताना विशिष्ट आकार डोळयासमोर ठेवून किंवा काल्पनिक आकार कागदावर काढून त्याच्या मागणीनुसार विविध साधनांची जुळवाजुळव करावी लागते. या साधनांमध्ये बांबूच्या झाडांच्या वाळलेल्या परंतु आकर्षक आकाराच्या फांद्या किंवा मुळे, झाडांची बुंधे, नैसर्गिक आकारातील वाळलेल्या फांद्या किंवा वेली, तुरे, गवत, वाळलेली लहान लहान फळे, ब्रिया, गव्हाच्या ओंब्या, बाजरीचे तसे मक्याची कणसे यांचा वापर केला जातो. या रचना साकारताना रेषा आणि आकाराला प्राधान्य दिलेले असते.

कधी कधी या वाळलेल्या साहित्याला पॉलिश करतात किंबा रंग दिला जातो. परंतु त्यांच्या नैसर्गिक आकारात बदल होणार नाही ही दखल घेतली जाते.

वाळलेल्या वक्राकार फांद्यांना रंगवून, त्यांच्या लहानलहान काट्यांमध्ये शंखशिंपले, मोती, थर्मोकोलचे रंगीत बॉल, टिकल्या, सोनेरी तारांच्या साह्याने लटकवितात. यांची विशेषतः उभी, उंच रचना केली जाते. वाळलेल्या दोडक्यातील जाळीदार भाग काढून रंगवून किंवा मूळ रंगात घेऊन भिंतीवर टांगतात व त्यात अशा प्रकारे सुशोभित केलेल्या फांद्यांची रचना केली जाते.

मोठ्या आकाराची शुष्क पुष्परचना करताना सुंदर आकाराचे मोठे खोड पॉलिश करून बेस म्हणून तयार करून घ्यावे व इतर उपसाधनांची जुळवणी करून विविध प्रकारच्या शुष्क रचना करता येतात. प्रत्येकवेळी थोडा फार फेरबदल करून विविध आकारात या रचना करता येतता. यासाठी निसर्गाचे निरीक्षण करीत राहिल्यास विविध नाविण्यपूर्ण रचना सूचतात.

शुष्क पुष्परचना या दीर्घकाळ टिकणाऱ्या असतात. परंतु मधूनमधून साहित्याची स्वच्छता किंवा रंगरंगोटी करीत राहणे आवश्यक असते. त्यामुळे तिची आकर्षकता टिकून राहते कारण धुळीने माखलेली रचना सौंदर्यहीन वाटते.

**(६) रेखाबद्ध पुष्परचना -** यामध्ये रेषेला अधिक महत्त्वाचे स्थान आहे. रेषा तयार करण्याकरिता विविध आकाराच्या फांद्या वापरतात. रेषांची जागा ठरवून नंतर पाने फुले लावतात. मोठ्या दांड्यांची फुले आवश्यक ठरतात. उभ्या आकाराच्या पुष्पपात्रात ही रचना करतात. खोलीतील कोपरा सजवण्यासाठी ही पुष्परचना ठेवतात. यांत स्तंभाकार, त्रिकोणी, सर्पाकार आकार या पुष्परेचनेत दिसून येतात.

**(७) समूहबद्ध पुष्परचना -** समूहबद्ध पुष्परचना करण्यास अतिशय सोपी आहे. यासाठी पुष्पपात्राचा आकार गोल, चौकोनी, उभा, बसका वापरण्यात येतो. पुष्पपात्र हे उ मंद रंगाचे असावे. पिन होल्डर हे पुष्पपात्राच्या व फुलांच्या देठांप्रमाणे निवडता येते. श

फुलांचे रंग हे पानांच्या रंगाला अनुरूप निवडावे. फुलांचे आकार लहान मोठे, फुलांचे देठ श लहान व लांब तर रंग फिके, गडद किंवा विरुद्ध रंगाची. असल्यास अधिक उठावदार दिसतात. पानांचा वापर करतांना लहान किंवा छोटी पाने व त्याचसोबत एखादे मोठे पान वापरल्यास पुष्परचना उठून दिसते.

ही पुष्परचना जेवणाच्या टेबलवर, बैठकीतील मधल्या टेबलवर मध्यम आकाराची समूहबद्ध पुष्परचना तर कोपऱ्यातील टेबलवर उंच समूहबद्ध पुष्परचना सुंदर दिसते. समूहबद्ध पुष्परचनेचे आकार गोल, अंडाकृती, त्रिकोणी, चौकोनी असू शकतात.

# संदर्भ ग्रंथसूची


1) बिमकर , आशा , लिमये क्षमा : प्रगत गृहव्यवस्थापण प्रथमावृती – 1976 महाराष्ट्र विध्या पीठ ग्रंथ निर्मिती मंडल , साहित्य प्रसार केंद्र ,नागपूर

2) Nickell and Dorscy : 1967 Management in Family living . Forth Edition Wiley Eastern Private Limited,New Delhi

3) डॉ मुनशी, डॉ जठर: गृह व्यवस्थापन सुधारलेली आवृत्ती पिपळपुरे ॲण्ड पब्लीशर्स, नागपूर

4) डॉ. सौ. ज्योति गायकवाड : गृह व्यवस्थापन श्री मंगेश प्रकाशन श्री शनादुर्गा निवास, २३, नवी रामदासपेठ नागपूर १0

5) डॉ. सुनंदा वसू, डॉ. रजनी मेहरे : गृहव्यवस्थापन आणि आंतरिक सजावट श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

6) कांडलकर लीना : गृहअर्थशास्त्राची मूलतत्त्वे २००५ -विद्या प्रकाशन, नागपूर

7) कोल्हटकर विद्या : आधुनिक गृहव्यवस्थापन व गृहसजावट प्रथमावृत्ती-२००४ विश्व पब्लीशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, नागपूर

8) शैरी जी.पी. : गृहव्यवस्था एवं गृह तेरहवा संस्करण - १९८६ विदेह पुस्तक मंदिर, आगरा

9) मिस्त्री निर्मला सी : भरतकाम डिझाईन्स- मराठी आवृत्ती नवनीत पब्लीकेशन्स इ. लिमीटेड १९९७

10) त्रिवेणी फरकाडे , सुलभा गोंगे : कौटुंबिक संसाधनांचे व्यवस्थापनआणि गृहसजावट पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

11) डॉ. इंदिरा खडसे : गृह व्यवस्थापन आणि गृहकला सौ मीना पांडे,हिमालया पब्लिशिंग हाऊस,“रामदूत" डॉ.भालेराव मार्ग, गिरगांव, मुंबई - ४०० ००४